

सखी
अक्षय
पोवार

**या मित्रांनो! सुंदर पुस्तकांचा मनमुराद आनंद लुटा!!**

# सखी

## हे पुस्तक फ़ुकट नाही

यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.

पण तरीही आम्ही ते वाचकांना विनामूल्य घेऊ देतो.

कारण ई पुस्तक एकदा बनलं की एकजण वाचो वा एक लाख.

आमचं काहीच कमी होत नाही.

उलट आनंद वाढतो.

मजा येते.

**पण**

## तुम्ही ते फ़ुकट का घ्यावं?

तुम्हालाही काही देता येईल.

असे काही द्या ज्याने ई साहित्यच्या लेखकांना, टीमला आणि तुम्हालाही आनंद मिळेल

आणि तुमचं काहीच कमी होणार नाही.

तुम्ही आशिर्वाद आणि शुभेच्छा द्या

लेखकांना फ़ोन करून दाद द्या

आपल्या मित्रांचे मेल पत्ते आम्हाला द्या

मित्रांना हे पुस्तक मेल आणि Whatsapp करा

ई साहित्यचे फ़ेसबुक पेज, इन्स्टाग्राम, टेलिग्राम यांवर स्वतः जा व इतरांना आमंत्रित करा. सोशल मिडियावर ई साहित्यचा प्रचार करा.

सर्वात बहुमोल अशा तुमच्या सूचना द्या

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत ज्याने लेखकाला व ईसाहित्य टीमला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यास मदत होईल. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे व त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा. अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# सखी

(कादंबरी)

# अक्षय पोवार

ई साहित्य प्रतिष्ठान

# सखी

लेखक : अक्षय पोवार

२८/४४२, पंचारती सोसायटी, चारकोप, से-०४,

कांदिवली पश्चिम, मुंबई उपनगर ४०० ०६७.

९०९६२०४२४५

powarakshay01@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची परवानगी घेणे आवश्यक आहे तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक: ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

**e**sahity@gmail.com

Whatsapp- 9987737237

प्रकाशन: १ जुलै २०२२ (आषाढ शुक्ल द्वितिया १९४४)

©esahity Pratishthan®2022

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.

**हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.**

## अक्षय पोवार



नमस्कार. माझं नाव
**अक्षय तानाजी पोवार.**

रहायला मुंबईतच चारकोप कांदिवलीला आहे. २०१७ साली कोल्हापूरातून मेकॅनिकल डिप्लोमा पूर्ण केला आहे. यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापिठातून बीए पूर्ण केलं आहे. सोबतच स्पर्धा परिक्षांची तयारी सुरू आहे. सध्या नोकरी ही गरज असल्या कारणाने मुंबईतच एका कंपनीत कामाला आहे. वाचन करता करता लिखाणाची आवड निर्माण झाली. केवळ आनंद मिळतो म्हणून लिखाण करतोय. कदाचित यातूनच माझी ओळख होईल..

माझं हे पहिलंच पुस्तक. तसा मी कोणी प्रोफेशनल लेखक वगैरे नाही.. २०१७ साली डिप्लोमा पूर्ण केला. पूर्ण करता करता एवढं मात्र कळालं की आपण काही इंजिनिअरिंगसाठी बनलो नाही. सोबतच यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापिठातून बीए सुरू होतं. विचार केला की पदवी घेवू अन् स्पर्धा परिक्षांची तयारी करू. २०१८ साली बीए पूर्ण केलं. नंतर प्रवास सुरू झाला तो स्पर्धा

परिक्षेचा. जो अजून सुरूच आहे. मध्यंतरी कोरोना काळात सर्वच विस्कळीत झालं. लॉकडाऊन मध्ये अवांतर वाचनाची गोडी निर्माण झाली. अन् आवडीचं छंदात कधी रूपांतर झालं ते कळालंच नाही. एक वेगळीच नशा चढली. लोक म्हणतात की दारूचं व्यसन एकदा लागलं की ते सुटत नाही. ती नशा वेगळीच. मला वाटतं एक वेळ दारूच व्यसन सुटेल पण वाचनाचं लागलेल व्यसन सुटता सुटनार नाही. वाचनाने माझ्यात फार बदल झाला.

वाचना बरोबरच लेखनाची ही सवय लागली. स्वत:ला व्यक्त करता करता '**सखी**' गवसली. असं म्हणतात दु:खात जास्त सुचतं. आपण जे बघितलं, जे सोसलं त्यातूनच एक क्रिएटिव्हीटी जन्म घेते. सखी ही एक क्रिएटिव्हीटीच आहे.

ई साहित्य प्रतिष्ठान तर्फे ही आपल्यासमोर सादर होत आहे याचा विशेष आनंद आहे. ई-साहित्य प्रतिष्ठानचे यासाठी विशेष आभार.

या प्रवासात वेळोवेळी साथ देणारे माझे मित्र धिरज वाघमारे, स्वप्निल रजपूत, रूषिकेश पोवार, अविनाश पोवार, अश्विनी भोई यांचेदेखील मन:पूर्वक आभार.

पुस्तकांच्या अक्षय खजिन्यात आपला ही एखादा मोती असावा म्हणून हा एक प्रयत्न.

आयुष्य शिकवणाऱ्या संघर्षमयी अन् सहनशील **"आजीला"**

आणि

ज्यांच्यामुळे जगण्याची प्रेरणा मिळत राहते अशा

**"आई-वडिलांना"**

माझे पहिले पुस्तक समर्पित.

या पुस्तकातील लेखकाची मते, घटना, वर्णने ही लेखकाची असून त्याच्याशी प्रकाशक सहमत असतीलच असे नाही.

या कादंबरीतील सर्व पात्रे काल्पनिक असून, प्रत्यक्षात त्यांचे कोणाशी साधर्म्य आढळल्यास तो योगायोग समजावा.

# सखी

**अक्षय पोवार**

# भेट

घर आवरता आवरता तिची तारांबळच उडालेली. किती तो पसारा! घर तिचं आटोपशीर होतं. पण सगळ्या वस्तू अस्ताव्यस्त पडून होत्या. काही एक जागेवर दिसत नव्हतं. १० ते ५ ड्युटी असली की हे असंच. आठवडाभर घरात कोणती वस्तू कुठं ते काय सांगता यायचं नाही. रविवारी सुट्टी दिवशीच ती वस्तू जाग्यावर जायची.

आजचा दिवस तिच्यासाठी जरा खासच होता. आज तिला कोणीतरी भेटायला येणार होतं. ती व्यक्ती जी कधी तिच्या हृदयाजवळ राहत होती. आज किती तरी वर्षांनी त्याच व्यक्तीचं दर्शन तिला होणार होतं. म्हणूनच तिची नुसती धांदल उडालेली. घर आवरून तिला स्वयंपाकाच्या मागे लागयचं होतं. स्वत: तयार व्हायचं होतं.

हु S श्य S S S.... झालं एकदाचं.. ती स्वत:शीच पुटपुटली आणि सोफ्यावर बैठक मारत बसली.

आता किती टापटीप दिसतंय घर..! एकदम आटोपशीर.. चला एक काम तर झालं.. अजून बराच वेळ बाकी आहे.. पटकन अंघोळ करून घेते.. म्हणजे जेवण करायला बरं.. उशीर नको उगाच..

स्वत:शीच बोलत-बोलत ती उठली. अंघोळीसाठी बाथरूमकडे वळाली.

गरम पाण्याचा शॉवर घेऊन केस झाडत झाडतच ती बाहेर आली. येऊन आरशासमोर बसली. आरशातली तिची प्रतिमा पाहू लागली. आठ वर्षांपूर्वीची ती आणि आत्ताची ती यात फार तफावत होती. भूतकाळातली तिची सुंदर तसबीर तिच्या डोळ्यांसमोर उभी राहिली. त्या तसबीरी सोबतच ती भूतकाळात निघून गेली.

हरणासारखे तिचे टपोरे पाणीदार डोळे.. आंब्याच्या कोयीसारखी कोरीव हनुवटी.. हनुवटीच्या कोपऱ्यावर उठून दिसणारं तीळ.. कोरलेल्या भुवया.. गुलाबी ओठ.. मजबूत बांधा.. भरदार छाती.

स्वत:चं ते मोहक सौंदर्य आठवून तिने दिर्घ श्वास घेतला. तिच्या डोळ्यातून अश्रुचा एक थेंब गालापर्यंत ओघळला. एक दिर्घ सुस्कारा सोडत तिने डोळे पुसले.

कामाच्या व्यापाने तिची तब्येत फार नाजूक झालेली. ती आज ही दिसायला सुंदर होती पण भविष्याच्या चिंतेनं ती खचून गेलेली. तिची मोहकता ढासळत चाललेली.

भूतकाळात घडलेल्या गोष्टी आपण बदलू शकत नाही. आपण फक्त वर्तमान घडवू शकतो. भविष्य सुखी करू शकतो. आज मला तेच करायचं आहे. माझा वर्तमान घडवायचा आहे. भविष्य सुखी करायचं आहे.

समजावणीच्या चार गोष्टी मनाला सांगत तिने एक दिर्घ सुस्कारा सोडला.

स्वयंपाकासाठी ती किचनकडे वळाली. आज फक्त त्याच्या आवडीचं जेवण ती करणार होती. भूतकाळातले त्याच्या बरोबरचे क्षण आठवत ती स्वयंपाकात रमली.

तिचं लक्ष भिंतीवरल्या घड्याळाकडे गेलं तेव्हा घड्याळाचा काटा एक वर गेला होता.

"अजून कसा आला नाही? दोन पर्यंत येतो म्हणालेला."

"निघाला असेल की नाही?"

"कुठपर्यंत आला असेल?"

मनात प्रश्नांची सरबत्ती सुरू होती. दोन वाजायला येतील तसे तिच्या हृदयातली धडधड वाढत होती. तिची नजर सारखी सारखी दारावर जात होती. डोर बेलकडे तिचे कान टवकारले होते.

टींग..टाँग.. दारावरची बेल वाजली.

तिच्या काळजाचे ठोके वाढले.. श्वासोच्छवासाची गती वाढली..

"आला.. तो आला.." ती आनंदानं म्हणाली..

आरशात तिने स्वत:चा चेहरा पाहून घेतला. केसावरनं हात फिरवला. स्वत:चा ड्रेस नीट केला. अंगावर ओढणी घेतली. दबक्या पावलाने जात तिने दरवाजा उघडला. समोर तोच होता.

पावणेसहा फूट उंचीचा.. बलदंड शरीराचा.. पिळदार बाहूंचा.. राजस चेहऱ्याचा तो राजकुमार तिच्या समोर उभा होता.

त्याला पाहून ती आनंदी झाली. नकळत तिच्या डोळ्यांत पाणी आलं. पूर्वी सारखंच हसू त्याच्या चेहऱ्यावर होतं. दोघंही एकमेकांकडे पाहत होते.

"कशी आहेस?" त्याने विचारलं.

तिने हसत हसत "ठीक आहे" असं उत्तर दिलं.

"ये ना.. आत ये.. तू कसा आहेस..?" ती जरा गोंधळूनचं म्हणाली. तो एकटा नव्हता. त्याच्या बरोबर एक मुलगी होती. तिला पाहून ती जरा चकितच झाली. पण तसां भाव तिने चेहऱ्यावर आणला नाही.

"बस.. बस.. कसा आहेस.. मिहिर?"

"मी मजेत. तू बोल, तू कशी आहेस?"

"मी पण ठीक आहे."

"उशीर केलास?"

"होय. जरा झालांच. टॅक्सीच मिळत नव्हती लवकर."

"अच्छा. आला ना व्यवस्थित?"

"हो. लांब नाही घर. जवळच आहे. हिला माहित होता ना पत्ता."

"अच्छा." ती त्या मुलीकडे बघत स्मित करत होती.

"ही माझी मैत्रीण अदिती." मिहिर म्हणाला. आणि "अदिती, ही माझी बालमैत्रीण रोहिणी."

"हाSय! अदिती कशी आहेस? रोहिणी म्हणाली.

"मी मस्त. तुम्ही कशा आहात?"

"अगं एवढी मोठी नाही मी. रोहिणीच म्हण मला. मी पण एकदम मस्त." रोहिणी हसत हसत म्हणाली.

अदितीने नुसतीच हसून मान डोलावली.

"मग मिस्टर मिहिर देशमुख काय म्हणताय? इतकी वर्ष आठवण होती का आमची."

"ह्मम.. होती म्हणूनच आलो ना तुला भेटायला. तुला होती का आठवण? कोणालाच न सांगता जी गेलीस ती आज भेटतेस. तुला नाही वाटलं का कधी भेटावं म्हणून?"

"सॉरी.. सॉरी.." त्याबद्दल आधीच क्षमा मागते.

दोघंही हसायला लागले. अदिती फक्त चेहऱ्यावर हसू ठेवून दोघांकडे बघत होती.

"कुठे होतीस रोहिणी? कॉलेज संपलं तशी एकदम गायब झालीस."

"काही नाही रे गावीच होते. जरा घरच्या कामात अडकून होते."

"इतकी की तुला एकदाही भेटावसं वाटलं नाही."

"खरं सांगायचं तर खूप वाटलं पण काय करू परिस्थितीच तशी होती."

"कशी होती?" मिहिरने प्रश्नार्थक नजरेने विचारलं.

"सांगते रे सगळं सांगते. आधी तू मला सांग काय घेणार चहा.. कॉफी..? बघ आल्या आल्या तू माझ्याशी भांडायला लागलास मी तुला पाणी द्यायलाच विसरले. बस मी पाणी आणते." तशी ती किचनकडे वळली.

अदिती शांतच होती. त्यांच्यातलं संभाषण शांतपणे ऐकत होती. तिची नजर घरभर फिरत होती. भिंतीवरल्या फोटोफ्रेम्स न्याहाळत होती.

"घ्या." रोहिणीने पाण्याचा ग्लास पुढे केला.

"घे ना अदिती."

"हां जरा मला वॉशरूमला जायचं होतं."

"हां.. हां.. ते बघ ते.. समोर आहे.. जा..ना..जा.."

अदितीने पाण्याचा ग्लास ठेवला आणि ती वॉशरूमकडे वळली.

मिहिर रोहिणीकडे शांत नजरेने पाहत होता. त्याला तिच्यात झालेला बदल जाणवला होता. दोघंही एकमेकांकडे पाहत होते. नजरेनेच बोलायचा

प्रयत्न करत होते. खूप काही सांगायचंय, ऐकायचंय असा भाव दोघांच्याही नजरेत दिसत होता.

एवढ्यात अदिती आली.

"छान घर आहे तुझं रोहिणी."

"होय खरंच? थँक् यू." आनंदानं रोहिणी म्हणाली.

"एकदम आटोपशीर आहे. अजिबात कुठे पसारा नाही. सुंदर आहे खूप."

रोहिणी गालातल्या गालात का हसली हे तिलाच माहिती.

"मग अदिती काय करते तू?"

"मी सध्या जॉब करत करत इंटरियर डिझायनिंगचा कोर्स करत आहे."

"अच्छा. आणि तुझं काय चालंलय मिहिर?"

"बस चालंलय ठिक." मिहिर हसत म्हणाला.

"नोकरी करत करत युपीएससीची तयारी सुरू आहे. आम्ही दोघं पण एकाच कंपनीमध्ये आहोत."

"अच्छा! बरंय की मग."

"बाकी तू काय म्हणतेस? कुठं असतेस तू? काय चालंलय तुझं?"

"माझं खूप मजेत.. स्टेट बँकेत पीओ म्हणून लागलीय. कोल्हापूरलाच होते. आता हल्लीच माझं ट्रान्सफर झालं. पाच सहा महिन्यांपूर्वी आले मी मुंबईत."

"म्हणजे तू पाच सहा महिन्यांपासून आहेस आणि मला आज कळतंय." मिहिर नाराजीच्या सुरात म्हणाला.

"ए बाबा.. आता परत रागवू नकोस. खरं तर मी तुला खूप शोधण्याचा प्रयत्न केला पण तुझा नंबरच कुठं घावेना. खरं तर तुझ्यामुळेच वेळ लागला मला."

"आता मी काय केलं?"

"काय केलं? अरे कसं कॉन्टॅक्ट करायचं तुला? किती शोधलं तुला.. फेसबुक, व्हॉट्सअप कुठेच तुझा पत्ता नाही.. एक नंबर होता तो पण धड व्हॉट्सअप वर नाही.. आता इतक्या वर्षांनी म्हटलं तो नंबर तुझ्याकडे असेल की नाही?"

"बरोबर आहे.." अदितीने तात्काळ तिला साथ दिली.

"बघ अदिती.. तूच सांग कसा बरं कॉन्टॅक्ट करायचा?"

"हां... आता माझ्यावर आलं सगळं.. आणि फेसबुक आणि व्हॉट्सअपचं काय? कॉल करू शकत नव्हतीस?"

"चालू असेल की नाही काय माहित म्हटलं?" मग त्या दिवशी फोन लावायचं ठरवलचं. तर नशिबाने तुझाच निघाला."

"तू अजून दहा वर्षांनी जरी कॉल केला असतास ना तरी माझाच असता." मिहिर आत्मविश्वासाने म्हणाला.

"बर बाबा.. माझंच चुकलं.. सॉरी.. किती वेळा माफी मागायला लावणार आहेस मला?"

"ठिक आहे.. ठिक आहे.. असू दे आता." मिहिर हसत हसत म्हणाला.

"रोहिणीपण कोल्हापूरचीच..?" अदितीने विचारलं.

"होय. आम्ही एकाच गावचे. तू पण कोल्हापूरचीच का?" रोहिणी म्हणाली.

"होय. राधानगरी."

"काय सांगतेस?" रोहिणी आनंदी चेहऱ्याने पाहत म्हणाली.

अदिती नुसतीच हसली आणि म्हणाली,

"तू कसं काय ओळखलस?"

"कोल्हापूरकरांना ओळखायला किती वेळ लागतोय गं. तरी मला वाटत होतंच एकंदरीत तुझ्या बोलण्यावरून."

"तू कुठे असतेस कोल्हापूरात?" अदितीने विचारलं.

"आर के नगर मध्ये. आता माझी स्वत:ची रूम घेतलीय मी. झाले आता तीन चार महिने."

मिहिर शांत नजरेने पाहत होता. रोहिणी बोलत बोलत मिहिर कडे बघत होती.

"हे पण घर तुझंच आहे की...?" मिहिरने विचारलं.

"नाही रे.. माझं कुठलं.. भाड्याने राहतेय.

"छान आहे पण. अगळपगळ. चांगलीच मोठी खोली आहे. भाडं जास्त असेल नाही..?" मिहिरने विचारलं.

"एवढं नाही. पण होतं सगळं ॲडजस्ट. रोहिणी म्हणाली.

"बाकी तूझे मि..."

"तू इथून लांब राहतोस का?" रोहिणी त्याला तोडत मध्येच म्हणाली."

"नाही इतकं लांब नाही.. अर्धा तास लागतो ट्रेनने.."

"कुठे ते?"

"गोरेगांव".

"अच्छा. आणि तू अदिती?"

"मी इथे जवळच राहते.. चैत्यभूमी रोड आहे ना त्याच्या अपोझिट साईटला. शिवाजी पार्कपासून जवळच."

"अच्छा! मी काही फिरले नाही इथे अजून. अगं वेळच नाही मिळत कामातून.. सकाळी गेलं की संध्याकाळीच घरी यायचं.. आलं की मग जेवण, घरातली कामं यातच वेळ जातो.. रविवार तेवढा मिळतो पण तो पण जातो आरामात. आणि कुठं जायचं म्हटलं तर आठवड्यातली कामं असतातच."

"होय.. बरोबर आहे तुझं.. सर्व्हिस म्हटलं की हे असंच."

"कोण कोण असतं अदिती तुझ्या घरी?"

"मी आई, बाबा आणि मोठा भाऊ."

"अच्छा. काय करतात बाबा?"

"बाबा आणि दादा शेतीच बघतात.. आई घरी असते."

"तू इथे एकटीच राहतेस..?"

"होय.. माझी फॅमिली गावीच असते.. मी शिकण्यासाठी म्हणून मुंबईत आले, ते इथेच आहे.. एकटीच असते मी इथे. कधी तरी जाते गावी."

"अच्छा! बरंय बरंय.. धाडसी आहेस."

अदिती नुसतीच हसली.

"बर.. बसा तुम्ही.. मी जेवणाचं बघते."

"अगं बस.. कशाला उगाच.. जेवणाच्या मागे लागू नकोस.. जेवणाचं बघू परत पुढच्यावेळी."

"नाही हां.. मी तुला फोनवरच सांगितलेलं.. जेवायलाच यायचं म्हणून.. आता नाही-नको करायचं नाही."

"हां.. हां.. बस तरी जेवूया आरामात.. काय घाई आहे..?"

"बरं बसते.. जसं तुम्ही म्हणाल तसं.. आज तुमचाच आदेश मिहिर साहेब."

सर्व हसायला लागले.

"तुम्ही बसा बोलत.. मला निघावं लागेल." अदिती रोहिणीकडे बघत म्हणाली.

मिहिरने अदितीकडे चमकून पाहिलं. त्याला हे अनपेक्षित होतं. तो एकटक अदितीकडे पाहू लागला.

"का गं.. असं का बोलतेस.. आवडलं नाही का तुला माझं घर?" रोहिणी म्हणाली.

"नाही हां तसं काही नाही.. खूप खूप आवडलं.. तुझं घर पण आणि तू पण.."

"मग?"

"अगं खरंच जावं लागेल मला.. संध्याकाळी गावी जाण्यासाठी निघायचं आहे.. हवं तर विचार ह्याला." अदिती मिहिरकडे मान वळवत त्याच्या डोळ्यात डोळे घालत बोलली.

"हां.. म्हणजे.. ती बोलत होती.. पण मीच तिला घेऊन आलो.. 'पत्ता दाखवून जा' म्हणालो परत." मिहिर अदितीकडे गंभीर नजर टाकत म्हणाला.

"अच्छा. का गं अचानक गावी?"

"काही नाही सहजच.. ते जरा घराचं काम काढलय."

"बरं.. पण मिहिर हे एकच काम तू चांगलं केलस आयुष्यात."

"काय ते?"

"हिला सोबत घेऊन आलास.. आमची भेट तरी झाली."

"होय बरोबर.." अदितीने लगेच सहमती दिली.

तशा दोघी एकमेकींच्या गळ्यात गळे घालून हसू लागल्या.

"अरे वा! चांगलं आहे.. दोघींचं चांगलं जमलं.

तसे सर्व जण हसायला लागले.

"चल रोहिणी निघते मी.. खरचं जावं लागेल.. राग नको मानूस."

"ठीक आहे. पण एका अटीवर."

"अट?"

"होय.. तुला परत यावं लागेल माझ्याकडे.. आणि हो पुढच्या वेळी एकटी आलीस तरी चालेल.. आता तुला घर माहित आहे.." रोहिणी मिहिरला चिडवत म्हणाली.

"नक्की.. नक्की येईन मी.. आणि एकटीच येईन." अदितीने तिला साथ दिली.

"अरे वा! बरंय हे.. आता तुम्ही दोघी एक झालात काय.. आधी ही इकडे यायला मागत नव्हती.. आणि आता तुमची युती झाली काय.. आणि मी अपोझिशन."

"होय आता आमची मैत्री झाली.. आता आम्ही एकाच पक्षात" अदिती म्हणाली आणि रोहिणीला तिने टाळी दिली.

दोघीही हसायला लागल्या.

"बरं चल रोहिणी निघते मी."

"बर.. चल चल.. आणि ये आठवणीने."

"हो.. नक्की येईन."

तिघेही उठले. रोहिणीने अदितीची गळा भेट घेतली.

"अदिती पुन्हा ये हां.. खूप खूप बरं वाटलं मला तुला भेटून.. अगदी जवळचं माणूस भेटल्यासारखं झालं मला.. विसरू नकोस."

अदिती नुसतीच हसली. तिचा हात हातात घेऊन म्हणाली,

"मलाही.. खूप खूप बरं वाटलं.. मी नक्की येईन."

"बाय." अदिती मिहिरच्या डोळ्यात डोळे घालून शांतपणे म्हणाली.

"बाय.. गाडीत बसलीस की कॉल कर." मिहिर तिरकसपणे म्हणाला.

"हो." तशी ती लिफ्टकडे वळली आणि बाय बाय करत गेली.

मिहिर अदितीची पाठमोरी आकृती पाहत होता. त्याला हे अपेक्षित नव्हतं. अचानक अदिती मध्ये झालेला बदल त्याच्या आकलना पलीकडचा होता. अदितीचा स्वभाव बोलका. खेळकर. मनमिळावू. पण आजच्या प्रसंगाने तो चांगलाच मनात गोंधळून गेला होता. तिचं असं जाणं त्याला अपेक्षित नव्हतं. मिहिरने त्याची नजर वळवली.

रोहिणी मिहिरकडे पाहत होती. ती पूर्णपणे शांत झालेली. रोहिणी आणि मिहिर दारातच होते. एकमेकांकडे पाहत होते. अदिती होती तेव्हा ते चांगले बोलत होते पण आता दोघंही शांत झालेले. एक प्रकारची शांतता त्यांच्यात निर्माण झालेली. आता काय बोलावं, कशी सुरवात करावी दोघांनाही कळत नव्हतं.

मिहिर पाठीमागे वळला. रोहिणीने दरवाजा बंद करून घेतला.

आणि..

इतका वेळ ज्या डोळ्यांनी आसवांची वाट रोखलेली ते बाहेर आले. तिने पळत जाऊन मिहिरला पाठमोरीच मिठी मारली.

"रोहिणी काय करतेस?"

रोहिणी काहीच बोलली नाही. तिचं रडणंच सगळं सांगत होतं. मिहिर पाठीमागे वळला. तसं तिने त्याच्या डोळ्यात बघितलं आणि तिचा हुंदकाचा

बाहेर आला. तिने त्याला कडकडून मिठी मारली. हरवलेली वस्तू अचानक सापडावी तसं तिचं झालेलं. तिच्या हृदयाजवळची हरवलेली वस्तू आज इतक्या वर्षांनी तिला मिळालेली.

रोहिणी हुंदके देत देत रडत होती. तिने मिठी सोडली नव्हती. मिहिर शांतच होता.

बऱ्याच वेळा नंतर रोहिणी शांत झाली. तिने तिचे डोळे पुसले. मिहिरच्या नजरेला नजर देऊन म्हणाली,

"मिहिर मला क्षमा कर.. मी तुझ्याशी असं वागायला नको होतं.. मला माफ कर."

मिहिरच्या डोळ्यात पाणी भरलं होतं. अकरा वर्षांपूर्वीचा तो काळ त्याच्या डोळ्यासमोर उभा होता. अकरा वर्षानंतर त्याची रोहिणी त्याच्या डोळ्यासमोर होती. त्याच्या मिठित होती.

पण सध्याची परिस्थिती बदललेली. काळ झपाट्याने बदललेला. मिहिर त्याच्या गंभीर नजरेनं तिच्या डोळ्यांत बघत होता. दोघंही एकमेकांच्या मिठित होते.

*****

# अतीत

अकरा वर्षांपूर्वी...

रोहिणी आणि मिहिर एकाच गावातले. अगदी घरा समोरचे. गावातल्या शाळेतच त्यांचं प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षण झालं. रोहिणी मिहिरपेक्षा दोन वर्षांनी मोठी. त्यामुळे अभ्यासात वगैरे मिहिरला तिची मदत व्हायची. दोघांची मैत्री अगदी चांगली होती. लहानपणापासूनच एकमेकांची संगत असल्यामुळे त्यांचं मैत्रीचं बाँडिंग चांगलं होतं.

तसंच त्यांच्या घरातल्यांचे संबंध ही चांगले होते. दोघंही शेतकरी कुटुंबातले. मिहिरचे वडील जरा रागीष्टच होते. बारीक सारीक गोष्टींचा त्यांना लगेच राग यायचा. आई तशी समजुतदार होती. रोहिणीचं कुटुंब ही चांगलं होतं. घरची परिस्थिती जरा गरीबीचीच होती.

रोहिणी लहानपणापासून हुशार असल्यामुळे घरच्यांच्या तिच्याकडून चांगल्याच अपेक्षा होत्या. तशी ती हुशार ही होती.

शाळा सुटली की मिहिर अभ्यासासाठी त्यांच्याकडेच असायचा. मिहिरला गणिताची भीती होती. गणित त्याच्यासाठी अवघड विषय होता. त्यामुळे त्याला वडिलांची भीती होती. कारण वडिलांचं म्हणणं असं की, बाकीचं काही नाही जमलं तरी चालेल पण व्यवहार आत्तापासूनच जमला पाहिजे.

त्यामुळे मिहिरच्या अभ्यासाची बैठक रोहिणीकडेच असायची. रोहिणी हुशार आणि समजूतदार असल्याने वडिलांना मिहिरची काळजी नव्हती. तिची बरीच मदत व्हायची अभ्यासात. रोहिणी सर्वांचीच लाडकी होती.

मिहिरचं दहावीचं वर्ष होतं आणि रोहिणीचं बारावीचं. बोर्डाचं वर्ष असल्याने अभ्यासाव्यतिरिक्त दुसरं काही करायचं नाही असा वडिलांचा धाक होता.

मिहिरला काही ते पटायचं नाही. खेळण्या-फिरण्याचं वय असल्याने तो दुर्लक्षच करायचा.

जितकी मजा करता येईल तितकी मजा करून घ्यायचा. मित्रांबरोबर पोहायला जा, क्रिकेटला जा, घोळक्यातून फिरा. जेवढं फिरता येईल तेवढं तो फिरायचा. घराकडं पाऊलच नाही.

साहामायीची परिक्षा झाली आणि मिहिरचा निकाल फार कमी लागला. जवळजवळ सर्व विषयात काटावरच होता.

शिक्षकांनी वडिलांसमोर चांगलीच प्रगती वाचून दाखवली.

"पोरगा हुशार आहे देशमुख साहेब.. पण संगतीनं बिघडेल बघा.. जरा लक्ष असू द्या.. यंदा दहावीचं वर्ष आहे."

मिहिरची वागणूक आणि शिक्षकांचा लाख मोलाचा सल्ला वडिलांना चांगलाच लागला. घरी येऊन वडिलांनी मिहिरला चांगलंच झापलं. पोरगा आता मोठा झाल्याने मारणं बरोबर नाही.. उगाच पोरगा हातचा जायचा म्हणून काही मारलं नाही.

मिहिरने तेवढ्यापुरतं ऐकून घेतलं आणि परत हुंदडायला सुरवात केली. असंच एकदा तो अभ्यासाच्या नावाने खोटं सांगून मित्रांबरोबर पोहायला गेला. भर उन्हात सर्व पोहण्याचा आनंद घेत होते. एक-एक मुलगा त्याचं पोहण्याचं कौशल्य दाखवत होता. सुरका मारणे, गड्डा मारणे, हनुमान उडी किती तरी प्रकार!

मिहिरच्या घरी कुणीतरी ही बातमी दिली. पाटलांच्या विहिरीवर पोरांचा दंगा सुरू आहे. असं कोणी तरी सांगून गेलं.

मिहिरच्या वडिलांना शंका आली. त्यांनी घरी विचारलं तर आईने,

"तो स्टडीला गेला." अस सांगितलं.

मिहिरच्या वडिलांनी खात्री करावी म्हणून चटकन आपली गाडी गावातल्या वाचनालयात वळवली.

वाचनालयात दोन चार म्हातारी माणसं सोडून दुसरं कोणी दिसत नव्हतं.

मिहिरच्या वडिलांना कळालं आपलं पोरगं नक्कीच दंगा करत असणार. त्यांनी लाकडाचा चांगला दांडका हातात घेतला आणि दारातच बैठक मारली.

थोड्या वेळाने मिहिर आला. वडिलांनी त्याला विचारलं.

"कुठं व्हतास?"

मिहिर बावचाळलां. काही तरी गडबड झाल्याची त्याला शंका आली.

"स्टडीला गेल्तो."

"कुठं?"

"वाचनालयात."

"वाचनालयात का हिरीवर?"

"नाय. वाचनालयात."

"मग कुठं दिसला नाईस?"

"तुम्ही कधी आल्ता?"

"मगाशी."

"मी उश्यरं निघालो.. आरदा तास आदीच."

"कुठं व्हतास मग..? काय करालतास?"

"ते आपलं.. ते आपलं ह्यांच्याकडं.." मिहिर बावचाळला..

एवढ्यात रोहिणी आली..

"दिलंस जर्नल स्नेहाला..? काय म्हणाली?"

मिहिर रोहिणीकडे चमकून बघू लागला. कोण स्नेहा? कुठलं जर्नल? त्याला काही कळत नव्हतं.

"दिलंस की नाही..? का आज पण विसरलास..?" रोहिणीने तिची एक भुवई उंच करत विचारलं.

"हां... होय.. ते.. दिलं.. दिलं.. हे काय आता तिच्याकडनंच आलो.

"काय म्हणाली का?"

"हां... उद्या येऊन भेटते बोलली.. विशेष काही नाही.."

"बर.. बरं केलंस."

मिहिरचे वडील शांतपणे त्यांच्याकडे पाहत होते. रोहिणी असल्यामुळे जे चाललंय ते खरंच असावं असं त्यांना वाटत होतं. मगाचपेक्षा त्यांचा चेहरा जरा बरा वाटत होता.

"सोने कुठं पाठवल्यालसं त्येला?" मिहिरचे वडील रोहीणीकडे नजर टाकत म्हणाले.

"मैत्रीणीकडं.. पाटिल आळीला.. माझं जर्नल द्यायचं होतं."

"बर बर.. ह्यो पव्हायला गेला नव्हता नव्हं?"

"नाय.. पव्हायला कशाला जातोय.. मी कशाला सोडतेय अन्.. परिक्षा आल्यात जवळ.. माझं काम होतं म्हणून मीच पाठवलेलं."

"बर बर.. असूदे असूदे.. काय असंल ती सांगत जा त्येला.. काय रं? आन ती सांगल ती समदं आयकायचं.. आलं का ध्येनात?"

"व्हयं." मिहिरने नुसतीच बोलून मान डोलावली.

"मी दिलेली गणितं केलीस?" रोहिणीने मध्येच विचारलं.

"हां केलीत की." मिहिर रोहिणीकडे बघत बोलला.

"खरं?"

"हां तर.. दाखवू का आता?" मिहिर बॅगला हात लावत म्हणाला.

"नाही नको.. आल्यावर बघते.. परवा शिकवलेला पायथागोरस प्रमेय आज न बघता सोडव.. मी येऊन बघेन."

"बर.. काल शिकवत होतीस तो पण सोडवू का?"

"काल काय शिकवलं?"

"तो होता ना.. कर्णाचा वर्ग इतर दोन बाजूच्या वजाबाकी एवढा असतो असं काही तरी.. तो शिकवत नव्हतीस का.."

रोहिणी गालातल्या गालात हसत होती..

"सोडव.. येतंय ते सोडवं.. मी बघते आल्यावर." तशी ती मिहिरच्या वडिलांकडे वळाली आणि म्हणाली,

"काका कुटं बाहेर निघालात?"

"व्हय.. का?"

"काही नाही.. मला सोडता जरा वाचनालयापशी?"

"सोडतो की.. जा आवर.. मी आलो चा S S घेऊन."

"बर.. मी आलेच." रोहिणी मिहिरला स्माईल देत देत त्याच्या डोक्याला टपली मारत गेली.

ती का हसली हे तिलाच माहित. मिहिरच्या वडिलांना कळालं असतं तर मिहिरची वजाबाकीच झाली असती.

रोहिणी देवासारखी धावून आलेली. मिहिर थोडक्यात वाचला होता. नाही तर वडिलांनी चांगलाच चोप दिला असता.

मिहिर रोहिणीवर खूष होता. संकटकाळी मदत करतो तोच खरा मित्र ही मैत्रीची व्याख्या त्याला खरोखर पटली होती. रोहिणीने मैत्री निभावली होती.

यामागे ही बऱ्याचदा ती मिहिरला छोट्या - छोट्या गोष्टीत मदत करायची. वडिलांपासून वाचवायची. त्याची बाजू सावरायची. पण तेव्हा तो लहान होता. त्यामानाने तो आता मोठा झाला होता. तरीही रोहिणी त्याला मदत करत होतीच. मिहिरला रोहिणीचं आसपास असणं, तिचं वावरणं आवडू लागलं. तिचं बोलणं, तिचं समजावणं, तिच हसणं सर्वच त्याला आवडू लागलं.

मिहिर रोहिणीच्या प्रेमात पडला. त्याने मित्रांच्यात जाणं कमी केलं. घोळक्यात तो दिसत नव्हता. शाळेतून घरी आलं की रोहिणी सोबत अभ्यासाला बसत होता.

रोहिणीलाही मिहिरची उपस्थिती आवडत होती. त्याची संगत हवीहवीशी वाटत होती.

कित्येकदा दोघं एकटेच अभ्यासाला बसत. खूप उशिरापर्यंत त्यांचा अभ्यास चाले. कधी कधी कंटाळा वाटू लागला की ते बोलत बसत. रोहिणी तिच्या स्वप्नांबद्दल सांगे. कॉलेज झालं की मी सीएचा अभ्यास करणार आहे असं बऱ्याचदा बोलत असे. मिहिर त्याच्या शाळेच्या गमती जमती सांगत असे.

दोघांनाही एकमेकांची सवय झाली होती. मिहिर दिसला नाही की रोहिणी अस्वस्थ होई. सारखी सारखी मिहिरच्या घरी येऊन चौकशी करी.

आणि तो आला की, कुठं होतास.. काय करालतास.. एवढा का उशीर.. म्हणून त्याच्यावर प्रश्नांचा भडिमार करी. त्याच्यावर लटका राग धरी. मग मिहिर तिची समजूत घाली.

रोहिणीला मिहिरमध्ये झालेला बदल जाणवत होता. तिला सगळं कळत होतं. पण तिला त्याचा राग नव्हता. तिला ही ते सर्व आवडत होतं. त्याचं असणं तिला हवं होतं. योग्य वेळ येताच आपण मिहिरशी बोलू असं ती मनाला सांगत होती.

त्यांच्यात दोन वर्षांचा फरक होता. रोहिणी मोठी होती. पण मिहिर आता लहान वाटत नव्हता. पूर्वीपेक्षा त्याच्यात चांगलाच बदल झालेला. तो झपाट्याने वाढलेला. तालमीत जाऊन त्यानं चांगलंच शरीर कमावलेलं. तो आता एखाद्या समंजस माणसासारखा वागत होता.

त्याच्यात होत असलेला बदल सर्वांसाठी अनपेक्षित होता. त्याला चांगलीच समज आलेली. वागण्याबोलण्याची रीत उमगलेली. थोरा मोठ्यांचा आदर कळत होता.

मिहिरला ही रोहिणी फार आवडत होती. तिची संगत त्याला हवीहवीशी वाटत होती. मिहिरला ही सर्व आता कळत होतं.

तो आता त्याची वेळ येण्याची वाट बघत होता. ती वेळ येताच तो रोहिणीला त्याच्या मनातलं प्रेम सांगणार होता. त्याला विश्वास होता की तिचा नकार त्याला मिळणार नाही. ती सुद्धा त्याच्यावर प्रेम करत असणार.

एके दिवशी वाचनालयात ते दोघंच होते. दुपारची वेळ होती. सर्वत्र शांतता होती. परिक्षांचा काळ सुरू होता. त्या दुपारी वाचनालयात म्हणावी तितकी पोरं नव्हती. उन्हांन जो - तो घरच्या घरी अभ्यास करत होता. होती ती पण पोरं जेवणासाठी घरी गेली होती.

मिहिर आणि रोहिणी एकत्रच अभ्यासाला जात असत. आणि तिथेच जेवत असत. त्यांनाही तेच आवडे.

ती वेळ मोक्याची होती. कोणी नाही ते बघून रोहिणीने ठरवलं की आज आपण बोलूच म्हणून. तसं तिने मिहिरला विचारलं,

"मिहिर".. तिने शांत नजरेनं त्याला आवाज दिला.

"काय?"

"एक विचारू?"

"तू मला विचारणार? तू तर आदेश दिला पाहिजेस." मिहिर हसत म्हणाला.

"नाही आज आदेश नाही. विचारायचंय मला काहीतरी."

"काय? कशाबद्दल?"

"आपल्याबद्दल."

"म्हणजे? आपल्याबद्दल काय?"

"आपल्या नात्याबद्दल."

"नात्याबद्दल?"

"होय. कोणतं नातं आहे आपल्यात?"

"कोणतं म्हणजे? तूला काय वाटतं कोणतं आहे?"

"तेच मी तुला विचारतेय बावळट कोणतं नातं आहे?"

"कोणतं म्हणजे? मैत्रीचं आणि कोणतं असणार?"

"मैत्रीचं.. फक्त मैत्रीचं." रोहिणीने तोंड बारीक करून विचारलं.

"होय."

"अजून कोणतंच नाही?"

"अजून अं..ब..."

"आता बहिण-भावाचं बोलू नकोस."

"हां S S हां S S.. का नाहीय का?"

"स्वत:लाच विचार.. कधी आयुष्यात माझ्याकडून राखी बांधून घेतलीस का?"

"अं.... आठवत तर नाही."

"कसं आठवणार? बांधलीच नाही."

"बहुतेक होय.. नाहीच आठवत."

"बहुतेक.. किती नाटकी आहेस रे.. सगळं माहित असून पण."

"काय माहित असून पण?"

"का माहित नाही तुला?"

"मला बहिणी खूप आहेत.. मला रोहिणी सारखी मैत्रीण हवी.. आता बहिण नको. असं तुच म्हणालास ना आईला?" रोहिणी जरा मिहिरची नक्कल करतच म्हणाली.

मिहिर चमकला.. आणि म्हणाला,

"हे तुला कसं माहित? खरं सांग चोरून ऐकतेस ना सगळं आमच्या घरातलं?"

"ए S S चल.. मला काय गरज पडलीय चोरून ऐकायची? मला काकीनेच सांगितलं."

"चल खोटं नको बोलू."

"खरंच रे.. खोटं नाही.. काकी मला सगळं सांगतात. माझ्याशी सगळं बोलतात."

"सगळं म्हणजे?"

"सगळं म्हणजे सगळं.. तुला काय करायचंय? असतं आमचं बायकांचं.. तू फक्त मी विचारलयं ते सांग."

"काय?"

"हेच आपल्यात कोणतं नातं आहे?" रोहिणी शांत होत मिहिरच्या डोळ्यात डोळे घालत म्हणाली.

मिहिर शांत झाला.. त्याला माहित होतं ते नातं बहिण भावाचं नव्हतं. असू शकतच नव्हतं.

त्याला ती मनापासून आवडत होती. मिहिरची मुद्रा गंभीर झाली आणि त्याच गंभीर नजरेनं तो म्हणाला,

"सखीचं"

"सखीचं" म्हणजे कसलं?

"सखी... तू माझी सखी आहेस रोहिणी."

"लहानपणापासून आपण एकत्र वाढलो.. एकत्र खेळलो.. एकत्र भांडलो.. एकत्र रूसलो.. एकत्र जेवलो.. एकत्र हसलो.. आता पण बघ आपण एकत्रच आहोत.. अभ्यास करतोय."

"रोहिणी, तू माझी सखी आहेस.. माझी बालमैत्रीण आहेस.. आपला बालमित्र कसा आपला सखा असतो तशी तू माझी सखी आहेस."

"सखी फक्त सखी?" रोहिणी प्रश्नार्थक नजरेने बघू लागली.

"होय सखी.. आणि.." मिहिर अडखळला.. थांबला.. तिच्याकडे शांत नजरेने पाहू लागला.

"आणि.. मिहिर..?"

"आणि जेव्हा योग्य वेळ येईल तेव्हा मी तुला माझी प्रेयसी बनवीन.. बनशील ना?"

रोहिणी लाजली. निसर्गत:च तिला लाभलेल्या गुलाबी शरीरावर गुलाबी काटा शहारला. गुलाबाची कळी खुलावी आणि त्याचं गुलाबीपण फुलावं तशी ती फुलली.

मिहिर तिच्याकडे पाहतच राहिला.

"असं काय बघतोयस?"

"तुला... तुला एक सांगू रोहिणी."

"हां"

"तू खूप सुंदर लाजतेस आणि लाजताना तू आणखीनच सुंदर दिसतेस."

"जा.." रोहिणी लाजली आणि तिने तिचं तोंड तिच्या ओंजळीत लपवलं.

मिहिरच्या चेहऱ्यावर हलकसं स्मित आलं. तो रोहिणीला न्याहळत राहिला.

"रोहिणी"

"काय?"

"मी जर तुझ्या जागी असतो ना तर लगेच तुझ्याशी लग्न केलं असतं."

"खरंच?"

"होय.. मी करणारच.. मी फक्त माझी वेळ येण्याची वाट पाहतोय.. ज्या दिवशी मी स्वत:च्या पायावर उभा राहिल ना.. त्या दिवशी तुझा हात मागायला येईन.. तू मला हो म्हणशील ना?"

रोहिणीच्या चेहऱ्यावर हसू होतं. तिचा चेहरा खुलला होता. तिला जे ऐकायचं होतं ते तिने ऐकलं होतं.

"सांग ना म्हणशील ना?"

"बघू..." रोहिणी भाव खात म्हणाली.

"बघू म्हणजे?"

"बघू म्हणजे बघू.. तू आधी ये तर माझा हात मागायला."

"आणि तेव्हा तू सांगणार मला?"

"हो.. म्हणजे विचार करीन.. मुलगा काय करतो.. किती कमावतो.. आणि कसा दिसतो.. वगैरे वगैरे.." रोहिणी हातवारे करत म्हणाली.

"अच्छा.. आणि मग तू ठरवणार.. कसा दिसतो काय?"

"होय.. म्हणजे तसंच.."

"स्वत: तर नकट्या नाकाची आहे.. आणि मी कसा दिसतो ते तू बघणार काय?"

"नकट्या नाकाची.. कोण मी? मला बोलला तू? आणि तू माकडा.. तू काय हां?" रोहिणीने आपला पाऊच फेकून मारला आणि म्हणाली,

"भूमिती आणि बीजगणित मधला फरक कळतो का तुला? मंद बुद्धी कुठला."

मिहिर जोरजोरात हसू लागला. रोहिणी त्याला काय-काय फेकून मारत असते. मिहिर स्वत:चा बचाव करत असतो. बसल्या जागीच त्यांचं गोड युद्ध सुरू असतं.

"अच्छा! अच्छा! सॉरी सॉरी.. नकट्या नाही बसक्या नाकाची." तसा मिहिर जोरजोरात पुन्हा हसू लागतो.

रोहिणी रूसते. गाल फुगवून बसते.

मिहिर शांत होतो.

"ओह! अरे बापरे! रूसली वाटतं.. खरंच रूसली की तोंडच असं आहे?"

रोहिणी एक तीक्ष्ण कटाक्ष टाकते आणि पाठ वळवून बसते.

मिहिर शांत होतो.

"रोहिणी.. सॉरी.."

रोहिणी काहीच प्रतिसाद देत नाही.

"खरंच सॉरी... मी असंच मस्करीत बोलत होतो."

रोहिणी काहीच प्रतिसाद देत नाही.. ती चांगलीच रूसलेली.

मिहिर उठून तिच्याजवळ जातो. ती उठते आणि दरवाजाच्या दिशेनं जाऊ लागते. मिहिर तिला अडवतो. तिचा हात धरतो. तिला जवळ ओढतो. आणि तो जे बोलतो ते ऐकून रोहिणीची कळी पुन्हा खुलते.

"रोहिणी.. तू खूप खूप सुंदर दिसतेस.. तू जितकी सुंदर आहेस ना त्यापेक्षा जास्त समजूतदार आहेस.. जर प्रेम व्यक्त करण्यासाठी आय लव्ह यू पेक्षा जास्त चांगला शब्द असता ना.. तर मी तुझ्यासाठी असंख्य वेळा वापरला असता.. आय लव्ह यू रोहिणी."

रोहिणी लाजली. तिने पाठीमागे वळून मिहिरच्या नजरेला नजर दिली आणि त्याच्या मिठित गेली.

काळ थबकला. वाऱ्याची झुळझुळ मंद गतीने होऊ लागली. रोमांचकारी वाटणारी शांतता अंगावर शहारा आणू लागली. वातावरणात गुलाबी छटा पसरली.

दोघंही भान विसरले होते. आपण कुठे आहोत याचं त्यांना भान नव्हतं. ते फक्त काळाच्या ओघात वाहत होते. एका रोमांचकारी काळात स्वत:ला सामावून घेत होते.

रोहिणी सावरली.

"कोणीतरी येईल.. जाऊ या आता आपण."

"ह्मममम.. ठीक आहे.. पुन्हा कधी येशील?"

"कुठे?"

"मिठित"

ती लाजली आणि म्हणाली,

"तू म्हणतोस ती वेळ आली की."

दोघंही खूश होते. एकमेकांप्रती त्यांचं प्रेम व्यक्त झालं होतं. दोघांच्याही मनाप्रमाणे सगळं घडत होतं. त्यांच्या प्रेमप्रकरणाची कोणालाच कल्पना नव्हती. ते जसे आधी वागत होते तसेच आता राहत होते. त्यांनी ठरवलेलं योग्य वेळ येताच घरच्यांना सांगून आपण विवाहबद्ध व्हायचं.

पण जेव्हा जेव्हा आयुष्यात आपल्या मनासारखं सगळं घडत आहे असं आपल्याला वाटत असतं तेव्हा तेव्हा ते तसं नसतं. नियती तिचा डाव तयार करत असते. काळ बदलण्यासाठी सज्ज होत असतो. आणि आपण सतर्क

नसतानाच तो बदलतो. नियती तिचा डाव खेळते. होत्याचं न्हवतं होतं. आपण सुन्न होऊन जातो.

आयुष्यात हे असंच घडत असतं.. असंच घडत राहणार.. हेच आयुष्य आहे..

बोर्डाच्या परिक्षा संपल्या. मुलांना त्यांचं आयुष्य घडविण्यासाठी वेळ मिळाला. कोणी खेळण्यात रंगलं. कोणी वाचनात रमलं. कोणी शिकवण्या लावल्या. कोणी फिरायला गेलं. कोणी कामावर गेलं.

रोहिणीने कोल्हापूरच्या कॉलेजात प्रेवश घेतला. तिथंच तिनं तिचं ग्रॅज्युएशन पूर्ण केलं. मिहिरने दहावी नंतर इंजिनियरिंग डिप्लोमा घेतला. त्याचं ॲडमिशन पुण्याला झालं. तो हॉस्टेलवर गेला.

रोहिणी आणि मिहिर यांचा कॉन्टॅक्ट होता. फोनवर बोलणं व्हायचं. कधी तरी भेटणं व्हायचं.

तो तिला एकदा कोल्हापूरात कॉलेजमध्ये भेटला तो शेवटचाच. तेव्हा त्यालाही ते माहित नव्हतं.

"पुढच्या महिन्यात सेमिस्टर झाली की लगेच येऊ."असं वचन देऊन तो पुण्यात आला.

त्यांनतर जवळजवळ पाच सहा महिने त्यांचं भेटणंच झालं नाही. फोनवरच काय असेल ते बोलणं. फोनवर रोहिणी शांत शांत वाटायची. कधी येणार कधी येणार विचारायची. मिहिर मात्र परिक्षा संपली की भेटू एवढच बोलायचा.

रोहिणी मात्र फोनवर काही तरी सांगायचं आहे, सांगायचं आहे असं बोलायची. आणि लगेच भेटल्यावरंच बोलू असं म्हणायची. मिहिरने काही ही गोष्ट मनावर घेतली नाही.

पण कधी कधी वरवर वाटणारी गोष्ट काळजात किती खोलवर जाऊन वार करते हे त्याला माहित नव्हतं.

आणि तसंच झालं.

गेले आठ दिवस रोहिणीचा पत्ताच नव्हता. फोन ही बंद दाखवत होता. मिहिरने तिची चौकशी केली. पण कोणालाही तिच्याबद्दल सांगता आलं नाही.

आणि एके दिवशी अचानक सकाळीच मिहिरला रोहिणीचा व्हॉट्सअप मेसेज आला. मेसेजची लांबी बघता तो मेसेज नसून एक प्रकारचं पत्रच होतं....

*प्रिय मिहिर*

*तुला कसं सांगायचं हे आता मला कळत नाहीय. तुला पटेल की नाही मला माहित नाही. पण मी जे सांगणार आहे ते खरं आहे. तुला मी म्हणत होते, मला काही तरी सांगायचं आहे म्हणून. पण ते इतक्या घाईने घडेल याची मला अजिबात कल्पना नव्हती. जे घडू नये ते झालं.*

*दोन दिवसापूर्वीच माझं लग्न झालं. तुला कळवण्याचा मी आतोनात प्रयत्न केला. पण मी अपयशी ठरले.*

*गेल्या दिवसांत माझ्या बरोबर बरंच काही घडलं. ते सर्व तुला सांगायचं होतं. पण ते जमलं नाही.*

*आता जे झालं ते तू किंवा मी बदलू शकत नाही.*

*का झालं? कसं झालं? कोण जबाबदार होतं? याचा विचार आता करू नकोस.*

*तुझं स्वप्नं तू पूर्ण कर आणि शक्य असेल तर मलाही विसरण्याचा प्रयत्न कर.*

*नियतीनं ठरवलं तर आपली भेट होईल नाही तर...*

*तुझीच सखी*

काळाने डाव टाकला. नियतीनं तिची चाल खेळली. वरवर वाटणारी गोष्ट खोलवर काळजात घुसली.

मिहिरच्या पायाखालची जमीन निसटली. त्याचे डोळे पांढरे फट्ट पडले. हात थरथरू लागले. घशाला कोरड पडली. डोकं भिरभिरू लागलं.

तो तसाचं पाठीवर उताणा पडला. धड बेशुद्ध ही नाही धड शुद्धीतही नाही. डोळे उघडे ठेवून तो निपचित पडून राहिला. त्याची नजर शून्यावर होती.

"आता कुठे प्रेमाची सुरवात होती. आता कुठे प्रेमाच्या विश्वात पदार्पण होतं. त्यात हे असं व्हावं."

"प्रेमाची सुरवातच त्याच्या अंतानं व्हावी? कसलं आपलं आयुष्य? काय होऊन बसलं हे? जिच्यावर जिवापाड प्रेम केलं तिनंच असा दगा द्यावा."

"कोणावर विश्वास ठेवावा या जगात. ज्याच्यावर आपण विश्वास ठेवतो तीच व्यक्ती आपला विश्वासघात करते."

"हेच खरं आहे. हेच होत आलंय. हेच होत राहणार.. हेच आयुष्य आहे."

"इथे कोण कोणाचं नाही. आपण स्वत:च स्वत:चे आहोत."

"नाही करायचं प्रेम.. कोणी नको मला.. मी एकटाच जगीन.. एकटाच राहीन.. नकोयस तू मला.. मी नाही ओळखत तुला.. नाही ओळखत."

रडत रडतच मिहिरला कधी झोप लागली त्याचं त्यालाही कळालं नाही.

मिहिर उठला तेव्हा त्याने आधी आईला फोन केला. रोहिणी बद्दल विचारलं. पण त्यांच्या घरचे एकाएकीच पाहुण्यांकडे गेल्याचं त्यांनी सांगितलं.

मिहिरने खूप चौकशी केली. पण त्याला रोहिणीबद्दल काहीच कळालं नाही.

कालांतराने मिहिरने तिचा विचार सोडून दिला. तो त्याच्या आयुष्यात रूळला. काळ त्याच्या गतीने चालत राहिला.

आपल्या आयुष्यात घडणाऱ्या बऱ्या वाईट गोष्टींचा प्रभाव फार काळ आपल्यावर राहत नाही. मग ते कितीही चांगलं असो वा वाईट. फार फार तर वर्षभर नाही तर एक दिवस. तो प्रभाव कमी होतोच.

त्यासाठीच ईश्वराने मानवाला विसरण्याची कला बहाल केली असावी.

ही कला कुणासाठी कधी चांगली ठरते, कधी वाईट ठरते. दु:खाच्या डोहात असणाऱ्यासाठी चमत्कार ठरते तर अहंकाराच्या गुर्मीत असणाऱ्यांसाठी त्यांचा कर्दनकाळ ठरू शकते.

मिहिर त्याचं दु:ख हळूहळू विसरत गेला. मिहिरला जगण्याची नवी दिशा मिळाली. स्वत:ला सिद्ध करण्याची आस मनी बाळगून तो धडपडू लागला.

नऊ वर्षांचा काळ सरला. मिहिरने इंजिनीअरींग पूर्ण करून युपीएससी करण्याचा नि:श्चय केला. प्रशासकीय सेवेत येऊन स्वत:ला झोकून द्यायचं असं त्यानं ठरवलं.

इंजिनीअरींगचं शिक्षण पूर्ण करून त्याने मुंबईत एक नोकरी मिळवली. नोकरी करत करतच तो युपीएससी परिक्षेची तयारी करू लागला.

अचानक एके दिवशी मिहिरला एका नंबर वरून सारखे सारखे कॉल येऊ लागले. समोरून कोणी बोलेनाच. गेले चार पाच दिवस असंच होत होतं. आधी त्यानं दुर्लक्ष केलं. मग नंतर नंतर त्याला काहीतरी गडबड असल्याचं जाणवलं.

एके दिवशी त्याच नंबरने पुन्हा फोन आला.

"हॅलो.." मिहिर म्हणाला.

"ए S लो S S S.." कोणीतरी लहान मुलीचा आवाज होता.

"कोण बोलतंय?"

"मी खु S ची S बोलते S S य"

खुशी.. कोण खुशी.. आणि इतकी लहान मुलगी आपल्याला का फोन करतेय? मिहिर विचारात पडला.

"खुशी कुठून बोलतेस तू?"

"घला S S तून"

"घरातून.." हं.. मिहिर गालातच हसला.

"खुशी.. कुणाच्या घरातून?"

"मा S द्या S S S.." आवाज इतका गोंडस होता की मिहिरची कळी खुलली.

"कोणाशी बोलायचंय बेटा तुला?"

"मला S S ना S S.. त्ने S आं S मावचीची बोलायतं S S य.."

"त्नेहा.. त्नेहा.." मिहिर विचारात पडला.. त्याला कळत होतं की हा रॉंग नंबर आहे म्हणून.. पण मुलीचा आवाज इतका गोड होता की त्याला काही सुचेचना.

"त्नेहा S S मावचीचा हा नंबल नाही. ती तल इथे नाही." मिहिर तिच्या सारखंच आवाज काढत, तिची नक्कल करत बोलला..

"मम्मा S S तल म्हणाली त्नेआं S S मावचीचा नंबल आहे."

"मम्मा..?"

मिहिर चमकला. तो एकदमच गंभीर झाला. त्याचा भूतकाळ त्याच्या डोळ्यासमोर उभा राहू लागला. त्याच्या डोक्यातली चक्र गरगर फिरू लागली.

त्नेहा.. स्नेहा.. जर्नल वाली स्नेहा.. रोहिणी.

रोहिणी तर नसावी म्हणून त्याला शंका आली. मग रोहिणी का बोलत नाही..? का तिची हिंमत होत नसावी..? का हा खरंच रॉंग नंबर असावा..? मिहिर गोंधळून गेला.. हवेत एक बाण मारून पाहावा म्हणून तो बोलला..

"खुशी बेटा मम्माला सांग, स्नेहा मावशीचं जर्नल माझ्याकडे आहे. ते मी उद्या घेऊन येतो."

फोनवरचा आवाज बंद झाला. बारीक आवाजात मुसमुसण्याचा आवाज येत होता. फोन कट झाला.

त्याला माहित होतं फोन नक्कीच स्पीकरवर असणार. म्हणून तो मुद्दामच स्पष्ट बोलला. त्याचा बाण निशाण्यावर लागला. त्याची शंका खरी ठरली.

ती रोहिणीच होती.. मिहिरला खात्री पटली.. नऊ वर्षानंतर तिला आज आठवण झालेली. पण आजचं का..? आणि ती का बोलली नाही..? का तिची हिंमत झाली नाही..? इतक्या वर्षानंतर तिला आजच का आठवण व्हावी..? का

ती कोणत्या संकटात असावी..? का तिला माझी मदत लागत असावी..? आणि तिची मुलगी.. किती गोड!

मिहिर नुसता गोंधळून गेला होता. त्यानं ठरवलं काही ही झालं तरी आपण तिला भेटायचंच.

ती म्हणाली होती, नियतीच्या मनात असेल तर आपली भेट होईल.. नाही तर..

मिहिरने एक दिर्घ श्वास घेतला. विचारातल्या चक्रातून त्याने स्वत:ची सुटका करून घेतली.

त्याचं लक्ष हातातल्या मोबाईल वर गेलं.. त्याच नंबर वरून एक मेसेज आला होता.

*****

# कैफियत

दुपारची ती गरम गरम हवा अंगाला चटके देऊन जात होती. सुर्यदेव त्याचं अस्तित्व सिद्ध करत होता. जमीन उन्हांनं तळपत होती. रविवारची ती दुपार आरामाचं वातावरण घेऊन आलेली.

मिहिर आणि अदिती टॅक्सीतून त्या पत्त्यावर जात होते. मिहिरने सकाळीच अदितीला मेसेज केलेला आणि सांगितलेलं की आपल्या दोघांना ह्या पत्त्यावर जायचंय. आणि अर्ध्या एक तासात परत यायचं आहे. त्याला माहित होतं अदिती नाही म्हणणार नाही. तसंच झालं.

मिहिर अदितीकडे आला तेव्हा ती तयार होऊनच बसलेली.

"हाSय... येऊ का?" मिहिर म्हणाला. आणि चप्पल काढत घरात आला. अदिती आरशासमोर बसलेली.

"ये ना.." अदिती हसली आणि म्हणाली.

"तयार होऊनच बसली आहेस. मला वाटलं तुझं अजून आवरायचं असेल."

"नाही कधीचंच आवरलं माझं. तुझीच वाट बघत होते."

"सॉरी मी तुझा दिवस खराब करतोय. मिहिर अपराधीपणाच्या भावनेने म्हणाला."

"काही तरीच बोलू नकोस... तसं काही नाही.. बस.. पाणी देते.."

अदितीने किचनकडे पाठ केली. मिहिर अंथरलेल्या चटईवर बैठक मारत बसला.

"घे.." अदितीने पाण्याचा ग्लास पुढे केला..

"कोणाकडे जायचं आहे?"

"मैत्रीण आहे एक.. खूप दिवसांनी भेटतेय.."

"अच्छा!"

"लांब आहे का इथून..?"

"नाही जास्त लांब नाही.. पोहचू लगेच.. सरबत करू थोडा..?"

"नाही नाही.. नको.. निघूया आपण.."

"बरं चालेल.. थांब मी पटकन आवरते.."

"आता काय आवरायचंय..? तयार आहेस ना.."

"हो रे.. केस विंचरते फक्त.. थांब.."

"अरे बापरे! म्हणजे अजून तासभर तरी जाईल.." मिहिर मान हलवत म्हणाला.

अदिती नुसतीच हसली.

"कशाला? राहू दे ना चांगली दिसतेस."

"बस.. जास्त वेळ नाही लागणार.." अदिती गालातल्या गालातच हसली.. आणि म्हणाली.

"खरं तर तू एकट्यानेच जायला हवंस.. तुझी मैत्रीण.. माझं काय काम आहे..?" अदिती कंगवा घेत म्हणाली.

"असू दे.. चल तरी पण.. मला ऑकवर्ड वाटतं.."

"ऑकवर्ड..? अरे मैत्रीण तुझी.. मला ऑकवर्ड वाटलं पाहिजे का तुला..?"

"असू दे.. तरी पण चल.." मिहिर शांतपणे म्हणाला..

"मी येते रे.. मी काही नाही म्हणत नाही.. मी जस्ट सजेस्ट केलं तुला.."

"कळालं तुझं सजेशन.." मिहिर मान हलवत म्हणाला.

"आवर गं बाई पटपट.. काय नटत बसलीयस..?" मिहिर मोबाईल मधणं डोकं वर घेत म्हणाला.

"झालं.. झालं.. झालं रे.. मी येते पण विसरू नकोस तू मला प्रॉमिस केलंयस आज."

"हां.. माहितीय मला.. आधी आपण तिच्याकडून जाऊन तर येऊ.. मग तू नेशील तिथे येईन मी.."

"हां.. मग ठिक आहे.. नंतर पल्टी मारू नकोस म्हणजे झालं.."

"अरे बाप रे! खऱ्याचा जमानाच नाही.. नाही मारणार गं पल्टी.. आणि कधी पल्टी मारली गं?"

"तर कधी मारली."

"किती वेळा मी तुला विचारलं.. पण तू जाऊया म्हणतोस आणि काही तरी कारण देऊन घरी पळतोस.."

"हां.. हां.. ठिक आहे.. मी काय मुद्दाम नाही करत.."

"मी कुठे काय म्हटलंय मग?"

"ह्मममम.. तू कुठे काय बोलतेस.. न बोलता चिमटे काढतेस नुसती.. तुला काय वाटलं मला कळंलं नाही काय तुझं म्हणणं.. पण आज बघ तू.. तू फक्त लिस्ट कर काय काय खायचं ते.. आज सगळी खाऊ गल्लीच फस्त करू.."

"ह्मममम.. बघू या ना.. "

"बघ.. बघ.."

"बघतेच आहे.." अदिती मिहिरकडे चेहऱ्यावर स्मित ठेवून बघत होती.

"बघून झालं असेल तर निघुया का? अदिती मॅडम प्लीज.." मिहिर हात जोडून आर्जवाच्या सुरात म्हणाला..

"ओह! यस... व्हाय नॉट..? कमॉन फॉलो मी.." अदिती हसत हसत दरवाज्याच्या दिशेला वळली.

मिहिर तसाच हसत हसत हात जोडून तिच्या मागे मागे गेला.

दोघंही घराबाहेर पडले. बराच वेळ त्यांना टॅक्सी मिळेना. रविवार असल्याने तशी रहदारी ही कमीच वाटत होती.

अदिती आणि मिहिर रोहिणीच्या घरी पोचले. रोहिणीला पाहून अदिती एकाएकी शांतच झाली. तशी ती कधी नव्हती. तिचा स्वभाव तसा बोलकाच होता. पण आज ती शांतच होती. ती शांत नजरेने त्या दोघांचं बोलणं ऐकत होती. त्यांना ऑब्झर्व करत होती.

रोहिणीला भेटून दोघंही निघणार होते पण अदितीचं असं खोटं बोलून जाणं मिहिरला कोड्यात टाकणारं होतं. अदिती असं कधीच वागली नव्हती. त्याच्यासाठी हे नवीनच होतं.   रोहिणीसमोर काही बोलता येत नव्हतं म्हणून तो काही बोलला नाही. अदिती रोहिणीशी चांगली मैत्री करून मिहिरला गोंधळात टाकून गेली.

मिहिरला पाहून रोहिणीचा अश्रूंचा बांध फुटला. काही क्षणासाठी दोघांच्याही डोळयासमोर त्यांचा भूतकाळ उभा राहिला. रोहिणी मिहिरच्या मिठित होती. रडून रडून तिची कांती लाल झाली होती. ती त्याची सारखी सारखी माफी मागत होती. मिहिर तिच्या डोळयांत डोळे घालून तिच्याकडे गंभीर नजरेने बघत होता. त्याच्या डोळयांत पाणी उभं होतं. तिच्याकडे तो भरल्या डोळयाने बघत होता.

किती तरी वेळाने रोहिणी शांत झाली. तिने मिहिरची मिठी सोडली आणि सोफ्यावर जाऊन बसली.

"कशी आहेस रोहिणी?" मिहिर तिच्या जवळ गेला आणि म्हणाला.

तिने नुसतीच मान डोलावली.

"शांत हो. किती रडशील आता."

रोहिणी तिचे डोळे पुसू लागली. तिची नजर खाली जमीनीवरच होती.

मिहिरची नजर आल्यापासूनच घरभर फिरत होती. त्याच्या नजरेला जे पडायलां हवं होतं ते काही अजून पडलं नव्हतं.

"तुझ्या घरचे कसे आहेत सगळे?" मिहिरने विचारलं.

"आई-बाबा?"

मिहिरने होकारार्थी मान डोलावली.

"त्यांना काय होतंय?" रोहिणी नाक मुरडतंच म्हणाली.

मिहिरच्या चेहऱ्यावर हसू आलं.

"अजून तशीच आहेस.. नकटी.."

रोहिणी हसली. किती तरी वेळाने तिच्या चेहऱ्यावर हसू आलं होतं. ती पुन्हा भूतकाळातली रोहिणी झाली.

"तू पण तसाच आहेस अजून.. पहिल्यासारखां.."

"कसं चाललयं तुझं मिहिर?" रोहिणीने विचारलं.

"आहे ते ठिकच आहे.. सध्या चांगली नोकरी आहे.. युपीएससीची परिक्षा देतोय.. म्हणावं तसं यश नाही अजून.. पण मी सुखी आहे.. जास्त पैसे कमवून तरी कोणाला सुखी करायचयं..?"

मिहिरच्या बोलण्याचा रोख रोहिणीच्या लक्षात आला.

"मला माहित आहे तू मलाच बोलतोयस.. माझ्यावर रागवलायस.."

"तसं काही नाही."

"तसंच आहे.. मी काय तुला आज ओळखत नाही."

"राग नाही.. कशाला रागवू..? तूच म्हणाली ना.. सॉरी तुझाच आदेश होता ना.. झालं गेलं विसर.. स्वप्नं पूर्ण कर.. तेच करतोय आता.."

"आदेश नाही.. प्रेम.."

"प्रेम..? कसलं प्रेम..? कोणतं प्रेम..? प्रेम हा शब्द तू निदान माझ्यासमोर तरी नको उच्चारूस."

"मिहिर.. फक्त एकदा ऐकून घे माझं. तुझा सगळा राग मला मान्य आहे. मी तुला कळवायलां हवं होतं. मी चुकले. पण एकदा मला माझी बाजू मांडू दे. प्लीज."

"आणि त्याने काय होईल.. भूतकाळ बदलेल."

"नाही बदलणार.. पण मला त्याचा फायदा होईल.. माझा वर्तमान, भविष्य बदलेल.. इतक्या दिवसांपासून माझ्या मनात साचलेलं कुठं तरी रिकामं होईल.. प्लीज.."

"तुझाच तर फायदा बघत आलीस तू.. माझ्या मनाचा विचारचं नाही केलास."

"तसं नको बोलू मिहिर.. तसं नाहीय.."

"तसंच आहे रोहिणी.. तू का नकार दिला नाहीस..? का मला सांगितलं नाहीस..? की तुला ही पैसे दिसले होणाऱ्या नवऱ्याचे.." मिहिर रागातच म्हणाला..

"मिहिर एक वेळ माझा जीव घे.. पण प्रेमाची तुलना ही अशी पैशानं नको करूस.. मी तुझ्यावर मनापासून प्रेम करत होते.. पैसे बघून मी प्रेम करणारी

नाही मिहिर.. मी तुला तशी वाटले का..? एकदा माझं म्हणणं मला मांडू दे मिहिर.. मग तुला हवं ते कर तू.. हवं तसं वाग तू.. प्लीज.."

रोहिणी फार काकुळतीला येऊन बोलत होती. तिच्या डोळयातून तिचा खरेपणा दिसत होता. ती समंजस होतीच. या क्षणी ती मिहिरचा राग ही समजून घेत होती. मिहिर इतक्या तुटक पणाने बोलत असून ही ती त्याच्याशी समजूतीने बोलत होती.

मिहिरला ही माहिती होतं रोहिणी कशी आहे ते. त्याला तिच्या डोळ्यात खरेपणा दिसत होता.

"बोल.. काय आहे तुझ्या मनात.. काय बोलायचंय तुला बोल.." मिहिरने होकारार्थी मान डोलावली आणि म्हणाला.

रोहिणी तिची कथा सांगू लागली.

"मिहिर तुला आठवतंय.. मी सीए होण्याचं तुला सांगितलेलं."

मिहिरने होकारार्थी मान डोलावली.

तू पुण्याला गेल्यावर मी खूप नाराज झालेले. मला जिथे तिथे तूच दिसत होतास. माझं मन तुझ्या भोवतीच फिरत होतं. ग्रॅज्युएशन झालं की पुढच्या तयारीसाठी आपणपण पुण्यालाच जायचं असं मी ठरवलं. तुझ्याजवळ येण्याच्या खुशीने मी खूप अभ्यास करू लागले.

पण माझ्या आयुष्याला नजर लागल्यासारखंच झालं. मी कोणाकडे बघत नव्हते. पण लोकांची नजर माझ्यावरून हटत नव्हती. जो-तो गावात माझीच चर्चा करू लागला. माझ्या घरात सर्वांना माझ्यावर विश्वास होता. मी कोणी वाईट मार्गाला लागणार नाही हे त्यांना कळत होतं.

पण लोकांच्यात सारखी माझ्याबद्दल चर्चा व्हायची. माझ्याबद्दल घरात विचारलं जायचं. मला स्थळं येऊ लागली. लग्नासाठी बोलणी येऊ लागली. मी घरात सरळ सांगितलं मला खूप शिकायचं आहे. मी एवढ्यात लग्न करणार नाही. स्वत: काही तरी बनून दाखवीन आणि मगच लग्नाचा विचार करीन. पण लोकांची तोंडं S S काही बंद होत नव्हती.

"पोरगी वयात हाय तवर लग्न उरका" असं जो-तो आमच्या बाबांना सल्ले देऊ लागला.

"पोरगी वाईट वळणाला लागायच्या आत तिचं चांगलं करा."

"शिकून काय करायचंय? सासरच्यांना चालेल का? आपण गरीब माणसं"

नको नको तसले सल्ले आमच्या बाबाला येऊ लागले.

बाबानं पण आपली जीभ वळवायला सुरवात केली. सारखं माझ्या मागे लागला. आधी आधी आई तरी माझी बाजू घ्यायची पण नंतर ती पण त्यांची री ओढू लागली.

"लगीन झाल्यावर सासरची माणसं शिकवतील" असं मला सांगू लागली. मी किती समजावण्याचा प्रयत्न केला पण माझं कुणी एक ऐकलं नाही.

"तुला स्नेहा माहित आहे?"

"हो.. तिचं काय?"

"तिने पळून जाऊन लग्न केलं."

"का S S य?"

"होय."

मी तिची मैत्रीण मी पण शिकून सवरून असंच काहीतरी करेन म्हणून आमच्या घरातल्यांनी हाय खाल्ली. माझ्या बाबाला वेडच लागलं. रोज उठून पाव्हण्यांच्याकडं जायचा. माझ्यासाठी चांगल्या घरातलं पोरगं बघा म्हणून सांगून यायचा.

मामानं एक स्थळ आणलं. मुलगा चांगला होता. आई-बाप अपघातात वारलेले. धन-दौलत चांगली होती. बाबा पैसापाणी बघून पार वेडा झाला. त्याला मी पसंत होते. बाबांना काय करू काय नको असं झालं. त्यांनी होकार दिला.

मी ठरवलेलं लग्न करीन तर तुझ्याशीच. मी लग्नासाठी तयारच नव्हते.

एके दिवशी घरच्यांनी आज्जीला बरं नाही म्हणून मामाकडं आणलं. तिथं जाऊन बघितलं तर चक्क लग्नाचं वातावरण. दोन दिवसांनी माझं लग्न

ठरलेलं. मी तिथून पळून तुझ्याकडे येण्याचा विचार केला. आणि मी पळालेही. माझ्या मामाच्या मुलीनेच मला तिथून पळून जायला मदत केली. पण माझी वेळ खराब होती.

आम्ही पकडले गेलो. मामाच्या माणसांनी आम्हांला ओळखलं. आम्हांला परत घरी आणलं. तेव्हापासून माझ्यावर घरातल्यांची पाळत होती.

मी लग्नाला तयारच नव्हते. बाबांनी खूप दंगा केला. मी जर नाही ऐकलं तर विष खाऊन आत्महत्या करण्याची मला धमकी दिली. माझं एक नाही ऐकलं. तुझ्या भल्यासाठीच आम्ही करतोय म्हणून माझ्यासमोर सगळ्यांनी हंबरडा फोडला. मी काय करणार मग. मलाच माघार घ्यावी लागली.

आता तूच सांग मिहिर मी काय करायला हवं होतं..? मी तुला कॉन्टॅक्ट करायचां खूप प्रयत्न केला पण मला त्यात यश नाही आलं. नशिबाची साथ नव्हती मला.

माझं लग्न झालं. कुणाला कानोकान खबर मिळाली नाही.

मिहिर एकटक रोहिणीकडे बघत होता. तिचं बोलणं ऐकून त्याला चांगलाच धक्का बसलेला. रोहिणीच्या आयुष्यात इतकं काही घडलं असेल हे त्याला माहित नव्हतं. रोहिणीच्या लग्नानंतर त्याचं तिच्याशी बोलणंच झालं

नव्हतं. एकदा त्याच्या आईने त्याला रोहिणीच्या लग्नाची माहिती दिली होती. पोरगा चांगला श्रीमंत घरातला आहे असं बरचं काय काय सांगत होती. मिहिरने त्यानंतर रोहिणीचा विषय सोडलेला.

तिची कैफियत ऐकून तो चांगलाच आवाक झालेला. त्याला आता स्वत:वरच राग येत होता. रोहिणीची कथा एखाद्या चित्रपटाप्रमाणे वाटत होती. रोहिणीचं बोलणं खोटं नाही हे त्याला तिच्या डोळ्यात दिसत होतं. रोहिणी खोटं बोलून फसवणाऱ्यांतली नाही हे त्याला चांगलं माहित होतं.

"एवढं सगळं तुझ्या आयुष्यात घडलं रोहिणी.. तू कधी सांगितलं नाहीस?"

काय सांगणार मिहिर.. तुझ्या विरहाने मी पुरती खचलेले. मला तुला अजून त्रास द्यायचां नव्हता. आणि मी खरं तर माझ्या घरी यायचं ही सोडलेलं. लग्नानंतर मी माझ्या आई-बाबांशी बोलणं सोडलेलं. एकदा माझ्या इच्छेविरूद्ध मी गावी आले होते. दोन तीन वर्षानंतर पहिल्यांदाच आलेले. ते ही तुझ्यासाठी. तू फक्त एकदा मला दिसावास असं मला वाटत होतं. तुला फक्त एकदा भेटून मला सर्व काही सांगायचं होतं. तुला तुझ्या रोहिणीने दगा दिला नाही काळाने तिच्यावर घात केला असं मला सांगायचं होतं. पण तुझी भेट नाही झाली.

काकींना भेटले मी. त्यांनी माझं दु:ख ओळखलं. त्यांच्या गळयात पडून खूप रडले. काकींना खूप वाईट वाटलं. त्या मला काय म्हणाल्या माहितीय,

"माझा मिहिर अजून शिकतोय तो जर नोकरीला असता ना तर मीच तुला माझी सून म्हणून केली असती. तुझ्या बापानं एवढी घाई करायला नको होती. चुकलंच तुझ्या बापाचं. लोकांना काय गं S S दहा तोंडं S S.. आपल्याला बुद्धी नको का.. चांगल्या पोरीच लुकसानं केलं."

"पैशानं पोट भरत असतं तर लय झालं असतं.. मला माहित हाय पैसं बघूनच तुझा बाप पागल झाला. जल्मात एवढा पैका बघितला नसल त्यानं."

"आता पोरी झालं गेलं ते इसर.. सौंसारात मन रमीव.. तिथंच तुला आता जलम घालवायचा हाय.."

काकींनी मला खूप समजावलं.. आईची माया दिली.

मी तुझ्याबद्दल त्यांना विचारलं. पण तू पण घरी भांडून मुंबईलाच गेल्याचं सांगितलं.

काकींना तुझ्या आणि माझ्या दोघांच्याही बापाच्या नावानं बोटं मोडली. मला फार वाईट वाटलं. एका क्षणासाठी वाटलं मी जर असते तर कदाचित तुझ्यावर ही वेळ आली नसती. मी तुझी बाजू काकांना पटवून दिली असती. पण काय करणार. माणसाच्या आयुष्यात वाईट वेळ काही सांगून येत नाही.

मिहिर नकळत त्याच्या भूतकाळात गेला. त्याच्या डोळयात टचकन पाणी आलं. रोहिणीने त्याचा हात हातात घेतला. दोघंही एकमेकांकडे पाहू लागले.

माझं काही नाही रोहिणी पण तुझ्या बाबतीत तरी असं व्हायला नको होतं. खूप वाईट झालं. तुझ्या बापानं एवढं नाटक करायला नको होतं.

मिहिरला रोहिणीच्या वडिलांचा खूप राग आला. एवढ विष खाऊन आत्महत्या करीन वगैरे एवढ करायला नको होतं. हा काय साठ सत्तरचा काळ नव्हता.

आज कालचे आई-बाप किती हुशार! पोरांना त्यांच्या पायावर ऊभं करतात. त्यांना पाठिंबा देतात. लग्न पण पोरांच्या मर्जीनेच होतात. हिचा बाप नेमका कुठून आलता.

रोहिणी शून्यात पाहत होती. मिहिरने रोहिणीच्या दंडाला सहानुभूतीपूर्वक हात लावला. रोहिणी भावूक झाली. ती पुन्हा त्याच्या मिठित गेली.

"रोहिणी"

"ह्मममम"

"तुझे मिस्टर काय करतात?"

"ते आता या जगात नाहीत."

"का S S य...?" मिहिरला मोठा धक्काच बसला. तो जवळजवळ ओरडलाच.

"काय सांगतेस..? कसं काय..? कधी झालं हे.."

"त्यांचा कपड्यांचा मोठा व्यवसाय होता. गारमेंटचे कारखाने होते. सर्व कर्जात गेलं."

"म्हणजे काय झालं काय नेमकं."

सर्व काही सुरळीत चाललेलं. व्यवसायात पण चांगली भरभराट होत होती. कोणत्या गोष्टीला कमी नव्हती. पण म्हणतात ना पैसा जितका चांगला तितका वाईट. तसंच झालं. पैशानं भले भले बिघडले. माझा नवरा काय मग.

त्याला वाईट वाईट सवयी होत्या. लग्नानंतर बऱ्याच गोष्टी मला कळाल्या.

"ड्रिंक करत होते ते..?"

"होय.." म्हणजे तसं प्रमाणात असायचं. त्यामुळे कधी भांडणं झाली नाही आमच्यात.

पण जितक्या तेजीने ते वर जात होते. ते कोणाला बघवत नव्हतं. त्यांच्या लाईनमधली माणसं त्यांच्यावर जळत होती. त्यांचं यश लोकांच्या डोळ्यात खुपत होतं. त्यांनी कोणाकडे लक्ष नाही दिलं. त्यांचे शत्रू वाढत होते.

"काय नाव होतं तुमच्या कंपनीचं"

"संरजामे इंडस्ट्रीज"

"काय..?" मिहिर रोहिणीकडे आश्चर्याने पाहू लागला.

"होय"

"तुझं लग्न मोहित संरजामेशी झालेलं?"

"होय.. का..? तू ओळखायचांस त्यांना."

"नाही.. म्हणजे पर्सनली नाही.. पण त्यांच्याबद्दल बरंच वाचलं मी. फार कमी वयात त्यांनी हे यश मिळवलेलं."

"होय.. त्यांचा गारमेंटचा पारंपारिक व्यवसाय होता. वाडवडलांपासून त्यांचा व्यवसाय चालत आलेला."

मिहिर रोहिणीकडे गंभीर नजरेने पाहत होता. त्याच्यासाठी हे सर्व नवीन होतं. मोहित सरंजामे बद्दल तो बरंच वाचत आलेला. त्याच्या यशाचं कौतुक त्याला वाटत होतं. पण एवढ्या मोठ्या माणसाशी रोहिणीचं लग्न झालं याची त्याला मुळीच कल्पना नव्हती. त्याला चांगलाच झटका बसलेला.

"काय झालं मिहिर.."

"काही नाही.. माझा तर विश्वासच बसत नाहीय."

"का?"

"नाही म्हणजे.. तुझ्याबद्दल मला काहीच माहित नाहीय.. तुझ्या लग्नानंतर ही मला काही कळालं नाही."

"कसं कळणार..? आपण कुठे कॉन्टॅक्ट मध्ये होतो."

"होय पण निदान लोंकाकडून तरी मला कळायला हवं होतं. तुमच्या लग्नाचीपण कुठे जास्त चर्चा झाली नाही."

होय.. आमचं लग्न फार साध्या पद्धतीने झालं. फार म्हणजे फारचं. ज्या वर्षी माझं लग्न झालं त्याच वर्षी मोहितच्या आईवडलांचा अपघाती मृत्यू झाला. त्यामुळे लग्न साधंच झालेलं.

"अच्छा! काय झालेलं मोहित बरोबर..?"

आईवडलांनंतर मोहितने व्यवसायावर चांगलं लक्ष दिलं. फार कमी वेळेत त्याने व्यवसाय वाढवला. पैसा जसा वाढत होता तसं त्याचं वागणं बदलत होतं.

दारूचं चांगलंच व्यसन जडलं त्याला. आणि एके दिवशी दारूनेच घात केला..

"ॲक्सिडंट"

"होय"

वाचलं मी पेपरात. मलाही तेव्हा खूप मोठा धक्का बसला. एवढा चांगला तरूण यशस्वी मुलगा. वाईट वाटलं मला. पण रोहिणी तुझा या गोष्टीशी

काही संबंध असेल असं मला वाटलं नव्हतं. खरंच. तुझं मोहितशी लग्न झालं असेल. याची मला अजिबात कल्पना नव्हती.

रोहिणी शांत होती. ती काहीच बोलली नाही.

"आणि तुमचा व्यवसाय कोण पाहतं मग."

"आता काही उरलं नाही. काहीच राहिलं नाही त्यांच्या पाठीमागे."

"म्हणजे?"

"म्हणजे सर्व कर्जात गेलं. पैशाच्या ताकदीवर ते चांगलेच पेटून उठले होते. त्यांनी बऱ्याच ठिकाणी इनव्हेस्टमेंट केली. पण नंतर नंतर त्यांची कंपनी लॉसमध्ये जाऊ लागली. त्यांनी कर्ज काढून लॉस भरण्याचा प्रयत्न केला. या टेंशनमध्येच त्यांचं ड्रिंकच प्रमाण ही वाढलेलं."

"एकदा मुंबईवरून इकडे येतानाच त्यांचा अपघात झाला. दारू पिऊन अपघात झाल्याचं पोलिस तपासात कळालं. त्यांच्या नंतर पाठीमागे काहीच राहिलं नाही. सर्व गेलं."

"कसं सांभाळंस तू सगळं रोहिणी?"

रोहिणी काहीच बोलली नाही. ती शून्यात पाहत होती.

मिहिर आता शांत झाला. रोहिणी त्याच्या मिठित शांत होती. त्याच्या कुशीतली ऊब किती तरी वर्षांनी तिला मिळत होती. त्याच्या कुशीतून बाहेर यावंसच तिला वाटत नव्हतं.

रोहिणी हळूहळू मिहिरच्या कुशीत शिरू लागली. मिहिर अवघडला. त्याला जे होतंय ते बरोबर वाटत नव्हतं. रोहिणी जरी त्याची प्रेयसी होती तरी आता वेळ बदललेली.

मिहिरने हळूच तिला बाजूला सारलं. ती त्याच्या डोळ्यात बघू लागली. त्याच्या जवळ जवळ जाऊ लागली. रोहिणी त्याच्या ओठांजवळ येऊन थांबली. मिहिर अवघडला. तो तिच्यापासून दूर झाला.

रोहिणी त्याच्या जवळ गेली. तिने त्याला कडकडून मिठी मारली. तिला आता त्याचा दुरावा सहन होत नव्हता. त्या शरीरावर फक्त त्याचा अधिकार होता तो अधिकार तिला त्याला द्यायचां होता. तिने तिचे ओठ त्याच्या ओठांजवळ नेले.

मिहिर मागे सरला.

"नाही रोहिणी."

"का?"

"बस नाही.. हे बरोबर नाही."

"आणि माझ्याबरोबर झालं ते.. ते बरोबर होतं?"

"नाही.. ते चुकीचं होतं.. वेळ चुकीची होती.. त्याला आता आपण काही नाही करू शकत.. पण हे नको."

"का?"

"बस नाही.. आता माझा तुझ्यावर अधिकार नाही. तू माझी होतीस तेव्हा ही तुझा गैरफायदा घेतला नाही. आणि आता तर तू माझी नाहीसच.. माझ्याकडून हे होणार नाही."

"मी आजही तुझी आहे मिहिर."

"नाही रोहिणी.. आता वेळ बदलली आहे.. नको आता काही बोलूस.. तुझं दु:ख मी समजू शकतो.. पण तुझा असा गैर फायदा घ्यायला मी आलो नाही."

"असं नको बोलूस मिहिर... मी थोडी असं म्हणाले.. माझं चुकलं.. मी असं करायला नको होतं.. पण मी काय करू.. मला राहवलं नाही.. मी आपोआप तुझ्याकडे आकर्षित झाले. मला माफ कर.. मी चुकले.. पण असा रागवू नकोस."

"नाही.. मी रागवत नाहीय.. तुझ्यावर का म्हणून रागवू.. तुला माझ्याप्रती असणारं आकर्षण मला ही होतंच तुझ्याप्रती.. पण रोहिणी ती वेळ वेगळी.. आत्ता काळ बदलला आहे."

"होय मिहिर.. ती वेळ.. तो काळ.. तो आपला होता.. त्याला नजर लागली.. तो आता नाही येणार. काळाची भिंगरी अशी उलटी फिरवता आली असती तर किती बरं झालं असतं!

"दोघांच्याही डोळ्यात पाणी आलं. दोघांनी एकमेकांना मिठी मारली. दोन मित्र पुन्हा भेटले."

"रोहिणी पुढच्या जन्मात तरी माझी होशील ना..?"

"ते माझ्या हातात नाही पण निदान या जन्माचं तरी आहे."

"म्हणजे?"

"म्हणजे निदान या जन्मात तरी मी तुझ्यासाठी चांगली मुलगी पाहू शकेन."

मिहिर हसला आणि म्हणाला,

"या जन्मात काय कोणीतरी भेटेलच की."

"कोणीतरी कशाला.. मला माहित आहे ना कोण ते"

"कोण?"

"तुला ही माहित आहे कोण ते."

"कोणाबद्दल बोलतेस?"

"अदिती"

"अदिती.. तिचं काय..?"

"तिचं काय.. लय नाटक नको करूस.. मला माहित आहे. तुमचं चालू आहे ते."

"चल.. काही तरी काय बोलू नकोस.. ती फक्त माझी मैत्रीण आहे."

"कोणाशी खोटं बोलतोयस.. माझ्याशी?"

"तुझ्याशी कशाला खोटं बोलू..? तसं काही नाहीय..?"

"अजूनही तुला खोटं बोलता येत नाही".

"खरंच तर.. तसं काही नाही.."

"बर... तुला तसं वाटत असेल.. ठीक आहे.. तू नको सांगू मला.. पण अदितीच्या बाबतीत तरी असं नाही.."

"म्हणजे?"

"म्हणजे.. म्हणजे.. तुला काहीच कळत नाही. सगळं फोडून सांगावं लागतं."

त्यांच्यातला मित्र जागून उठलेला. ते परत त्यांच्या वेळेतल्या मैत्री प्रमाणे वागत होते.

"अरे तिचं प्रेम आहे तुझ्यावर.. तसं तुझं ही आहेच पण तू मान्य करत नाहीयस.. कळतय मला.."

"तसं काही नाही.. आम्ही फक्त मित्र आहोत. आणि माझ्या मनात तसं काही नाही."

"पण तिच्या मनात तर आहे ना."

"कशावरून.. कशावरून बोलतेस हे..? दहा पंधरा मिनीटांची तुमची ओळख."

"ओळखीचं सांगू नकोस.. प्रेम कळण्यासाठी एक नजरच पुरेशी आहे. तुम्हांला बघूनच समजलं मला."

"काही तरीच बोलतेस तू."

"काही तरी नाही खरंच बोलतेय मी.. तिचं तुझ्यावर प्रेम आहे. तिच्याकडे बघूनच मला समजतं ते. मला वाटलं तू एकटाच येशील. पण तिला बघून मला काहीच सूचेना. मला वाटलं तुम्ही असाल रिलेशनशीपमध्ये. तुम्ही सांगाल मला तुमच्याबद्दल.. तर सगळं उलटंच. तुमची तर अजून सुरवात पण दिसत नाहीय.. हो ना..?"

"च् च्... उगाच मनचं काहीपण बोलू नकोस.."

"मग तू वेंधळट आहेस. तुला तिचं प्रेम दिसत नाहीय.."

"तुला कुठं दिसलं ग एका दिवसात तिचं प्रेम..?"

"प्रेम केलेल्यांनाच कळतं ते तुला नाही कळणार.." रोहिणी आता चांगलीच रंगात येऊन बोलत होती.

"होय बाई तुझचं तेवढ प्रेम होतं.. आमचं काय नव्हतंच.."

"अरे तसं नाही रे.. माझ्याबद्दल नाही म्हणाले मी.. "तिच्याबद्दल बोलतेय मी.. खोटं नाही सांगत. तू आणि मी जेव्हा बोलत होतो ना तेव्हाच

तिला आपल्याबद्दल शंका आली असणार.. आणि मी इथे काय करतेय म्हणून ती खोटं बोलून निघून गेली असणार बघ.. मी सांगतेय.."

मिहिर चांगलाच चमकला. हिला कसं समजलं ती खोटं बोलून गेली ते. का रोहिणी बोलतेय ते खरंच आहे.. खर तर, खरंच आहे आपण मान्य करत नाही एवढंच.

मिहिरचं अदितीवर प्रेम आहेच आणि तिचं ही आहे हे ही त्याला माहित आहे पण तो कबूल करत नाही एवढंच.

"कशावरून खोटं बोलून गेली म्हणतेस..?

"का..? खरं आहे ना मी बोलते ते.. तूच सांग ती खरोखर गावी जाणार आहे का..?"

"मला नाही माहित.. ती असं काही बोलली नव्हती.. आजचा आमचा वेगळाच प्लॅन होता.."

"आता तूच बघ मग.. मला सांग, माणूस सुट्टी बघून गावी जातं का सुट्टी झाल्यावर.. तिला जायचंच असतं तर शुक्रवारी गेली असती ना.. दोन दिवस गावी राहून आली असती. आज रविवारची कशी जाईल.. पुढचे दोन दिवस खाडे टाकून."

मिहिर गालातच हसला. अदितीची चोरी रोहिणीने पकडली होती. पण तो काही बोलला नाही.

"काय खरं आहे ना..?" रोहिणी भुवया उडवून म्हणाली.

मिहिर शांत होता. मनातल्या मनातच त्याचं बोलणं सुरू होतं.

"मिहिर... प्रेम लपवता येत नाही. ते डोळ्यातच दिसतं. आणि तुला जितकं मी ओळखते तितकं कोणी ओळखत नसेलच. बालमैत्रीण आहे मी तुझी.. अदितीचं विचारशील, तर तू तुझ्या मनालाच विचार.. तुला उत्तर मिळेल."

"मिहिर.." रोहिणी म्हणाली.. "बघ एकदा वेळ झाला म्हणून आपली गाठ नाही पडू शकली. आता पुन्हा तसं नको. तुझ्या बाबतीत तरी नको. मलाच फार वाईट वाटेल."

"मी विचार करतो."

"आता कसला विचार..?"

एवढ्यात दारावरची बेल वाजली. रोहिणी उठून दरवाजाजवळ गेली.

मम्मा मम्मा करत फोनवरची ती गोड मुलगी होती. सोबत कोणी तरी एक मुलगी होती.

"खुशी बघ.. आपल्याकडे कोण आलंय..?"

"मिहिल का S का S S.." ती त्या इवल्याश्या तोंडाने म्हणाली आणि पळत पळत येऊन ती मिहिरच्या कुशीतचं शिरली.

मिहिरला आर्श्चयच वाटलं. ओळख नसताना ही एवढा जिव्हाळा..

"खुशी कशी आहेस..?"

"तान.. तुम्ही?"

"मी पन तान." मिहिर तिच्या वयाचा होऊन म्हणाला.

"कुठे गेलेली..?"

"फिलायला"

"अरे वा! एकटी एकटी"

"दिदि बलोबल.."

"अरे त्यांची आज पिकनिक होती." रोहिणी खुशीला जवळ घेत बोलली.

"खुशी चल आधी फ्रेश हो.. बाहेरून आली ना.. मम्मा नी काय सांगितलंय.."

तशी खुशी मिहिरकडे बघायला लागली.. मिहिरने तिला परत जवळ घेतलं. त्याच्या बॅग मध्ये हात घालून त्याने एक मोठी कॅडबरी आणि एक छोटा टेडी बाहेर काढला आणि खुशीला दिला.

खुशी खूष झाली.

तो आल्याआल्याच तिला देणार होता. पण त्याला ती दिसलीच नव्हती. त्याची नजर सारखी सारखी तिलाच शोधत होती.

"रोहिणी.." मिहिरने हाक दिली.

"हां बोल.. ते बघ.. ती किती खूष झाली.."

"होय"

"रोहिणी खुशीचं काय करतेस मग.. ती कुणाजवळ असते..?" मिहिरच्या बोलण्यात काळजी दिसत होती.

"तिला अरे मी बेबी सीटिंग मध्ये ठेवते. इथे जवळच आहे एक मुलगी.. मराठीच आहे.. ती देते लक्ष."

"अच्छा.. आणि जेवणाचं वगैरे.."

"मी सकाळीच सगळं करते ना.. तिला पण डबाच देते.. आणि ती मुलगी चांगलं लक्ष देते.. काय हवं नको ते बघते.. काय तक्रार नाही तिची.."

"कशी असणार.. खुशी किती गोड आहे!"

"होय अरे.. खुशीला पण आवडतं तिच्याजवळ.. तिला ना सतत कोणतरी लागतच.. लगेच जीव लावते ती.. आता पण बघितलं ना कशी तुझ्या जवळ आली पटकन.."

"होय.." तसं म्हणत त्याने खुशीला परत जवळ घेतलं.

"आवडलं तुला खुशी?"

"हां... मादाकले ना थूप थूप तेदी बियल आहे.. मम्मा ने दिले.."

"हां.. तुला आवडतात टेडी?"

"हां.. थूप.."

"ठिक आहे.. मी तुला अजून घेऊन देईन हां.."

"थांकक्रू..." तशी खुशी हसली आणि म्हणाली.

"थँक् यू..! थँक् यू नको मला.. मला पप्पी पाहिजे.." मिहिर आपला गाल पुढे करत म्हणाला..

खुशीने एक गोड पप्पी त्याला दिली. मिहिरने खुशीला जवळ घेतलं. तिच्या गालावर किस केलं. तिला मांडिवर घेऊन तिच्या डोक्यावरून हात फिरवला.

"रोहिणी कसं मॅनेज करतेस सगळं? घर, नोकरी, खुशीचं.. कसं जमतं सगळं?"

"जमतं.. करायला लागलं की सगळं जमतं.. जमवावंच लागतं."

मिहिरला रोहिणीसाठी वाईट वाटत होतंच. पण तिचा अभिमानही वाटत होता. एवढ होऊनही ती तिचं आयुष्य अगदी नॉर्मल असल्यासारखं जगत होती. जणु काही झालंच नाही असं.

मिहिरला रोहिणीबद्दल खूपच अभिमान वाटू लागला. रोहिणी सारखंच आयुष्याला भिडलं पाहिजे. मन घट्ट केलं पाहिजे. धीट राहिलं पाहिजे.

त्या दिवशी त्याने खूप गप्पा मारल्या. खुशी बरोबर तो खूप खेळला.. हसला.. तिच्यात रमला. रोहिणी आणि मिहिर बऱ्याच वर्षानंतर एकत्र होते.

मिहिरने रोहिणीच्या हातचं खाल्लं. त्याला खूप आवडलं. तिच्या हातची चव जशीच्या तशी होती. आजही ती तितकंच सुंदर जेवण करत होती.

त्या दिवशी तो बरंच काही शिकला होता. आयुष्यातल्या बऱ्या वाईट प्रसंगाला कसं सामोरं जायचं हे नव्याने तो रोहिणी कडून शिकला होता.

एक प्रेम तर आपण गमावलं आहे आता दुसरं नाही गमवायचं असं मनातल्या मनात ठरवून तो त्याच्या घरी गेला.

*****

# दास्तान

दिवसभर तापून लाल झालेला तो सूर्याचा गोळा समुद्रात डुबत होता. संपूर्ण आकाश तांबूस रंगाचं झालेलं. समुद्र किनाऱ्यावरची ती थंडगार वाऱ्याची झुळूक अंगाला गोडसर स्पर्श करून जात होती.

मनाला अत्यानंद देणाऱ्या अशा निसर्गरम्य ठिकाणी अदिती एकटीच येऊन बसलेली.

जेव्हा जेव्हा तिला एकटं एकटं वाटू लागतं तेव्हा ती नारळी बागेत येत असे. सूर्यास्त होत असतानाचं ते दृश्य तिला खूप आवडे.

आज ती जरा उदास उदासच होती. जेव्हापासून ती रोहिणीच्या घरून निघाली तेव्हापासून शांतशांतच होती. एखादी मौल्यवान वस्तू आपल्या हातातून निसटत चालली आहे आणि आपण काहीच न करता फक्त पाहत आहोत असंच तिला वाटत होतं.

खरं तर रविवार तिच्यासाठी आनंदाचा दिवस असतो. या दिवशी ती मुंबईतल्या कुठल्या ना कुठल्या ठिकाणी खाण्याचा आस्वाद घेत असते. अदिती फुडी स्वभावाची होती. तिला खायलां आवडत असे. रविवारचा दिवस ती मजेत घालवत असे. संध्याकाळच्या वॉकला शिवाजी पार्कला जात असे. वॉक घेऊन नारळी बागेत सूर्यास्ताचा मनमुराद आनंद घेत असे.

पण आज तिचं कशातच मन लागत नव्हतं. काहीच करू वाटत नव्हतं. साधा वॉक ही नाही.

ती बाकड्यावर शांत बसून होती. तिची नजर समुद्रात खोलवर जात होती. समुद्राच्या लाटांनी हेलकावे घ्यावेत तसं तिचं मन हेलकावे घेत होतं.

"कोण असेल ती? खरंच त्यांच्यात कसलं नातं असेल का? मिहिर माझा होईल ना? त्याला मी आवडत असेल ना? की त्याला माझ्या बद्दल काहीच वाटत नसेल? काहीच कळत नाही. त्याचं वागण कधी कधी कळतंच नाही. तो सर्वांशीच असा आपलेपणाने वागतो की फक्त माझ्याशी?"

अदिती मनातल्या मनातच बोलत होती. आजच्या प्रसंगाने तिच्या मनात बरेच प्रश्न उभे केलेले.

सकाळी जेव्हा मिहिरचा मेसेज आला तेव्हा ती खूप आनंदी झाली. आजची सुट्टी त्याच्याबरोबर घालवता येईल म्हणून तिचं मन आनंदी झालेलं.

तिला आज खूप बोलायचं होतं. मनसोक्त फिरायचं होतं. नाही तर इतर वेळी काही त्यांना जास्त फिरता येत नसे. कामापुरतच तेवढ.

सुदैवानं आज तो दिवस आलेला. पण तो रोहिणीसाठी निघाला.

अदितीचं मिहिरवर खूप प्रेम होतं. तिने जेव्हा पहिल्यांदा त्याला पाहिलं होतं ते इथंच.

त्या दिवशी ती संध्याकाळच्या वॉकला आलेली. मिहिर इथेच बसलेला जिथे ती आज बसलेली.

तिची नजर मिहिरवर येऊन थांबली. बघता क्षणीच तो तिला आवडलेला. तो इतर मवाली मुलांसारखा तिला वाटत नव्हता.

अदितीची नजर त्याच्यावरच सारखी सारखी जात होती. पण त्याच्याशी कसं बोलायचं. कशी ओळख काढायची. तिला काही कळत नव्हतं.

ती घरी गेल्यावर तिच्या डोळयासमोरून त्याचा चेहरा जात नव्हता. नशिबात असेल तर ओळख होईल मैत्री होईल असं बोलून तिने तो विषय संपवलेला.

एखाद्याचं नशीब कधी कधी त्याला इतकं साथ देतं की त्याचाच त्याच्यावर विश्वास बसत नाही. अदितीच्या बाबतीत ही असंच झालं.

दुसऱ्या दिवशी जेव्हा ती ऑफिसला गेली तेव्हा मिहिरला पाहून चकितच झाली. थोड्या वेळासाठी तिला विश्वासचं बसत नव्हता. त्यांच्या ऑफिसमध्ये तो नव्यानेच रूजू झालेला. आज त्याचा पहिलाच दिवस होता.

अदितीची आणि मिहिरची ओळख झाली. ज्याचा चेहरा कालपासून नजरेसमोरून हटत नव्हता तो स्वत: आज तिच्या डोळयांसमोर असणार होता.

अदितीची पारख चांगली होती. तो एक सभ्य मुलगा होता. मुंबईत एकटा राहत होता. फॅमिली गावी होती. युपीएससीची तयारी करत होता.

अदितीला त्याच्याबद्दल खूप जवळीक वाटत होती. त्याला पाहिलं की तिला स्वत:चीच आठवण होत होती. त्यांच्या आयुष्यातल्या बऱ्याच गोष्टी तिला सारख्या सारख्या वाटत होत्या.

अदिती ही तशीच होती. तिही मुंबईत एकटी राहत होती. नोकरी करत होती. आणि आवड म्हणून इंटेरियर डिझाईनिंगचा कोर्स करत होती. मिहिरचा स्वभाव ही फूडी होता. त्याला मुंबईत फिरायला, नवीन नवीन खायला फार आवडत असे.

अदितीला त्याच्या बरोबर खाऊ गल्लीत जायचं होतं पण मिहिर आज उद्या करत होता. आज तिला ती संधी आलेली. पण ती परत तिच्या हातून निसटली.

मिहिरचा स्वभाव अदितीला फार आवडू लागला. त्याने सतत जवळ असावं, आपल्याशी बोलावं असं सारखं सारखं तिला वाटू लागलं.

ऑफिसमध्ये त्यांची ओळख तर झाली होती. पण मैत्री व्हायला बराच वेळ गेला. मिहिरचा स्वभाव शांत असल्याने तो काही जास्त बोलायचा नाही. कामापुरतंच. काही फंक्शन वगैरे असेल तर हसून खेळून असायचा. बोलायचा. पण इतर वेळी काही जास्त बोलणं व्हायचं नाही.

उशिराने का होईना त्यांची ओळख झाली. मैत्री झाली. जवळ जवळ आता एकदिड वर्ष त्यांची मैत्री होती. या दिड वर्षात तिला मिहिरशी मनातलं बोलता आलं नाही.

आज तिला संधी मिळालेली. मिहिरचा मेसेज वाचून तिला आनंद झाला.

माझ्याबरोबर आज खाऊ गल्लीला यायचं आणि आज मनसोक्त फिरायचं असं कबूल करून घेऊनच तिने त्याला रोहिणीकडे येणार असल्याचं सांगितलं होतं.

तिला आज चांगलीच संधी मिळालेली. आज ती त्याला तिच्या मनातलं सगळं सांगणार होती. त्याला प्रपोज करणार होती.

तो पर्यंत तरी तिच्या आयुष्यात सर्व ठिक होतं. तिच्या मनासारखं सर्व होत होतं. पण जेव्हा जेव्हा आपल्याला वाटतं सगळं मनासारखं सुरू आहे तेव्हा तेव्हा ते तसं नसतं.

सकाळी मिहिर बरोबर ती रोहिणीकडे गेली तेव्हा तिला वाटलं की अशीच कोणी तरी मैत्रीण असावी म्हणून. पण रोहिणीने जेव्हा मिहिरला बघितलं तेव्हा तिच्या डोळ्यात पाणी आल्याचं अदितीने हेरलं. अदितीला पाहून ती जरा गोंधळलेली हे ही तिच्या नजरेतून सुटलं नव्हतं.

त्या दोघांचं बोलणं फक्त मित्र मैत्रीणीचं असावं असं तिला वाटत नव्हतं. बरंच काही त्यांना बोलायचं होत पण कदाचित मी असल्यामुळे बोलत नसावेत असं अदितीला जाणवलेलं.

वॉशरूमचा बहाणा करून अदितीने चांगलंच डोकं लढवलं आणि तिचा अंदाज खरा ठरला. त्यांच्यातली शांतता सर्व काही सांगत होती. त्यांचं एकमेकांकडं पाहणं सर्व काही सांगून गेलेलं.

अदितीला कळालं यांच्यात काहीतरी नातं होतं किंवा आहे. रोहिणीकडे बघून तिला तसं जाणवत होतं.

म्हणूनच तिने काही तरी बहाणा सांगून तिथून काढता पाय घेतला. तिचं तसं वागणं मिहिरला नक्कीच आवडणार नव्हतं हे तिला चांगलच माहित होतं तरीही ती मुद्दामच तशी वागलेली.

अदितीला प्रेमाचा अर्थ कळत होता. तिचं मिहिरवर प्रेम होतं. आणि रोहिणीचं ही प्रेम कधीतरी असायलाच हवं.

तिनं जेव्हा रोहिणीचं घर पाहिलं तेव्हा तिला तिचे आणि लहान मुलीचे फोटोफ्रेम दिसले. अदितीच्या जराजरा परिस्थिती लक्षात यायला लागली. मिहिरने आपल्याला बरोबर का घेतलं असावं हे तिच्या लक्षात यायला लागलं होतं. आपल्याच एखाद्या मैत्रीणीला भेटायला ऑकवर्ड का वाटावं हे तिला आता कळत होतं.

पाच दहा मिनिटांच्या भेटीतच तिला बरंच काही जाणवलं. जे अदितीला गेली दिड वर्ष मिहिरला सांगायचं होतं त्यासाठी ती संधी शोधत होती तशीच संधी रोहिणी शोधत असावी आणि कित्येक वर्ष ती तिला मिळत नसावी. ती त्याला शोधत असावी.

रोहिणीच्या बोलण्यातून सर्व गोष्टी अदितीला जाणवत होत्या.

जे मला सांगायचं आहे तसंच काही तरी रोहिणीला सांगायचं आहे. तिला ही संधी मिळायला हवी. कदाचित ही वेळ तिच्यासाठीच हवी असं समजून तिने काढता पाय घेतला.

आणि ती गेली ही. तिचं असं वागणं मिहिरला कोड्यात टाकणारं होतं पण तिला त्या गोष्टीची पर्वा नव्हती. तिला ते बरोबर वाटत होतं.

आणि सोबतच तिचा मिहिरवर विश्वास देखील होता. फसवणाऱ्यांतला मिहिर नाही हे तिला पक्क माहित होतं.

एखाद्या माणसाची वर्तणूकच त्याचं चारित्र्य सांगत असते. मिहिरचा स्वभाव त्याचं चारित्र्य सांगत होता.

मिहिरने आपल्याला सोबत का घेतलं असावं हे अदितीला चांगलच कळून आलेलं. आणि त्याच्यावर विश्वास ठेवूनच ती त्याला एकटं सोडून आलेली.

माणसाची नजर पुरूषांपेक्षा बायकांना चांगली कळते. कोण कश्या नजरेनं पाहतो हे त्यांना लगेच कळतं.

अदितीला तेच कळालेलं. गेली दिड वर्ष ती मिहिरच्या संपर्कात होती. मिहिरची वर्तणूक तिला चांगलीच माहित होती. त्यामुळेच ती त्याच्या प्रेमात होती.

पण त्यांच्यात पूर्वी काय घडलं असावं..? त्यांच्यात कसले संबंध असावेत..? त्यांच्यात दुरावा कसा आला असावा..? अशा बऱ्याच प्रश्नांची उत्तरं तिला मिळत नव्हती. मिहिर कधीतरी आपला होईल का या एकाच विचाराने तिचं मन उदास होतं.

अंधार वाढू लागला होता. बराच वेळ अदिती त्या बाकड्यावर बसून विचार करत होती.

मनात अनुत्तरीत प्रश्नांना घेऊन ती तिथून घरी जाण्यासाठी उठली. तेवढ्यात तिचा मोबाईल वाजला. मिहिरचा फोन होता.

"काय करावं..? काय करावं..? आता काय उत्तर द्यावं..? असं का केलंस म्हणून तो विचारणारंच.."

अदिती मनातल्या मनातचं विचार करत होती. फोन वाजतचं होता तिचं उत्तर तयार नव्हतं. फोन कट झाला.

आपण वागलो ते ठिक आहे पण मिहिरला काय सांगायचं. ती चांगलीच अडकली. तेवढ्यात तिला मिहिरचाच मेसेज आला.

*"तू खरोखर गावी गेलीस की नाही माहित नाही.. पण मी खरोखरच गावी जातोय.. दोन दिवसांनी आल्यावर भेटून बोलू. tc."*

अदितीने मेसेज वाचला. मिहिर रागावला असणार हे तिला माहित होतं पण मेसेज वरून इतका राग वाटत नव्हता. तो बोलत होता. पण अचानकच गावी का जात असेल..? यापूर्वी असं कधी गेलेल्याचं आठवत नाही..? जाऊ दे.. आलं असेल काही तरी काम.

अदितीने त्याला परत फोन केला नाही. तो भेटल्यावरचं सगळं बोलायचं असं तिने ठरवलं. आणि तो जेव्हा भेटेल तेव्हा त्याच्याशी सरळ सरळ सगळंच बोलायचं. आपलं मन रिकामं करायचं असं तिने ठरवलं.

जवळजवळ चार वर्षांनी मिहिर घरी परतला होता. चार वर्षांपासून त्याने घराचं तोंड बघितलं नव्हतं. चार वर्षांपूर्वी त्याने जे घरं सोडलं त्यानंतर तो पहिल्यांदाच आला होता.

आज जवळजवळ घरी येऊन त्याला आठ दिवस होत आलेले. खूपच आनंदी होता तो. आणि आता पुन्हा मुंबईला जाण्याची तयारी करत होता.

कसं का होईना पण तो सगळा राग विसरून आला होता. मागच्या रविवारी जेव्हा त्याला आईचा फोन आला तेव्हा तो तातडीनेच गावी गेला.

वडिलांची तब्येत अचानकच बिघडल्याने त्याला गावी जावं लागलं. आणि मुलाला बघूनच की काय मिहिरच्या वडिलांचा आजार पळून गेला होता.

अगदी ठणठणीत झाले होते ते. मिहिरला हे नाटकच असावं असं वाटत होतं. पण डॉक्टरांशी बोलून, त्यांचे रिपोर्ट पाहून त्याला ते पटलेलं. वडिलांना कुठल्यातरी गोष्टीचं टेंशन असावं म्हणून त्यांना मायनर अ‍ॅटॅक होता. काळजी करण्याचं काही काम नव्हतं.

मिहिर सगळा राग विसरून आई-बाबांच्यात परतलेला. घर सोडण्यासाठी जसे त्याचे बाबा जबाबदार होते तसेच परत आणण्यासाठीही त्याचे बाबाच जबाबदार होते.

एकदा कॉलेजकडून मिहिरच्या घरी त्याने एका मुलीची छेड काढल्याचं पत्र गेलं. तेव्हा मिहिर फायनल ईयर इंजिनियरींगला होता. प्रिन्सिपलकडून ते पत्र गेल्याचं त्याला माहित नव्हतं.

खरं तर झालं काहीच नव्हतं पण मिहिर त्यात आपोआप गुंतला होता.

कधी कधी जास्त चांगुलपणाच आपल्या अंगाशी येतो. मिहिर सोबत तेच झालेलं.

एकदा कॉलेजच्या सरांनी मिहिरला एक काम सोपावलं. काम अगदी सोप्प होतं. एका ड्रॉईंग शीटवर स्ट्रक्चरल डिझाईन बनवायचं होतं. तसं ते काम सरांचं खाजगी होतं. पण वेळ नसल्या कारणाने त्यांनी ते मिहिरवर सोपवलं.

मिहिर ते काम ड्रॉईंग लॅब मध्ये इमानेइतबारे करत होता. आसपासच्या जगात तो काय वावरत नव्हता. त्या लॅबमध्ये एका दुसऱ्या शिफ्टचं प्रॅक्टिकल

होतं. कदाचित सिव्हिलचं असावं. काय झालं कुणास ठाऊक पण अचानकच दोन मुलींची भांडणं सुरू झाली. सुरू झाली ती काही थांबायचं नाव घेईनात.

हमरी तुमरी वरून त्यांच्यात हाणामारीच सुरू झाली. मिहिर काय त्यांच्यापासून लांब नव्हता. त्यांची शिफ्ट जिथून सुरू होते. त्या शिफ्टच्या मागच्या टेबलवर तो कोपरा पकडून बसलेला.

त्या मुली भांडत भांडत वस्तूच फेकायला लागल्या. त्यातच एका मुलीने पाण्याची बाटली फेकून मारली जी नेमकी तिच्या समोरच्या मुलीने चुकवली आणि मिहिरच्या टेबलवर ती आदळली. बर निदान बॉटल तर मारायची. तिने बाटलीचं झाकण उघडून भिजवण्याच्या उद्देशानेच मारली.

टेबलवर सगळं पाणी पाणी झालं. ड्रॉईंग शीट पाण्याने भिजली. सगळं काही इतक्या वेगात झालं की मिहीरला काहीच करता आलं नाही. तो आपला तिथून बाहेर पडला. त्याने काय त्यांच्याशी वाद घातला नाही.

सरांना भेटून त्यानं घडली हकिकत सांगितली आणि नवीन शीट काढून देतो असं म्हणाला.

सरांना ही काही ते बरं वाटलं नाही. एक तर त्या कामासाठी कमीत कमी दोन तीन तास तर जातात. त्यात ह्याचं काम झालेलं ते त्या मुलींनी बिघडवलं.

तरी पण मिहिर उदार मनाने दुसरी शीट काढून देतो म्हणतोय. सरांना बरं वाटलं. पण त्यांनी नकार दिला. आपणच आता सुट्टी दिवशी ते काम पूर्ण करू

असं त्यांनी सांगितलं. एवढ्यावरचं ते काही थांबले नाहीत. त्या मुलींचा त्यांना चांगलाच राग आलेला. त्यांनी त्यांना चांगलाच धडा शिकवायचं ठरवलं. सरळ सरळ त्यांनी त्यांचं नाव ब्लॅक लिस्ट मध्ये टाकलं आणि वडिलांना प्रिन्सिपल समोर उभं करत नाही तोवर कॉलेजला यायचं नाही असं फर्मावलं.

ह्याच गोष्टीचा राग येऊन की काय त्या मुलींनी मिहिरवर उलटी तक्रार केली. ह्या मुलाने आमची छेड काढली आणि म्हणून आम्ही तसं वागलो असं प्रिन्सिपल सरांना सांगितलं.

मिहिरच्या वडिलांनी प्रिन्सिपलची केबिन गाठली. मिहिरला त्यांना पाहून धक्का बसला. न सांगताच कसे आले..? आणि आले ते आले इथे कसे काय..? असा मिहिरला प्रश्न पडला.

वडिलांनी तो आल्या आल्या प्रिन्सिपल समोर त्याच्या कानशिलात लगावली. मिहिरला काय चालंलय ते कळेना.

प्रिन्सिपलचे आरोप ऐकून, त्या मुलींची नाटकी बघून मिहिर चांगलाच गोंधळला. ही बातमी कुंभार सरांच्या कानावर गेली. कुंभार सर मिहिरच्या पाठीमागे ठामपणे उभे राहिले. मिहिरच्या मैत्रीणी मित्रांपेक्षा जास्त. त्यांनी त्या मुलींना चांगलचं धारेवर धरलं. त्यांच्या एक एक करामती प्रिन्सिपल समोर मांडल्या. सगळं कॉलेज मिहिरच्या बाजूने उभं राहिलं.

कुंभार सरांनी त्यांना खडसावल्यावर प्रिन्सिपल सरांसमोर त्या मुलींनी आपला गुन्हा कबूल केला.

मिहिरला असलेला त्याच्या कॉलेजचा पाठिंबा, खुद्द एचओडी कुंभार सरांची मैत्री पाहून वडील चकित झाले.

आपण पोराचं ऐकून न घेताच त्याला मारलं. असं करायला नको होतं. निदान ऐकून तर घ्यायला हवं होतं. वडिलांना त्यांचीच शरम वाटायला लागली. त्यांना स्वत:च्याच तोंडात मारल्यासारखं झालं. पण आता वाईट वाटून काय फायदा. विचार करायच्या आधीच कृती केली की असंच होणार.

मिहिरला अत्यंत दु:ख झालं. आपल्याला असणारा पाठिंबा, आपलं मित्रप्रेम पाहून मिहिरला गहिवरून आलं. पण घरच्यांनाच आपली कदर नाही म्हणून त्याचं मन नाराज झालं. त्याचा स्वाभिमान दु:खावला.

त्यान तसं काही दाखवलं नाही. तो काहीच बोलला नाही. त्याच्या आईला कळत होतं की आपलं लेकरू दुखावलयं म्हणून. पण तीही जास्त काही बोलू शकत नव्हती.

कॉलेज संपताच मिहिरने नोकरी धरली. गावी जायचं त्याने सोडलं. फोनवरच तो आईशी बोलत होता. वडिलांनी ही कधी त्याच्याशी जवळीक साधली नाही. आपण चुकलो असल्याची माहिती असूनही त्यांनी त्याची माफी मागितली नाही. वडिलांचं वागणं आईला पटत नव्हतं पण ती काही करू शकत नव्हती. मिहिरवर तिचा पूर्ण विश्वास होता. पोरगं वाईट मार्गाला जाणार नाही हे तिला माहित होतं. एक ना एक दिवस नक्की परत येईल हे तिला माहित होतं.

त्या दिवसानंतर मिहिर चार वर्षांनी वडिलांना दवाखान्यात भेटलेला. पोराला पाहून बापाचं मन गहिवरून आलं. आसवांच्या धारा निघाल्या.

"लेकरा मला माफ कर.. मी असं वागायला नको होतं.. तुझ्यावर विश्वास ठेवायला हवा होता.." असं जेव्हा त्याचे बाबा म्हणाले तेव्हा मिहिरला ही रडू आलं. त्याच्या स्वाभिमानी मनाने सर्वांना सामावून घेतलं. झाला गेला भूतकाळ चुलीत घातला आणि त्याच चुलीवरच्या गरम गरम भाकऱ्या खाऊन सर्वांनी तांबड्या - पांढऱ्या रश्यावर जोर दिला. तो दिवस सण ठरला.

दोन दिवस म्हणून गावी गेलेला मिहिर आठ दिवस होत आले तरी परत जाईना. तसा त्याला काही फरक पडत नव्हता. त्याचा ऑफिस मधला रेकॉर्ड चांगला होता. बॉस ही त्याच्या कामावर समाधानी होता.

पण आज आठ दिवसांनी त्याला परत जावावं लागत होतं. खरं तर त्याला अजून गावी राहायचं होतं पण रोहिणीने त्याला फोन केलेला.

"उद्या खुशीचा वाढदिवस आहे आणि तू यायलांच हवं" असं रोहिणी म्हणत होती.

"काका, मादा बद्दे आहे.. तू कदी येणालं?" असं स्वत: खुशीने विचारलं होतं.

एक वेळ तो रोहिणीला नाही म्हणाला असता पण त्या गोंडस मुलीला कसा म्हणणार. त्याने तिला उद्या येणार असल्याचं सांगितलं. म्हणूनच मिहिर मुंबईला जाण्याच्या तयारीत होता.

जे जे गमावलं ते ते त्याला परत मिळत जातंय असं त्याला जाणवत होतं. आधी रोहिणी.. मग बाबा.. आता तेच सगळं त्याला परत मिळत होतं.

त्याला आता पुन्हा त्यांना गमवायचं नव्हतं. आणि जे त्याच्या नशिबात होतं, जे त्यानं गमवलेलं नव्हतं ते ही त्याला हातातून जाऊ द्यायचं नव्हतं.

त्याने मनाशी ठरवलं.. अदितीशी भेटून तिला सर्व सांगायचं.. आपलं मन मोकळं करायचं..

*****

# अतूट नातं

दादर मार्केट माणसांच्या गर्दीने तुडूंब भरलेलं. मुंबईचं ते मध्यवर्ती ठिकाण असलेलं दादर साखरेला मुंग्या लागाव्या तसं माणसांनी गजबजलं होतं.

रोहिणी, अदिती आणि खुशी ह्यांची खरेदी सुरू होती. खुशीचा आज वाढदिवस होता. रोहिणीनेच अदितीला बोलवून घेतलेलं. गेल्या दोन चार दिवसात अदिती रोहिणीची जिवाभावाची मैत्रीण झालेली. अदितीचं रोहिणीकडेच उठ बस सुरू होतं. खुशीची आणि तिची चांगलीच गट्टी जमलेली.

त्या दिवशी अचानकच अदिती रोहिणीकडे आलेली. तिला पाहून रोहिणीला खूपच आनंद झाला.

"कशी आहेस..?"

"अरे! वा.. वा.. वा.. ये ना.. ये.. तू तर सरप्राईजच दिलंस."

"हाSय कशी आहेस..?" अदिती हसत हसत रोहिणीला मिठी मारत म्हणाली.

"मी मस्त.. तू बोल.. तू कशी आहेस..?"

"कशी असणार.. परवाच भेटलो आपण."

"होय.. पण किती दिवसांनी भेटतेय असं वाटतयं मला. बस ना बस.. काय म्हणतेस? आज ऑफिस नाही?"

"आहे गं.. पण नाही गेले.. जरा कंटाळाच आलेला कालपासून."

"अच्छा!"

"आणि तू.. तुला जायचं नाही वाटतं..? अजून उरकलेलं दिसत नाही?"

"हां.. होय अगं.. आज जरा उशीरच झाला.. जाणार आहे.. अजून आहे वेळ.. बाकी काय म्हणतेस.. अगं तुझा नंबरच घ्यायचा राहिला परवा.. लक्षातूनच गेलं बघ."

"असू दे गं.. मी आले की नाही तरी पण."

"बरं केलंस आलीस ते"

"अगं कालच येणार होते.. मग राहू दे म्हटलं, तू असशील नसशील.."

"अगं यायचं ना मग.. वेडीच आहेस.."

"आले ना मग आज.. जरा लवकरच आले.. म्हटलं लवकरच जाऊन येऊ.. परत तुझी कामाची गडबड.

"बरं केलंस आली ते.. मला बरं वाटलं खूप.. काल पण घरीच होतीस..?"

"होय.. दोन दिवस गेलेच नाही. टाकली सुट्टी."

"अच्छा.. बरं झालं सुट्टी घेतलीस ते.. मिहिरपण नाही ना. तो गेलाय गावाला.."

रोहिणी जरा टोमणा मारतच म्हणाली आणि तिला कळणार नाही असं गालातल्या गालात हसली.

"हो मेसेज केलेला त्याने." मला काही कळलंच नाही अश्या भावाने अदिती म्हणाली.

"परवा तू थांबायला हवं होतसं. तुझी आणि खुशीची भेट झाली असती.. अगं पण.. अगं.. तू तर गावी जाणार होतीस ना.. विसरलेच मी.. काय झालं..?"

हो जायचं होतं. म्हणजे असं झालं की. बाबांनी फोन केला. त्याचं काय झालं. आमच्या घराचं काम काढलंय आणि तो इंजिनीअर कोण आहे तो काय अजून आला नाही. मग जाऊन त्याची भेट व्हायची नाही. मग मीच म्हणाले तो आला की सांगा. उगाच जाऊन काय करू. काम पण व्हायचं नाही. आणि दादा गेलाय तिरूपतीला. तो पण नाही. मग राहूदेच म्हटलं. कॅन्सल केलं जायचं.

अच्छा असं झालं काय. बघ जिला जायचं होतं ती राहिली आणि ज्याला जायचं नव्हतं तो गेला.

तशा दोघी हसायला लागल्या. एक्सप्लेनेशन देऊन अदितीने चांगलाच सुस्कारा सोडला.

रोहिणीला सगळं कळत होतं. अदितीची उडालेली भांबेरी तिच्या लक्षात येत होती.

"बस तू.. मी खायला आणते."

"अगं.. नको नको.. बस तू मला काही नको."

"असं कसं... तू काय ठरवलयस का आमच्याकडे काही खायचं नाही म्हणून."

"नाही गं.. तसं नाही.." अदिती लाजत म्हणाली

"बस तू.. मी आणते." रोहिणी किचनकडे वळली.

"खुशी कुठे आहे?" अदिती बसूनच म्हणाली.

"ती बया झोपली आहे अजून. ती उठली नाही म्हणूनच तर अजून निवांत आहे मी. तिचं आवरलं की मी निघणार होते." रोहिणी किचन मधूनच म्हणाली.

रोहिणीने नुकताच केलेला उपमा आणला.

"घे" अदितीकडे उपम्याची प्लेट पुढे करत म्हणाली.

"लाजू नकोस.. लाजतेस की काय..?" रोहिणीने एक प्लेट तिच्या हातात दिली. आणि तिच्याशेजारीच बसली.

"नाही गं.. लाजायचं काय..?" म्हणत तिने उपमा खाल्ला.

"ह्ममम.. मस्त आहे गं.."

"खरंच..?"

"होय.. खरंच... किती दिवसांनी खाल्ला.. टेस्टी आहे खूप.. मस्त झालांय.."

"खरंच.. खा मग पोठ भर खा... अजून आहे.. अजून घे.. आता लाजू नकोस."

"नाही गं.. खाण्याच्या बाबतीत लाजत नाही मी.. मला आवडतं चांगलं चांगलं खायला.."

"होय का..? मिहिरपण असाच आहे.. त्याला ही खूप आवडतं.."

अदिती काहीच म्हणाली नाही तिला माहित होतं. तिने फक्त ऐकून घेतलं.

"रोहिणी चांगली चव आहे गं तुझ्या हाताला.. खरंच.."

"हो ना..?"

"होय.. रूमवर करायचं म्हटलं ना की वेळच नसतो. कामावरून येऊनच थकायला होतं."

"हो ना गं S.."

"तू कसं करते एवढं सगळ मॅनेज..?"

"करते जमेल तसं."

"आणि खुशी....."

"तिला इथेच बेबी सिटींग आहे. तिथे ठेवते." रोहिणी बोलता बोलता बोलून गेली.

अदितीला खरं तर दुसरच काही तरी विचारायचं होतं. पण रोहिणीने पटकन उत्तर दिलं. तिने काय रिॲक्ट नाही केलं. एवढ्यात आतून खुशीचा आवाज आला. मम्मा मम्मा करत खुशी हाका मारत होती.

"बस हां.. उठली वाटतं. आलेच मी.." तशी रोहिणी आतल्या रूमकडे गेली.

बेबी सिटींगच नाव ऐकून अदिती चांगलीच विचारात पडते. तिला जरा रोहिणीच्या मॅरेज लाइफ बद्दल सुरवातीपासूनच खटकत होतं. ती आज इतक्या लवकर आलेली की जवळजवळ या वेळेला घरात सर्वजण असतातच. तिचे मिस्टर कुठे गेले..? घरभर फक्त तिचे आणि खुशीचेच फोटो आहेत मिस्टरांबरोबर एक फोटो नाही. असं कसं होईल. नक्कीच काही तरी भानगड आहे. मुलीला बेबी सिटींगमध्ये ठेवते घरातले कुठे गेले.. परवा पण रविवार.. कोणी तरी असायला पाहिजे होतं. असं कसं होईल..

अदितीच्या मनात बऱ्याच शंका होत्या.. ती रोहिणीचं घर नजरेखालून घालत होती.

रोहिणीच्या घरात सामान तसं कमीच होतं. पण जे होतं ते मुलींचच दिसत होतं. बायकांच्या वापराच्या, त्यांच्या गरजेच्याच वस्तू दिसत होत्या.

अदिती मुद्दाम तिच्या मिस्टरांबद्दल बोलायचं टाळत होती. तिला फक्त शंका होती. पण वस्तूस्थिती काहीही असू शकते. म्हणून ती तिला थेट काही विचारत नव्हती. बोलता बोलताच तिच्याकडून कळेल असं ती मनातल्य मनात म्हणत होती.

रोहिणी आली. तिच्या बरोबर ती गोंडस बाहुली होती. इवलीशी ती बाहुली अदितीकडे बघून मस्त हसली. तिच्या हातात टेडी होता. तो टेडी तिने छातीशी धरलेला.

खुशी मावची मावची करत अदितीच्या मिठित गेली. अदिती अवाकच झाली.

"हॅलो खुशी.. कशी आहेस..?"

"तान." खुशी तिच्या गोड आवाजात म्हणाली.

अदितीने तिच्यासाठी आणलेली कॅडबरी तिच्या हातात दिली. खुशी खूष झाली.

"किती वर्षांची आहे गं खुशी?"

"आता येत्या शनिवारी तिला सहावं लागेल."

"होय.. म्हणजे खुशीचा बर्थडे आहे शनिवारी." अदिती खुशीकडे बघत हसत म्हणाली.

"मम्मा.. मादा बद्दे S S S..?" खुशीने प्रश्नार्थक चेहऱ्याने बघितलं.

"हां.. तुझा बड्डे.. करायचा ना आपण..? केक आणायचा वेफर आणायचे.. तुला ड्रेस घ्यायचा.. घ्यायचा ना..?" रोहिणी तिच्या गुडघ्यावर बसून तिला जवळ घेत म्हणाली.

"हां." खुशी खूष होत म्हणाली "आणि बाल्बी."

"हां.. बार्बीपण घ्यायची. अजून काय पाहिजे. काय काय घ्यायचं आपण?"

"अदून अदून.. तेदी बियलं... मोता वाला.."

"ओके.. अजून..? अजून काय काय पाहिजे माझ्या खुशीला..?" रोहिणी खुशीचा मुका घेत म्हणाली.

"अदून.. अदून.. मम्मा मिहिल काका..?"

"हां काकाला पण सांगायचं.. काका पण येणार.."

खुशी खूष झाली..

"अदिती मावशीला पण सांग. माझ्या बड्डेला ये बोल."

खुशी अदितीकडे बघून हसली आणि म्हणाली.. "मावची"

"येणार.. मी पण येणार.." अदिती पटकन म्हणाली..

"मावची तू पण ये."

"येणार मी पण येणार.. अणि मी पण खुशीला गिफ्ट आणणार.. काय पाहिजे खुशीला..?"

खुशी हसली आणि आता आपल्याला काय काय पाहिजे? काय काय घ्यायचं राहिलं? ते आता आठवायला लागली.

"गोड आहे खूप. आणि नाजूकपण अगदी तुझ्यासारखी." अदिती म्हणाली..

रोहिणी नुसतीच हसली.

"शाळेचं काय केलंस..? बघितली की नाही एखादी..?"

"नाही गं.. अजून बघायची आहे."

"बघ बघ.. चांगलीच बघ.."

"तू सांग ना एखादी चांगली."

"सांगते ना.. मला पण अजून काही माहिती नाही.. पण मी काढते आता माहिती.. आपण खुशीसाठी चांगली शाळा बघूया.."

अदितीचं उत्तर ऐकून रोहिणी आनंदी झाली.

"मी काय म्हणते रोहिणी"

"हां बोल ना.. काय ते?"

"तू आवर आता तुला उशीर होईल."

"आवरते गं तू बस.. जायची घाई करू नकोस."

"मी बसतेच आणि मी कुठे जातच नाहीय. मी आज खुशीसोबतच राहणार आहे.. खुशीबरोबरच खेळणार आहे. खुशी मी पण खेळू ना तुझ्याबरोबर.." अदितीने खुशीकडे बघत तिला विचारलं.

रोहिणीचा चेहरा खुलला. अदितीने दाखवलेला आपलेपणा तिला आवडला. रोहिणी आश्चर्याने बघायला लागली.

"चालेल ना रोहिणी मी थांबले तर?"

"अगं असं काय.. न चालायला काय झालं.. बरं वाटलं मला खूप.. थांब थांब.. खुशीला पण आवडेल खूप.. तिला ना असं आमच्या घरी कोणी आलं ना तर खूप खूप आवडतं.. आणि ती त्यांना जीव पण लावते तसा."

"परवा मिहिर येऊन गेला तर बघ नुसती मिहिर काका, मिहिर काका करतेय. तो गेल्यापासून आता कधी येणार काका? लवकर का गेला? राहिला का नाही? किती तरी प्रश्न विचारून मला नुसतं हैराण केलय बघ."

रोहिणीच्या डोळ्यात टचकन पाणी आलं. ती ते लपवत अदितीशी बोलत होती पण अदितीने ते नोटिस केलं.

"थांब तू.. आवडेल तिला... आणि तिचं तुला काही करावं लागणार नाही.. ती काय तुला जास्त त्रास देणार नाही.. जेवण वगैरे सगळं तयार आहे.. तुझ्यासाठी ही आहे.. भरपूर आहे... तू पण जेव.. आणि काय लागलं तर डब्यात

बघ.. खूप आहे खायला... तिला काय लागलं तर ती सांगते.. तिला फक्त अंघोळ...."

अदितीने रोहिणीचा दंड धरला आणि म्हणाली,

"रोहिणी नको काळजी करूस.. मी सांभाळते तिला.. किती गोंधळलीस लगेच.. मी माझ्या मुलीप्रमाणे जपीन तिला.. तू नको टेंशन घेऊस.."

रोहिणीच्या डोळयातून अश्रूच आले. अदितीकडे पाहून तिचा हुंदकाच फुटला. ती ओक्साबोक्शी रडू लागली.

अदितीने तिला जवळ घेतलं आणि विचारलं,

"अगं काय झालं?"

रोहिणी अदितीच्या गळयात पडली. आणि रडू लागली.

अदिती चकीतच झाली. रोहिणीला असं रडताना बघून तिला कळायचंच बंद झालं. अदिती शांतच होती.

थोड्या वेळाने रोहिणी गप्प झाली. ती डोळे पुसत होती. पण तरीही तिच्या डोळयातून पाणी येतच होतं.

"गप.. नको रडूस.. काय झालं एकदम?"

रोहिणीने नुसतीच नकारार्थी मान डोलावली. तिच्या डोळयात अजून पाणी होतं.

"गप रोहिणी.. रडणं थांबव.. अगं तू अशी रडायला लागलीस की खुशीला काय वाटेल.. गप रडू नकोस."

रोहिणीने डोळे पुसले आणि खुशीला जवळ घेतलं.

"मम्मा का लडते?" खुशीने तिच्या नाजूक आवाजात विचारलं.

रोहिणीने नुसतीच मान डोलावली आणि तिचा मुका घेतला. तिला परत रडू कोसळलं.

अदिती गंभीर नजरेनं पाहू लागली. रोहिणीच्या मनात खूप दुःख भरलंय असं तिला जाणवत होतं. नक्कीच रोहिणीच्या आयुष्यात काही तरी घडलंय असं तिला जाणवत होतं.

थोड्या वेळाने रोहिणी गप्प झाली. तिने डोळे पुसले.

अदितीने तिला जवळ घेतलं आणि विचारपूस करायला लागली.

"काय झालं रोहिणी इतकं रडायलां?"

"काही नाही.." रोहिणी चेहऱ्यावर हसू ठेवत म्हणाली.

"मग का रडलीस एवढी?"

रोहिणीने चेहऱ्यावर हसू ठेऊन नकारार्थी मान डोलावली.

"माझं काय चुकलं का..? माझ्यामुळे तर..?"

"नाही गं.. काही नाही..." रोहिणीने अदितीच्या गालावर एक हात ठेवला आणि म्हणाली.

अदितीने मग जास्त काही विचारलं नाही. तिची मनस्थिती ती समजू शकत होती.

"मी थांबू ना.." अदितीनं प्रश्नार्थक नजरेनच विचारलं.

"थांब.. तुझंच घर आहे.." रोहिणी म्हणाली.

"मी आवरते आता.. बस तू.." ती आतल्या खोलीत गेली.

रोहिणी तयार होऊन आली.

"अदिती... निघू मी..?"

"हां"

"जेवून घे हां.. आणि काय लागलं तर किचन मध्ये सगळं आहे.. संकोच करू नकोस."

"हो.. तू निश्चिंत जा.. तुझा डबा..?"

"हां घेतला मी.. हा काय..."

"ठीक आहे.. आमच्या दोघींचीही काळजी करू नकोस."

रोहिणी हसली. तिने खुशीचा गोड गोड पापा घेतला आणि खुशीला म्हणाली,

"खुशी मावशीला त्रास नको देऊस हां.."

खुशी गोड हसली.. ती काहीच म्हणाली नाही.

खुशीच्या डोक्यावरून हात फिरवत ती उठली.

"चल.. निघते मी."

अदितीने हसत हसतच नुसती मान डोलावली.

त्या दिवशी अदिती खुशीची मैत्रीणच झाली. तिच्याच वयाची होऊन बसली. तिच्याशी खेळू लागली. मस्ती करू लागली. आणि खुशी ही आपली मैत्रीण आहे असंच वागू लागली.

आज सकाळी जेव्हा रोहिणीने फोन केला तेव्हा ती लगेच निघाली. कामावर तिने रजा टाकली.

दिवसभर अदिती खुशी बरोबर होती. रोहिणी कामावरून आली तेव्हा त्या तिघी संध्याकाळी मार्केटला निघाल्या.

खुशीच्या पसंतीने सगळी खरेदी झाली. तिघी घरी आल्या. अदिती डेकोरेशन करत होती. रोहिणी जेवणाच्या मागे लागलेली. खुशी आनंदात होती.

आज मिहिर येणार म्हणून अदिती आणि रोहिणी दोघीही खूष होत्या. रोहिणीने अदितीसमोरच त्याला कॉल केला तेव्हा तो गाडीत होता. आठ पर्यंत पोहोचू असं म्हणत होता. अजून तरी तो आला नव्हता.

रोहिणी स्वयंपाकात व्यस्थ होती. आज सर्व मिहिरच्या आवडीचं केलेलं. अदितीने डेकोरेशनची कामगिरी पार पाडली. आणि ती किचनमध्ये रोहिणीला मदत करण्यासाठी म्हणून गेली.

"अगं काय..? किती हा पसारा..? काय काय केलंस...? मस्त वास सुटलाय बघ."

रोहिणी नुसतीच हसली. ती भाकरीचं पीठ मळत होती.

"रोहिणी तुझ्यासारखं चांगलं जेवण मला नाही जमणार."

"जमायचं काय त्यात..? करायला लागलं की सगळं जमतं."

"जमेल.. पण तुझ्याइतकं चांगलं नाही." अदिती मांडी घालत बसत म्हणाली.

"चांगलं करते मी जेवण..?"

"चांगलं म्हणजे शेवटच करतेस तू."

रोहिणी पीठ मळत मळत अदितीकडून स्तुती ऐकून घेत होती.

"मला पण शिकवशील ना..?"

"शिकवेन की.. त्यात काय एवढं."

"सगळ्यात आधी चिकन शिकव.. आणि हां पांढरा रस्सा पण... काय झालेला परवा.. आ हा हा!.. अजून चव तशीच आहे तोंडावर.."

"आवडला तुला..?"

"आवडला म्हणजे खूपच.. केलायस ना आता..?"

"केलाय तर.. ते बघ गॅसवरच आहे.. घालवतेस जरा गॅस..?"

"हां..." तशी ती उठली.

"झालाय का रस्सा...?"

"हो झालाय.. बघ ना वाटीत घेऊन जरा.."

अदितीने वाटीत पांढरा रस्सा घेतला..

"आ.... हां... रोहिणी काय झालाय गं... नाद खुळा..."

"तुला माहितीय मिहिर पण खूप चांगलं जेवण करतो.. एकदा त्याने आणलेला ऑफिसमध्ये.. आई शप्पथ.. काय केलेला माहितीय.. मला तर खूप आवडलेला.."

"खरंच काय.. मला नव्हतं माहित.. बोलला नाही तो कधी..."

"हं.... असं खूप काय काय आहे ते तो बोलत नाही.." अदिती नुसतचं हसून बोलली.

"मिहिरला पण खूप आवडायचां पांढरा रस्सा. मी करायचे ना तर तो आमच्याकडेच जेवायला यायचा.." रोहिणी भूतकाळात गेली.

"तरीच इतका चांगला करतो.. तुझं बघूनच शिकला असेल.."

"नाही मी तरी नाही शिकवलं.. मला वाटलं तू शिकवलं असशील.." रोहिणी जरा हसतच म्हणाली.

अदितीला ते जाणवलं.

"नाही गं.. मला येत असतं तर खूप झालं असतं.. मी तुला थोडीच म्हणाले असते.. शिकव म्हणून.."

"ते पण आहे म्हणा.. झालं डेकोरेशनचं..?"

"हां.. म्हणजे केलंय जमेल तेवढ.. खुशीला आवडलयं की नाही काय माहिती..?"

"आवडणार गं.. का आवडणार नाही.. तू तिच्यासोबत आहेस हेच खूप आनंद देणारं आहे तिच्यासाठी.... काय करतेय काय ती बाहेर..?"

"चालंलय मॅडमच फुगे फुगवायचं." अदिती हसत म्हणाली. "केव्हाची एकच फुगा फुगवतेय.. पण तिच्याच्याने काही होईना.. फुगा फुगवते मध्येच मला ऑर्डर देते.. मावची ते इते.. मावची तीथे.. मावची असं कल.. मावची तसं कल.. बोलायला लागली की फुग्यातली हवा जाते आणि बसते परत फुगवत.." अदिती खुशीच्या आवाजात तिची नक्कल करत म्हणाली. दोघीही हसायला लागल्या.

"खुशी खूष आहे आज काय पण बोल."

"का नसणार तिची मावशी आहे ना तिच्या बरोबर आणि आता काका पण येतोय." रोहिणीचा सुर अदितीला कळत होता.

"काय बोलला मिहिर कुठपर्यंत आलाय?" अदितीनं विचारलं.

"आलाय ठाण्यापर्यंत.. पोचेल अर्धा एक तासात.. ट्राफिक असेल ना आता.."

"हां होय.. संध्याकाळचा प्रवास आणि मुंबईत.. बापरे! नकोच. ट्रेन परवडली त्यापेक्षा."

"रोहिणी मुंबईत फिरलीस की नाही..?"

"नाही गं.. कधी फिरणार..? वेळ तर पाहिजे ना."

"ते पण आहे म्हणा.. बरं जाऊ दे ते आता सगळं.. आपण उद्या जाऊ कुठे तरी बाहेर."

"जाऊ ना.. मी येते हाफडे घेऊन."

"नाही हां.. हाफडे वगैरे काही नाही.. तू सरळ सुट्टी टाक.. आपण चांगला पूर्ण दिवस एन्जॉय करू."

"बरं... चालेल.. तू म्हणशील तसं."

अदिती नुसतीच हसली. शांत नजरेने रोहिणीकडे तोंडावर हसू ठेवत म्हणाली,

"रोहिणी.. किती समजूतदार आहेस गं.. मन धरून कसं राहायचं हे तुझ्याकडून शिकलं पाहिजे.. दुखवत नाहीस तू कोणाला.."

रोहिणी नुसतीच हसली.

"पण रोहिणी जरा स्वत: कडे पण बघ.. किती खराब झालीयस.. असं दुर्लक्ष करू नकोस.. काम काय रोजचं आहे.. तब्येत नको का सांभाळायला? किती सुंदर दिसतेस तू.. तब्येतीकडे पण लक्ष दे."

"काय करणार गं.. कामामुळे काही वेळचं नाही मिळत."

"बास झालं ते काम आता.. तू आता असं सारखं टेंशन मध्ये नाही राहायचं बघं.. आता मी आहे ना तुझ्यासोबत."

"टेंशन.. मला कसलं टेंशन..?"

"आहे.. पण तू सांगत नाहीस मला.. मी परकी आहे ना तुला."

"का गं..? असं का बोलतेस..? मी कधी परकं मानलं तुला..?"

"मग तू माझ्याशी मनातल्या गोष्टी बोलतच नाहीस. मला कळतंय."

"एवढचं ना.. ठीक आहे.. मी तुझ्याशी मनमोकळेपणाने गप्पा मारीन.. मी तुझ्यापासून काही लपवणार नाही.. पण असं परकं म्हणू नकोस गं. चार दिवसाची आपली ओळख पण मनात बसली आहेस तू.. तुझ्यापासून काय लपवू मी..?"

अदिती रोहिणीचं समजूतदार मन बघून अवाकच झाली. परकं बोलून आपण चूकच केली असं तिला वाटू लागलं.

"सॉरी रोहिणी.. मी असं बोलायला नको होतं.. मला फक्त इतकंच म्हणायचं होतं की तू काही मनात ठेवू नकोस.. आनंदात रहा इतकंच."

"असू दे गं.. सॉरी काय बोलतेस.. मी काय रागवली नाही.. वेडी मावची कुठली.." रोहिणीने अदितीच्या गालावर हात ठेवला आणि म्हणाली.

अदिती तोंडावर स्मित ठेवत म्हणाली आणि रोहिणी,

"हे काय.. किती खर्च करतेस तू.. इतका महाग महाग भाव नसतो करायचा.. इथ मुंबईत काय माप भाव सांगतात म्हणून आपण काय लगेच पैसे काढून द्यायचे नाहीत.. थोडा कमी जास्त भाव करायचा.."

"काय मिळालं गं महाग?"

"ती खुशीची खेळणी.. बार्बी वगैरे.. त्या दुकानात."

"हां.." रोहिणी हसली आणि म्हणाली.. "जरा महागच वाटत होती."

"जरा...? अगं खूप.. दोन हजाराचा सेट.. अगं लहान पोरांचं आहे ते आणि इतकं महाग..?"

"काय करणार.. लहान मुलांची खरेदी अशी महागच असते."

"अगं स्वस्त पण असते आपण भाव करायचा."

"चालेल.. चालेल.. आता तू आहेस ना.. तू मला सगळं शिकवं हळूहळू मुंबईतलं आयुष्य.. चालेल ना..?"

"चालायचं काय मी आहेच तुझ्यासोबत."

"पण कसं असतं माहितीय का अदिती.. लहान मुलांना दुखवून नाही चालत.. त्यांच्या कलानेच सर्व करावं लागतं.. त्यांना काय कळत असतं गं महाग काय, स्वस्त काय.. त्यांच्या मनाला आवडलं की ते मागतात.. हट्ट करतात.. आपण कशासाठी आहोत.. त्याचसाठी ना आणि आता त्यांनी नाही वापरायचं तर मग कधी. हेच तर वय आहे त्यांचं.."

"कधी कधी एखादी गोष्ट मनासारखी नाही झाली की तेवढीच ती त्यांच्या मनात राहते.. जाऊ दे ना.. आपण नाही पैशाकडं बघायचं.. पैसा आपल्यासाठी असतो.. आपण पैशासाठी नसतो.. साठवून काय करायचंय.. पुढचं आयुष्य कोणी बघितलंय.. कधी कोणती वेळ येईल काय सांगता येईल..?"

अदिती तिचं बोलणं शांतपणे ऐकत होती.

"रोहिणी खूप प्रेम आहे तुझं खुशीवर दिसतंय मला. अजिबात दुखवत नाहीस तू तिला."

"ती बोट ठेवेल ते ते सर्व घेतलंस आणि तुझी पोरगी.. बापरे! ती तर तुझ्यावरच गेली आहे.. माया लेकी तुम्ही सारख्याच."

रोहिणी हसत हसत अदितीकडे बघायला लागली आणि म्हणाली,

"काय गं.. काय केलं माझ्या लेकीने..?"

"एवढीशी आहे पण तुझ्यापेक्षा जास्त समजुतदार आहे. बघितलं मी मघाशी."

"काय गं..?"

"कपड्याच्या दुकानात.. तिला एक ड्रेस आवडला.. तुला दुसरा आवडला.. तुमचं मोठं मन तुम्ही दाखवलं.. दोन्ही ड्रेस घ्यायला निघालात.. तुमच्यासाठी काय पैसा महत्वाचा नाही.. काढले लगेच पाच हजार.. पण नशिब.. खुशी मॅडम समजूतदार निघाल्या.."

"मम्मा आपण तो द्रेस नेक्त बद्देला घेऊया.. आता हा घेऊया..." अदिती खुशीची नक्कल करत दुकानातला किस्सा रंगवून सांगत होती. रोहिणी तिचं बोलणं हसत हसत एन्जॉय करत होती.

"नशिब! ती तसं म्हणाली म्हणून.. नाही तर तू काय ऐकलं नसतंस.. दुकानदाराचा चांगलाच फायदा करून दिला असतास."

रोहिणी अदितीचं बोलणं ऐकून हसायला लागली.

"असू दे गं.. माझ्या लेकीचा वाढदिवस आहे आज."

"अगं आहे की.. दरवर्षी येईलच की वाढदिवस.. एकदाच थोडी आपल्याला घालायचायं.. दरवर्षी घालायचाच तो..

"होय ते तर आहे.. दरवर्षी घालायचाच वाढदिवस पण.." रोहिणी गप्प झाली.. ती शून्यात पाहू लागली.

"पण काय गं..?"

"हां.. काय ते..?"

"अगं काय तर सांगत होतीस ना.. तु अशी मध्येच कुठे हरवतेस गं..?"

"हां ते... काही नाही.. वाढदिवस गं.. असू दे.. हौस म्हणून करायचा.. दरवर्षी काय करायचाच असतो."

"अदिती वाढदिवस काय गरज नाही.. ती हौस असते.. आपण मुलांच्या गरजा पूर्ण करतोच.. हौस देखील पूर्ण करायची. त्यांच्या मनाप्रमाणे.. लहान आहेत तोपर्यंत.. एकदा मोठं झाल्यावर त्यांची त्यांना समज येणारंच की."

"मोठं झाल्यावर माहित नाही पण तुझी मुलगी आत्ताच खूप समजूतदार आहे.. मानलं मी.. देव करो आणि मला पण अशीच मुलगी होवो."

रोहिणी अदितीकडे चेहऱ्यावर स्मित ठेवून पाहत होती.

"काय गं.. आणि खुशी तुझी नाही..?"

"आहे तर.. माझीच आहे ती आता.. मी आपलं असंच म्हटलं."

रोहिणी अदिती दोघांच्याही चेहऱ्यावर स्मित होतं. रोहिणीच्या भाकऱ्या होत आल्या. एवढ्यात दारावरची बेल वाजली.

"आला वाटतं..?" अदिती उत्साहाने म्हणाली. तशी ती एकदम गप्प झाली. लाजली.

"जा दार उघड." रोहिणी म्हणाली.

अदितीच्या आधी खुशीनेच दार उघडलं. मिहिरला पाहून ती खूष झाली. मिहिल काका करत त्याच्या जवळ गेली. मिहिरने तिला उचलून घेतलं. तिच्या गालावर किस केलं.

एक मोठी कॅडबरी तिच्या हातात देऊन तिला हॅप्पी बर्थडे खुशी म्हणून विश केलं.

अदिती आली.. त्याच्याकडे पाहू लागली. मिहिर काही रिकामा आला नव्हता. त्याच्या हातात दोन चार पिशव्या होत्या.. त्याची बॅग होती.

मिहिरने अदितीला पाहून स्माईल दिली.

"कशी आहेस?"

अदितीने नुसतीच हसून मान डोलावली.

"तू?"

"मी मस्त."

रोहिणी पाण्याचा तांब्या घेऊनच बाहेर आली.

"आलास.. बरं झालं.. उशीर झाला रे..?"

"होय.. ट्रॅफिक... काय करणार.. वैताग आला नुसता." मिहिर सोफ्यावर बैठक मारत बसला.

"कसा आहेस?"

"मस्त"

"आणि गावी सगळे..? बाबा कसे आहेत..?"

"मजेत.. आरामात.. ठणठणीत झालेत चांगले."

"आणि हे काय..? एवढ कसलं सामान..?"

"हां.. ही माझी कपड्यांची एक बॅग आहे आणि आईने थोडं खायला दिलंय काय काय.. आणि हे सगळं खुशीसाठी.. खुशीचा बर्थडे आहे ना आज.." मिहिर खुशीला जवळ घेत म्हणाला. आणि त्याने तिच्या गालावर किस केलं.

"मग खुशी केक कुठाय..?"

खुशीने मम्मीकडे बघितलं.

"आहे आहे... आणलाय.. तुझ्यासाठीचं थांबलेलो अरे आम्ही.. चल फ्रेश होऊन घे.."

"हां.. हां.. जरा बसू दे..अदिती कधी आली..?" मिहिर अदितीकडे पाहून म्हणाला.

"मगाशीच आले."

"नाही म्हणजे गावावरून कधी आली..?" मिहिर तिला टोमणा मारत म्हणाला.

अदिती गालात हसली. तिला त्याच्या बोलण्याचा सूर लक्षात आला.

"नाही अरे.. गेलीच नाही मी.. कॅन्सल झालं अचानक.."

"अच्छा" मिहिर मान हलवत म्हणाला.

"का?"

"ते.. अं.. इंजिनीअर अजून आला नाही घरांच काम पुढं ढकललं."

"अच्छा.. कसा येईल..? इंजिनीअर गावी गेला ना अचानक.." मिहिर पुटपुटत हळूच म्हणाला.

"काय?"

"नाही.. काही नाही.." मिहिर गालातल्या गालात हसत होता आणि मान हलवत होता.

रोहिणी त्या दोघांकडे बघत होती. ती सुद्धा गालातल्या गालात हसत होती. तिला सर्व माहित होतं. ती मिहिरकडे बघत होती आणि मी सांगितलं ते खरं होतं ना अशा नजरेनं ती त्याच्याकडे पाहत होती.

"बाकी.. सर काय बोलत होते ऑफिसमध्ये?"

"नाही.. काही नाही.. किती दिवसांची रजा घेतलीस..? दोन दिवसांसाठीच गेलेलास ना..?"

"होय.. पण गावी जरा काम निघालं.. पंधरा दिवसांची घेतली मग.."

"सर काय म्हणाले?"

"काय म्हणणार..? काही नाही.. देशमुख आरामात ये.. आपलंच ऑफिस आहे.." मिहिर सरांची नक्कल करत म्हणाला.

अदितीच्या चेहऱ्यावर हसू आलं.

"सर चांगले आहेत वाटतं तुमचे..?" रोहिणीने विचारलं.

"होय.. खरंच चांगले आहेत." मिहिर म्हणाला.

"मिहिरसाठी तर खूपच. सगळं काम वेळेवर असतं त्याचं. त्याच्याशी अदबीने वागतात."

"माणसाची ओळख त्याच्या कामानेच होते. त्यांना माझं काम आवडतं.. ते माझ्याशी रिस्पेक्टफुली वागतात. बस."

"ह्मममम.. खरंच आहे." अदितीने रोहिणीकडे बघून मान हलवली..

"बर.. फ्रेश होतो मी आता.. काय करायचं आहे का अजून..?" मिहिर सोफ्यावरून उठत म्हणाला.

"सगळं झालंय.. तुझीच वाट बघायची चाललेली." रोहिणी अदितीकडे तिरकस नजर टाकत मिहिरला म्हणाली.

"वा..! डेकोरेशन चांगलं केलंय.. डिझायनरने केलेलं दिसतंय.." मिहिर अदितीकडे बघत हसत म्हणाला.

"होय.. डिझायनर मावचीने केलंय.. हो ना खुशी.." रोहिणी म्हणाली.

"मावची.." खुशी अदितीकडे जात म्हणाली.

"मावची फ्रेंड झालेली दिसतेय..?"

"तर बाबा.. नुसती फ्रेंड नाही.. क्लोज फ्रेंड.." रोहिणी हसत हसत म्हणाली. तसे सर्वजण हसायले लागले.

खुशीचा वाढदिवस थाटामाटात साजरा झाला. बिल्डिंगमधल्या दोन चार बायका आलेल्या. खुशीची बेबी सिटींगवाली दिदि आलेली. बच्चे कंपीनीने घर भरून गेलेलं.

रोहिणीने जय्यत तयारी केलेली. सर्वांचा पाहुणचार चांगला केला. अदितीने तिला मदत केली.

खुशीसाठी हा दिवस खूप आनंदाचा होता. ती आज भलतीच खूष दिसत होती. वाढदिवसाचा कार्यक्रम झाला. पाहुणे मंडळी गेली. मुलांनी भरलेलं घर आता गिफ्ट्सनी भरलं.

आपल्याला काय काय गिफ्ट्स मिळालेत हे पाहण्यासाठी खुशीची गडबड चाललेली. जेवण झालं की आपण सर्व बघू म्हणून अदितीने तिला समजावलं.

वाढदिवस उरकून मिहिर निघण्याच्याच गडबडीत होता. पण रोहिणीने दोघांनाही राहण्याचा आग्रह केला. अदिती लगेच तयार झाली. पण मिहिर जातोच म्हणत होता. आठ दिवसांपासून घर बंद आहे नको.. कशाला.. उद्या परत येतो.. वगैरे वगैरे बोलत होता. पण रोहिणीने खुशीला पुढे केलं.

"काका नको दाऊ.. आद आमत्याकलेच लहा." असं खुशी एकदाच म्हणाली तिला दुसऱ्यांदा बोलायची गरज लागली नाही. मिहिर हसत हसत हो म्हणाला.

गिफ्ट्स कडे बघत बघत खुशीने भरभर आपलं जेवण उरकलं. आणि ती हळूहळू तिकडं सरकत गेली. एक एक गिफ्ट उचलून चाचपून बघू लागली. ह्यात काय असेल त्यात काय असेल असं बघत बघत मावची मावची करत होती.

त्या तिघांचं जेवण सुरू होतं. गप्पा मारत मारत त्यांचं जेवण चाललेलं. मिहिरला रोहिणीने केलेलं जेवण आवडलं. त्याचं मन भरून आलेलं. अदिती रोहिणीचं तोंड भरून कौतुक करत होती. मला पण उद्यापासूनच शिकव असं तिला सारखं सारखं म्हणत होती.

रोहिणी आज खूष होती. बऱ्याच दिवसांनी ती अशी मित्रांच्यात बसलेली. तिचं मन समाधानी झालेलं.

अदिती गिफ्टचं एक एक पॅकेट ओपन करून खुशीला देत होती. खुशी ते गिफ्ट बघून खूष होत होती. आणि मम्माला दाखवत होती. रोहिणी आणि मिहिर तिच्याकडे बघत होते.

ते सर्वजण हॉलमध्येच बसलेले. खुशी बरोबर त्यांच्या मध्ये होती. तिच्या आजूबाजूला गिफ्ट्स पसरलेली. त्यातलं एक एक ती अदितीकडे देत होती. अदिती ते पॅकेट ओपन करत होती. ओपन केल्यावर ते गिफ्ट रॅप केलेला गिफ्ट पेपर रोहिणीकडे देत होती. रोहिणी तो पेपर पिशवीत घडी घालून ठेवत होती.

असं एक प्रकारे माणसांचं मशिन वर्क सुरू होतं. मिहिर त्यांच्याकडे चेहऱ्यावर हसू ठेवून पाहत होता.

जवळ जवळ आता सर्व गिफ्ट्स ओपन करून झाली. अदितीने तिचं गिफ्ट ओपन करून दिलं. लहान मुलांचा किचन सेट बघून खुशीला आनंद झाला.

तिने लगेच अदितीला, "तांकु आदु माऊ" म्हणत मिठी मारली आणि गालावर किस केलं.

खुशीने मिहिरने आणलेल्या बॅग एक एक करत पुढे अदितीकडे सरकवल्या. मिहिरने बरंच काय काय आणलेलं.

बघ खुशी काकाने काय काय आणलंय.. कॅडबरी सेलिब्रेशन आहे... आणि... ह्यात काय... अय्या बार्बी.. सेटच आणलाय..

खुशीने लगेच तो आपल्या हातात घेतला..

आणि काय आहे बघूया तरी.. अं... अरे बापरे.. टेडी बिअर.. आणि एक नाही.. दुकानातले सगळेच आणलेत वाटतं.. अरे वा.. काकाने दुकान रिकामचं केलेलं दिसतय..

अदितीने एक एक करून टेडी बिअर खुशीच्या भोवतीने मांडले आणि तिचा मस्त फोटो घेतला.

"खुशीची मज्जा आहे आज.." अदिती खुशीकडे बघत म्हणाली. "खुशी मला पण देणार ना गिफ्ट.. मी तुझी फ्रेंड आहे ना..?"

"हां.." खुशीने हसत हसत मान डोलावली आणि आपल्याकडचा एक टेडी अदितीच्या हातात दिला. तिच्या जवळ जाऊन खुशीने तिला मिठी मारली. तिच्या गालावर किस केलं.

"माझी बबदी...किती शमजूतदार आहे.. umhaa.. umhaaaa... umhaaa..." अदितीने खुशीला मिठित घेतलं.. तिच्या गालावर किस करत करत, तिचे लाड करत करत ती म्हणाली.

चला काकानं अजून काय काय आणलंय बघूया.. ह्यात काय आहे आता.. चांगलीच मोठी आहे पिशवी.. म्हणत अदितीने पिशवी हातात घेतली. त्यातून ड्रेसचा बॉक्स बाहेर काढला..

अय्या.. खुशी.. काकाने बघ तुझ्यासाठी ड्रेस आणलाय..

अदितीने ड्रेसचा बॉक्स ओपन केला. त्यातून ड्रेस बाहेर काढला. ड्रेस पाहून अदिती आणि रोहिणी एकमेकांकडे आश्चर्याने पाहू लागले. खुशी ड्रेस बघून आनंदी झाली. तो तोच ड्रेस होता. जो खुशीला त्या दुकानात आवडलेला. आणि तो पुढच्या बर्थडेला घेऊ म्हणून मम्माला सांगितलेलं.

रोहिणी शांत होती. तिच्या चेहऱ्यावर स्मित होतं. ती त्याच नजरेनं मिहिरकडे पाहत होती.

"तू हाच ड्रेस का घेतला मिहिर..?" अदितीने विचारलं.

"का..? काही खराब आहे.? चांगला नाही..?" मिहिर ड्रेस हातात घेत म्हणाला.

"नाही.. तसं नाही.. म्हणजे ड्रेस चांगला आहे खूप.. पण हाच कसा काय घेतला.. तुला आवडला म्हणून की अजून काय..?"

"अच्छा..! मला वाटलं कुठं खराब वगैरे आहे की काय.". मिहिर ड्रेस उल्टा पाल्टा करत म्हणाला.

"असं काही नाही.. खरेदी करत करतच आलो ना.. वाटेत ते दुकान दिसलं.. कपडे जरा चांगली वाटत होती म्हणून आत गेलो.."

"अच्छा.. तरी पण हाच का..?" अदितीने पुन्हा तेच विचारलं.

"नाही म्हणजे तसं बाकीचे पण होते खूप चांगले चांगले.. पण मला काय असं विशेष वाटलं नाही.. निघता निघता ह्या ड्रेसवर नजर गेली आणि खुशीच एकदम डोळ्यासमोर आली.. ड्रेसला पाहून तिचीच आठवण आली.. मग घेतलाच तो.."

"का असं का विचारतेस?"

अदिती हसली आणि म्हणाली,

"काही नाही अरे.. आम्ही पण गेलेलो खरेदीला.. खुशीला हाच ड्रेस आवडलेला."

"मग काय झालं?"

"मग काय.. खुशी म्हणाली मम्माला जो ड्रेस आवडलाय तो घेऊया.. हा वाला ड्रेस आपण नेक्स्ट बर्थडेला घेऊया.. रोहिणी दोन्ही ड्रेस घेत होती. पण खुशीनेच घेऊन नाही दिला.”

"काय बोलतेस खरंच?"

"होय अरे म्हणून तर तुला विचारलं ना."

"बघ रोहिणी.. खुशी किती नशीबवान आहे.. तिला जे हवंय ते तिला देवाने दिलंच आणि ते पण तिच्या मिहिर काकाकडून." अदिती रोहिणीकडे नजर टाकत म्हणाली.

रोहिणीच्या चेहऱ्यावर स्मित होतं तेच स्मित ठेवत ती म्हणाली,

"नशिबातलं कोणी घेऊ नाही शकत अदिती. जे नशिबात असतं ते मिळतंच."

मिहिरने खुशीला जवळ घेतलं. तिच्या गालावर किस केलं आणि म्हणाला,

"आईवर गेलीय एकदम नकटी.." तसा तो तिच्या नाकावर किस करू लागला.. खुशीने आनंदाने मिहिरला मिठी मारली.

"तांकु काका" म्हणत तिने मिहिरला गोड गोड पापा दिला.

रोहिणीला ते सर्व पाहून तिचा भूतकाळ आठवला. तिच्या डोळ्यात टचकन पाणी आलं. तिने ते लपवण्याचा प्रयत्न केला. पण अदितीच्या नजरेतून ते काही सुटलं नाही.

खुशी मिहिरच्या मांडीवर बसलेली. मिहिर तिचे लाड करत होता. तिच्याशी तिच्याच भाषेत बोलत होता.

"एवढं कशाला आणयचंस मिहिर..?" रोहिणी म्हणाली..

मिहिरने स्माईल दिली आणि म्हणाला,

"खुशीसाठी"

"लहान मुलांच्या काय कमी अपेक्षा नसतात रोहिणी.. त्यांना सर्वंच हवंहवंस वाटत असतं.. त्यांना काय कळतंय.. बालिश मन त्यांचं.. असू दे मी तिच्यासाठी नाही घेणार तर कोण घेणार.. काका आहे मी तिचा.."

अदितीने रोहिणीकडे पाहिलं. रोहिणीने अदितीच्या पाठीवर थाप मारली आणि नुसतीच हसली. अदितीला कळालं काय कळांयचं ते. तिने हसत हसतच मान डोलावली आणि हळूच दोघंही एका माळेचे मणी आहात असं पुटपुटली.

त्यानंतर बराच वेळ त्यांच्या गप्पा रंगल्या. खुशी मावशीचा मोबाईल हातात घेऊन तिच्या मांडीवर बसलेली.

ते तिघंही त्यांच्या आयुष्यातले गमतीदार किस्से सांगत होते. त्यांची मेहफिल चांगलीच रंगात आलेली. रोहिणीने मिहिरचा पायथागोरसचा किस्सा सांगितला, तेव्हा अदिती खळखळून हसली.

मिहिरला ही हसू येत होतं. मिहिर म्हणाला,

"रोहिणी गणित शिकवत होती म्हणून मी शिकलो नाही तर अवघड होतं. नंतर नंतर गणित आवडू लागलं आणि.." मिहिर एकदम गप्प झाला.

रोहिणी डोळयाच्या कोपऱ्यातून त्याच्याकडे पाहू लागली.

"आणि मग.." अदितीने विचारलं.

"आणि इंजिनिअरिंगला ॲडमिशन घेतलं. पण तिथलं गणित काय जमलं नाही. आयुष्याचंच गणित चुकल्यासारखं झालं. जाऊ दे आता.. कसा बसा पास झालो. तेच बास.."

रोहिणी शांत नजरेने मिहिरकडे पाहू लागली.

अदितीने तिच्या आयुष्यातले किस्से सांगायला सुरवात केली. अदितीचं बोलणं ऐकून रोहिणी खळखळून हसत होती. गेले कित्येक दिवस, महिने ती असं हसलीच नव्हती.

मिहिरला ते सर्व कळत होतं. तिनं सोसलेलं दु:ख त्याला कळत होतं. तिनं असंच आनंदात राहावं असं त्याला मनोमन वाटत होतं.

गप्पा मारत मारत बराच वेळ गेला. तिघांनाही झोप यायला लागली. रोहिणीने झोपण्याची तयारी केली.

मिहिरसाठी हॉलमध्ये अंथरूण टाकलं. रूममध्ये तिचं आणि अदितीचं अंथरूण टाकलं.

खुशी मिहिर सोबतच झोपणार होती. ती मिहिरच्या बाजूला झोपून वाढदिवसाचे फोटो बघत होती.

रोहिणी आणि अदिती आतल्या रूममध्ये पडल्या होत्या. रोहिणी आज खूप थकलेली. तिची आज चांगलीच दमछाक झालेली.

अदिती आज खूष होती. मिहिरला बघून तिला खूप आनंद झालेला. आपण लवकरच त्याला आपल्या मनातलं सांगायचं असं तिनं ठरवलेलं.

"अदिती..." रोहिणी म्हणाली.

"काय?"

"थँक् यू.. खूप मदत झाली तुझी आज."

अदिती नुसतीच हसली आणि म्हणाली,

"थँक् यू काय बोलते.. मला खूपच बरं वाटलं आज.. हे सगळं करून.. बघून.. मीच तुला थँक् यू बोलते."

रोहिणीने हसून अदितीकडे पाहिलं. रोहिणीचा आवाज आता शांत झालेला. ती किती थकलेली हे तिच्या आवाजावरूनच स्पष्ट होत होतं.

"रोहिणी दमलीस ना आज खूप.. किती काम करतेस गं.. तरी मी तुला सांगत होते आज राहू दे कामावर जायचं म्हणून. पण तू ऐकशील तर ना.."

रोहिणी नुसतीच हसली आणि अदितीला म्हणाली,

"अदिती एक सांगू..?"

"हां.." अदितीने प्रश्नार्थक नजरेनं बघितलं.

"कोणतीच गोष्ट आपल्या मनात फार काळ नाही ठेवायची. ती बोलून मोकळं व्हायचं. योग्य वेळ कधीच येत नसते. आपण व्यक्त व्हायचं. त्याचा

परिणाम मग काहीही होवो. आपण फक्त व्यक्त व्हायचं.. आपण.. हं... ह्मम.. आपण...व्य..हं...हं...

अदिती रोहिणीकडे गंभीर नजरेने बघत होती. रोहिणी बोलत बोलतच झोपली.

रोहिणीच्या बोलण्याचा काय अर्थ असावा याचा ती विचार करत होती. तिला समजत होतं पण उमजत नव्हतं. तिच्या डोळ्यासमोर रोहिणी आणि मिहिर उभे राहिले.

गेल्या आठ दिवसांत तिच्या आयुष्यात होत असलेला बदल तिला जाणवत होता. रोहिणीचं मध्येमध्ये हरवून जाणं, कोड्यात बोलणं तिला कळत नव्हतं. ती गोंधळात पडत होती. रोहिणीने आपल्याला हा सल्ला का दिला असावा याचा ती विचार करत होती.

रोहिणीला चांगलीच झोप लागलेली. ती निपचित पडलेली. बाहेरून मिहिरच्या बोलण्याचा बारीक आवाज येत होता.

अदिती उठली. ती बाहेर आली. मिहिर एकटाच बडबडत होता. खुशी त्याच्या कुशीत शांतपणे निजली होती. मिहिर हातवारे करत हळू आवाजात बोलत होता.

अदिती त्याच्या जवळ गेली. त्याच्या दुसऱ्या बाजूला जाऊन बसलीच. मिहिर दचकलाच.

"तू.. तू झोपली नाहीस..?"

अदिती काही बोलली नाही.. ती त्याच्या डोळ्यात एकटक पाहत होती. आणि ती एकदमच त्याच्या कुशीत गेली. तिने त्याला बसूनच मिठी मारली.

मिहिर चकित झाला. त्याच्या एका कुशीत खुशी होती. आणि एका कुशीत अदिती होती.

"काय झालं अदिती..?"

"अं हं...." अदितीने नुसताच हुंकार दिला.

"काय करतेस..?"

अदिती काहीच बोलली नाही. मिहिर शांत पडून राहिला. अदिती त्याच्या कुशीत शिरतचं राहिली.

"अदिती काय करतेय..? काय झालंय काय..?"

अदितीने काही प्रतिसाद नाही दिला. अदिती तिचं भान विसरली होती. तिला आता कधी एकदा मिहिरला आपल्या मनातलं सांगाव असं झालेलं. तिचा संयम आता तुटलेला.

तिनं त्याच्या कुशीतून डोकं वर घेतलं. त्याच्या डोळ्यात डोळे घातले आणि म्हणाली,

"मिहिर.. मिहिर आय लव्ह यू.. माझं खूप प्रेम आहे तुझ्यावर..

मिहिर शांत होता. जे चाललंय ते तो फक्त पाहत होता. त्याला हे सर्व अपेक्षित नव्हतं. सर्व काही अचानक झालेलं. त्याच्यासाठी हा खरं तर सुखद धक्का होता.

"आजच नाही. जेव्हापासून मी तुला पाहिलंय तेव्हापासून. दिड वर्षापासून मी तुझ्या प्रेमात आहे. दिड वर्षापासून मी तुझ्यासाठी झुरतेय. बऱ्याच वेळा तुला सांगण्याचा प्रयत्न केला. पण काही जमलंच नाही. तू मला सोडून गावी काय गेलांस तर माझं मन किती नाराज झालं. तुझा दुरावा मला सहन नाही होत. तू सतत मला हवाहवासा वाटतोस मिहिर. खूप वाट पाहिली मी तुझी. मला अजून वाट पाहायला नको लावूस. आय लव्ह यू मिहिर.

अदितीने मिहिरच्या डोळयात डोळे घालून तिचं मन हलकं केलं. तिने साठवलेलं तिचं प्रेम त्याच्या जवळ व्यक्त केलं.

ती मिहिरच्या कुशीत शिरली. त्याच्याशी हळू आवाजात आय लव्ह यू, आय लव्ह यू करू लागली.

मिहिर शांतच होता. तो तिला प्रपोज करणारच होता पण अदितीचं हे असं वागणं त्याला धक्का देणारं होतं.

"अदिती"

अदितीनं काही प्रतिसाद नाही दिला.

"अगं मला बोलू तरी दे."

अदिती त्याच्या कुशीतून वर आली त्याच्या डोळयात पाहू लागली.

"आय लव्ह यू"

अदितीने नकारार्थी मान डोलावली.

"आय लव्ह यू अदिती"

अदितीने परत नकारार्थी मान डोलावली.

"अगं नाही काय खरच माझही तुझ्यावर खूप प्रेम आहे."

"खोटं बोलतोस तू"

"खोटं का बोलू.. खरंच आय लव्ह यू."

अदिती नकारार्थी मान हलवत होती "मला माहितीय तुझं माझ्यावर नाही रोहिणीवर प्रेम आहे."

मिहिर गालातल्या गालातच हसला आणि म्हणाला,

"तसं असतं तर मग तुझ्या जागी आज रोहिणी असती ना.. अदिती मी खरंच बोलतोय.. माझही तुझ्यावर प्रेम आहे."

"मी बोलल्यावर."

"नाही.. आधीपासून.. खूप आधीपासून."

"मग मला तू बोलला का नाहीस..?"

"नाही बोललो. योग्य वेळ येण्याची वाट पाहत होतो."

"म्हणजे मी बोलण्याची.. मी बोलल्यावरच तू बोलणार होतास ना..?"

"नाही.. तसं नाही"

"मग कसं..?"

"अदिती.. ऑल इंडिया रँक १२१... युपीएससी क्लियर.."

"का S S S य..." अदिती जोरातच ओरडली.

"अगं अगं.."

खुशी झोपेतच हालचाल करू लागली. अदिती एकदम मिहिरपासून दूर झाली. ती रोहिणी उठली का ते पाहण्यासाठी रूमजवळ गेली. रोहिणी शांत चित्ताने निजलेली. तिचा चेहरा समाधानी वाटत होता.

अदिती दार बंद करून परत मिहिरजवळ आली. मिहिर उठून बसला होता. त्याने खुशीला एका बाजूला करून झोपावलं. तो सोफ्याला टेकून पाय पसरून बसला होता.

अदिती आली आणि पटकन तिने त्याला मिठीच मारली. मिहिरनेही तिला घट्ट मिठी मारली. अदिती मिहिरच्या मांडीवर बसली होती. त्याच्या डोळ्यात डोळे घालून त्याला प्रेमाने बघत होती.

"मिहिर खरंच..?"

"होय."

"मग सांगितलं का नाहीस..?"

"उद्या कळालंच असतं ना.. सरप्राईज द्यायचं होतं."

"कधी लागला रिझल्ट?"

"मी घरी आल्यावर केक कापतानाच्या दरम्यान नॉटिफिकेशन दिसली."

"मग का सांगितलं नाहीस..?"

"काय झालं असेल म्हणून बघत नव्हतो. आत्ताच बघितला."

"मिहिर.. आय लव्ह यू."

umha...umhaaa...umhaaaaaa....umahaa..

अदितीला खूप आनंद झालेला.. ती मिहिरच्या चेहऱ्यावर सगळीकडे किस करत होती.

"अदिती"

"हां"

"मला बोलायचंय."

"बोल ना."

"माझं खरंच तुझ्यावर प्रेम आहे. तू म्हणालीस ना दीड वर्षापासून तुझं प्रेम आहे म्हणून. तसं माझं ही आहे. तेव्हापासून, जेव्हा मी तुला नारळी बागेत बघितलेलं. अदिती अवाकच झाली. आणि म्हणाली,

"कधी..?"

"आपली ओळख व्हायच्याही आधी. मी चैत्यभूमीवर दर्शनासाठी आलेलो. दर्शन घेऊन नारळी बागेत येऊन बसलेलो. तेव्हा मी तुला त्या बाकड्यावर पाहिलेलं. तेव्हाच मला तू खूप आवडलेलीस. पण मलाच नेमकं कळत नव्हतं काय चाललंय ते. प्रेम आहे की नुसतंच ॲट्रॅक्शन. मी तुला बघितलं आणि बघतचं राहिलो. नंतर नंतर मलाच कसं तरी वाटायला लागलं. मग शेवटी विचार सोडून दिला. नशिबात असेल तर भेट होईल असं म्हणून मी तिथून निघालो."

अदिती हसली. तिच्या हसण्याचं कारण तिला माहित होतं.

"त्याच्या नंतर तुला ऑफिसमध्ये पाहिलं. तेव्हा तर मला झटकाच बसला. हळूहळू तू जास्तच आवडायला लागलीस. तेव्हापासून माझं प्रेम होतं. तुला कधी सांगितलं नाही. तू आवडत होतीस. पण कधी दाखवलं नाही. मला तुला समजून घ्यायचं होतं. तुझ्या आवडी निवडी बघायच्या होत्या."

"मग कसा आहे माझा स्वभाव..? कशी आहे माझी आवड..?" अदिती त्याच्या आणखी जवळ गेली आाणि तिचा गाल त्याच्या गालावर घासत म्हणाली.

"माझ्यासारखीच.. तू आणि मी जरा जरा सारखेच आहोत.

मिहिर अदितीच्या दोन्हीं गालांना धरतो.. तिला जवळ ओढतो.. तिच्या डोळ्यात डोळे घालून सांगतो.

अदिती लाजते त्याच्या डोळ्यात डोळे घालून बघत असते.

मिहिरने अदितीला जवळ ओढलं. तिच्या गुलाबी ओठांवर त्याचे ओठ ठेवले आणि तिचं दिर्घ चुंबन घेतलं. त्याचा उष्ण श्वास तिच्या श्वासात मिसळला.

अदिती लाजली. शरमेनं लाल झाली. त्याच्या कुशीत शिरली. मिहिरला हसू आलं. त्यानं तिला मिठित घेतलं. तिच्या पाठीवरून हात फिरवू लागला.

"अदिती मी माझ्या भविष्याची वाट बघत होतो. मी माझ्या पायावर कधी उभा राहतोय याची वाट बघत होतो. आणि आज प्रतिक्षा संपली. माझं स्वप्नं पूर्ण झालं."

"मी तुला उद्याच प्रपोज करणार होतो. पण तू अशी अचानक आलीस.. मला काहीच सुचेना."

अदिती खूष झाली. तिच्या संयमाचं फळ तिला मिळालं.

"मिहिर.. आणि रोहिणी..?"

"ती माझी मैत्रीण आहे अदिती.. आमचं प्रेम होतं. तिचं अचानक लग्न झालं. आमची ताटातूट झाली. खूप दु:ख सोसलयं तिनं अदिती."

"आणि तिचा नवरा..?"

"त्याचा अपघातात मृत्यू झाला."

"काय..?"

"होय.. खुशी दोन वर्षांची असतानाच.. तेव्हापासून ती एकटी आहे."

"अदितीला धक्काच बसला. तिला शंका होती पण असं काही झालं असेल तिला वाटलं नव्हतं.. लयत लय.. भांडण घटस्फोट पर्यंत तिचा अंदाज होता."

मिहिरने अदितीला रोहिणी बद्दल सर्व काही सांगितलं. अदिती सुन्न होऊन सर्व ऐकत राहिली. ते ऐकताना तिच्या डोळ्यासमोर रोहिणी उभी होती. गेले आठ दिवस त्यांनी घालवलेला वेळ, त्यांची मैत्री तिच्या डोळ्यासमोर उभी राहिली.

रोहिणीची कैफियत ऐकून अदितीच्या डोळ्यात पाणी आलं. आत्ताच्या आत्ता जावं आणि रोहिणीला घट्ट मिठी मारावी असं तिला वाटत होतं. मिहिरच्या सांगण्यावर अदितीचा विश्वास बसत नव्हता. तिनं एवढं कसं सोसलं असेल याचा ती विचार करत होती.

"अदिती"

"हां"

"माझं तुझ्यावर प्रेम आहे. रोहिणी माझा भुतकाळ होती. तू आमच्यावर शंका नको घेऊस. मी तुला फसव..."

अदितीने मिहिरच्या तोंडावर हात ठेवला आणि म्हणाली,

मला माहितीय मिहिर तू फसवणाऱ्यांच्यातला नाहीस. म्हणूनचं माझं तुझ्यावर प्रेम आहे. माझा तुझ्यावर पूर्ण विश्वास आहे. आणि रोहिणी.. रोहिणीवर मी कधीच शंका घेतली नव्हती.. अगदी पहिल्या दिवसापासून.. ती मला माझ्या मोठ्या बहिणीसारखी.. मला फक्त तिच्या रहस्यमयी वागण्याचा अंदाज लागत नव्हता. मी बोलता बोलता बऱ्याचदा विचारण्याचा प्रयत्न केला पण कळून पण तिनं काही सांगितलं नाही. रोहिणी फार हुशार आहे अजिबात मनाचा थांग लागू देत नाही. लगेच आपल्याला कळणार नाही अश्या तऱ्हेने विषय बदलते.

मिहिर तुझी ती बालमैत्रीण असेल पण आमचं आठ दिवसांत असं नातं तयार झालंय की मला ती जन्मोनजन्मीची बहिण वाटतेय..

अदितीचं बोलणं मिहिरला पटण्यासारखं होतं. रोहिणी होतीच तशी.

"काय रहस्यमयी वागली ती." मिहिरने विचारलं.

"म्हणजे असंच..खूप काय काय लपवत असल्यासारखं वाटतंय मला.."

"नेमकं कशाबद्दल..?"

"तिच्या आयुष्याबद्दल.. मला वाटतंय तू सांगितलंस तेवढच नसावं.. अजून काही तरी आहे जे ती आपल्यापासून लपवतेय."

अदिती मिहिरला पटवून सांगण्याचा प्रयत्न करत होती. "मला तर तिने सगळं सांगितलं. तुला पण मी आता ते सांगितलं. अजून काय असेल मग." मिहिर म्हणाला.

"तेच तर कळत नाहीय ना. मला सगळं रहस्यमयी वाटतंय. तिचं हसणं.. तिचं मध्येच रडणं.. मध्येच कुठेतरी हरवून जाणं.. कोड्यात बोलणं.. सगळंच.."

"रोहिणी इतकी वर्ष कुठं होती..?" अदितीनं विचारलं.

"नाही माहित.. आठ-नऊ वर्षानंतर मी तिला मागच्या रविवारी भेटलो."

"आठ नऊ वर्षानंतर.. बघ आता.. खुशी दोन वर्षांची असताना तिचे वडील वारले.. खुशी आता सहा वर्षांची झाली.. म्हणजे आता चार वर्ष झाली त्या गोष्टीला. चार वर्ष रोहिणी कुठं होती..? तिने दुसरं लग्नपण केलं नाही.. तिनं तुला तरी कॉन्टॅक्ट करायला हवा होता.. ती आत्ताच का आली असावी..?"

"आणि खुशी.. पाच-सहा वर्षांची खुशी.. आपल्याला एवढा जीव का लावत असावी..? जसं की ती आपल्याला आधीपासूनच ओळखत आहे असं वागते. असं कसं होऊ शकतं. आणि ते ही आठ दिवसात. चल मी तरी रोज भेटत होते. पण तू.. तू तर एकच दिवस भेटलास ना..? मग इतक्या लवकर एवढं बाँडिंग कसं होऊ शकतं..?"

"तुला माहितीय मिहिर.. त्या दिवशी मी आणि खुशी दोघंच होतो घरी. रोहिणी कामावर होती. खुशी मला काय म्हणाली माहितीय,

"काय..?"

"मम्मा"

"मम्मा..? चुकून म्हणाली असेल. रोहिणीचीच सवय आहे ना तिला."

"मला पण तसंच वाटलं. पण एक दोनदा ठीक होतं. मी खूप वेळा नोटीस केलं. मी काही जास्त बोलले नाही.

"नको एवढं टेंशन घेऊस.. चुकून झालं असेल.. अजून लहान आहे ती.. त्यात एकटीच असते.. तुझी अजून सवय नाही ना.."

"होय.. ते पण बरोबर आहे. मी रोहिणीला हे सांगितलं नाही. मला काय त्या गोष्टीचा राग नाही. तरी पण मला काही तरी खटकतंयच सारखं सारखं. मिहिर आपल्या आयुष्यात जे काही होत असतं ना त्या पाठीमागे काही ना काही कारण असतंच. आपल्याला त्यावेळी लक्षात नाही येत. वेळ गेल्यावर समजतं अन् तेव्हा कळतं, असं का झालेलं ते. काहीही म्हण निसर्ग आपल्याला पूर्वकल्पना म्हणून संकेत देतोच फक्त तो वेळीच लक्षात यावा लागतो. आपण सतर्क राहावं लागतं. तुला पटत नसेल पण मला तेव्हापासून जरा शंकाच येतेय सारखी सारखी. काही तरी आहे जे रोहिणी लपवतेय. काही तरी गूढ आहे जे ती मनात ठेवतेय."

मिहिरला अदितीचं म्हणणं जरा जरा पटत होतं. तोही आता या गोष्टींचा विचार करत होता.

"मला वाटतं आपण तिच्याशी बोलूया." मिहिर म्हणाला.

"मला ही तेच वाटतं. पण मिहिर रोहिणी हळवी आहे रे.. तिच्याशी जरा वेळ काळ बघून तिचं मन सांभाळूनच बोलायला हवं. आधीच खूप सोसलंय तिने."

मिहिरला अदितीचं बोलणं पटलं.

"ठिक आहे.. योग्य वेळी आपण बोलू.. मग तर ठिक."

"हो.. पण योग्य वेळ दिड वर्षांनी यायला नको.. जरा लवकरच यायला हवी." अदिती हसून त्याला टोमणा मारत म्हणाली.

"अच्छा.." मिहिरनं तिच्या पोटाला चिमटा घेतला. तिच्या डोक्याला धरत तिला जवळ ओढलं आणि म्हणाला,

"तू का विचारंल नाहीस गं..? एवढ प्रेम होतं तर.."

"विचारलं ना.."

"दिड वर्षांनीच ना..?"

तशी अदिती हसली आाणि तिने त्याच्या ओठांचं चुंबन घेतलं. ती त्याच्या कुशीत शिरली.

"मिहिर मी खूप खूष आहे आज."

"मी पण.. मला आता सगळं मिळालं."

मिहिर आणि अदिती दोघंही एकमेकांच्या मिठित होते. मिहिर अदितीच्या डोक्यावरून हात फिरवत म्हणाला.

"अदिती"

"हां.." अदितीने तिचं डोकं त्याच्या छातीशी ठेवलं होतं आणि ती नुसता हुंकार देत होती.

"तू खूप सुंदर आहेस"

"खरंच.."

"होय."

"अजून.."

"अजून.. तू खूप छान बोलतेस.."

"अजून..

"अजून.. तू खूप सुंदर लाजतेस."

"अजून.."

"अजून ना... तू लाजताना खूप सुंदर दिसतेस.. मिहिरने तीच जुनी ट्रिक वापरली.

"खरंच.."

"होय."

"अजून.."

"अजून... अजून ना... तू ना... तू खूप गुबगुबीत आहेस.."

तशी ती एकदम तिचं डोक वर घेते त्याच्याकडे हसत त्याच्या गालावर चापटी मारते.

"घाणेरडा कुठला.." ती अजून एक चापटी मारते.

"असं बोलतात..?"

"त्यात काय... घाणेरडा.. तुझे गाल किती गुबगुबीत आहेत.. एकदम सॉफ्ट सॉफ्ट.. त्यात काय घाण आहे.." मिहिर हसत म्हणाला.

"जा.. मला माहितीय तू कसं बोलतोस.." तशी ती त्याच्या ओठावर एक चापटी मारते.

"मला पण तुझं हाड लागतंय.. मी काय बोलली का..?"

मिहिरला हसू येतं.

"अदिती हाड नाही तिथं..." मिहिर हसत म्हणतो..

"जा... जा... जा बाबा.. घाणेरडा आहेस तू खूप... मला नाही बोलायचं तुझ्याशी."

अदिती मिहिरच्या छातीवर मारत असते.

"अगं खरंच.. हाड नाही ते.. मोबाईल आहे माझा.. तू माझ्या मोबाईल वर बसली आहेस.. बघ हवं तर हात लावून.." तसा मिहिर जोरजोरात हसायला लागतो.

अदितीला त्याच्या बोलण्याचा अर्थ कळालेला असतो. ती त्याच्या छातीवर मारत असते. मिहिर हसत असतो.

"जा.. जा.. जा.. जा.. तू ना.. खरंच.. जा मला नाही बोलायचं."

"अगं.. खरंच.. बघ हवं तर..?"

अदिती उठते आणि मिहिर तिला मोबाईल दाखवतो.

"बघ.. बघ.. पटली खात्री..?"

अदिती परत खाली बसते मिहिर हसतच असतो.

"चावट कुठला. मला माहितीय तू कसा बोलतोस ते.." अदिती त्याला लाडाने एक एक चापटी त्याच्या गालावर मारत असते. मिहिर हसत असतो. अदिती लाजत असते. ती परत त्याच्या कुशीत शिरते.

"मिहिर"

"हां"

"तू खुशीसाठी काय काय आणलंस आणि माझ्यासाठी..?"

"काय हवयं तुला बोल..?" मिहिर अदितीचं डोक वर घेतो तिला जवळ ओढतो आणि तिला विचारतो.

अदिती नुसती लाजत असते त्याच्या डोळ्यात डोळे घालून बघत असते.

"मला ना.. मला ना तू पाहिजेस.."

"मी तर तुझाच आहे."

"लग्न करणार ना माझ्याशी..?"

"हे काय विचारणं झालं.. अगदी थाटामाटात.."

"खरंच..?"

"होय.. खरंच.." तसं तिला तो ओठांवर हलकसं किस करतो.

"मग मला तू पाहिजेस बाकी काही नको."

तशी ती त्याला जोराची मिठी मारते. तिचा गाल त्याच्या गालावर फिरवते. त्याच्या गालावर तिच्या गुलाबी ओठांनी किस करते.

"मिहिर"

"हां"

"किती सतवलंस रे मला..!"

"काय सतवलं..?"

"तुझं पण प्रेम होतं तर का सांगितलं नाहीस..?"

"सांगितलं ना आता.. मला माझं भविष्य घडवून तुला सांगायचं होतं."

"मग काय झालं.. सांगायचंस ना आधीच आणि मग तुझं भविष्य घडवायचं होतंस."

"असं कसं"

"का तुला काय वाटलं मी तुला नाही म्हणाले असते का.. मला फक्त तू हवा आहेस.. कसा जरी असलास तरी"

"तू हो म्हणाली असतीस..?"

"तर.. माझं तुझ्यावर प्रेम होतं. मला तुझा स्वभाव आवडत होता. आणि आयुष्यात तेच महत्वाचं असतं ना.?"

"होय.. ते तर आहेच.. तरी पण."

"तरी पण काय.. माझी तुला मदत झाली असती.. तुला हवं नको ते मी बघितलं असतं."

"होय बरोबर आहे पण अदिती कसं असतं माहितीय.. जास्त सोईचं वातावरण कधी कधी उपयोगाचं नसतं.. आपण जितक्या जास्त अडचणींना सामोरे जावू ना तितका आपला आत्मविश्वास वाढत जातो.. आपण एवढ सगळं सांभाळून सगळ करत आहोत ही भावनाच आपलं लक्ष्य गाठायला पुरेशी असते."

"होय खरंच आहे ते.. पण मी तुझ्यापेक्षाही खूप आनंदी आहे तुझ्यासाठी."

"खरंच"

"होय"

अदितीच्या डोळ्यात टचकन पाणी येतं. अदिती तिचं नाक त्याच्या नाकावर घासते..

"मिहिर.. आय लव्ह यू.."

"आय लव्ह यू टू"

"मिहिर"

"हां"

"खुशी खूप गोड आहे ना"

"हं... खूप.."

"मिहिर"

"हां"

"मला पण खुशी सारखी एक मुलगी पाहिजे." अदिती तिची गोंडस इच्छा त्याच्याजवळ बोलून दाखवते. त्याच्या डोळ्यात डोळे घालून त्याला विचारते,

"आपल्याला पण खुशीसारखी गोड मुलगी मिळेल ना..?"

मिहिरच्या चेहऱ्यावर मंद स्मित असतं.

"आपल्या हातात थोडी आहे ते.. मुलगा मुलगी.. नशिबात जे असेल ते मिळेल. आपण फक्त प्रयत्न करत राहायचं.. तसं मिहिर गालातल्या गालात हसू लागतो.

"हं.. बरोबर आहे.." अदितीला काही कळत नाही ती मान डोलावून बोलते आणि लगेच चमकून मिहिरकडे बघते.

"काय म्हणालास..?"

"कुठे काय..? एवढंच की आपण प्रयत्न करत राहिलं पाहिजे.. जे होईल ते होईल.."

"जा... जा... जा... तू ना... तू ना आता खूप चावट झालायस... जा..."

तशी ती त्याच्या ओठांजवळ तिचे ओठ नेते. त्याला हळूच चावते.

"तू ना.. खूप चावट आहेस.." आणि लगेच ती त्याचा खालचा ओठ तिच्या ओठाने ओढते आणि पुन्हा चावते.

"अगं काय करते.. मला चावट बोलते आणि स्वत: चावटपणा करते."

अदिती नुसतीच हसत असते.

"गुबगुबीत वाटते मी तुला..?"

मिहिर गालातल्या गालात हसतो.

"का? नाहीस..?"

"तू म्हणतोस ना.. मग असेलच.. सॉफ्ट सॉफ्ट.."

तसे ते दोघे ही हसायला लागतात.

"मी सॉफ्ट सॉफ्ट.. आणि तू.. हार्ड हार्ड.." तशी ती स्वत:च जोरजोरात हसायला लागते.. मिहिरला ही खूप हसू येतं..

"आता आता.. मला घाणेरडी बोलते... आणि स्वत:.."

अदिती मिहिरचा ओठ जोरात चावते..आणि म्हणते,

"तू आणि मी आपण दोघेपण.. बस.."

तशी ती त्याच्या आणखीनच जवळ जाते.

"अजून काय काय वाटते..?"

"अजून ना.. खूप काय काय.. प्रयत्न करताना सांगेन..

तसे दोघंही हसायला लागतात.

अदिती त्याला मिठित घेते. वेलीनं झाडाला आणि अजगरानं माणसाला लपेटून टाकावं तशी ती त्याच्या भोवती स्वत:ला लपेटून टाकते.

"मिहिर मला तुझ्यापासून दूर जाऊ वाटत नाही. मला आता तुझ्याजवळचं ठेव."

"ह्मममम.. चालेल."

"आणि काय..?"

"आणि ना"

"हां"

"आणि"

"बोल"

"आणि.. मी नाय जा.."

"अरे..!"

"मला ना खूप प्रयत्न करायचेत." अदिती तिचे ओठ त्याच्या कानाजवळ आणते आणि त्याच्या कानाशी खेळत खेळत चावत चावत बोलते.

"तुला प्रयत्न करायचेत..?" मिहिर हसतो आणि तिला विचारतो.

"हां..." ती लाजून मान डोलावते.

"ठीक आहे."

तशी ती लालेलाल होते.

"आपलं लग्न झालं की"

"कधी करायचं आपण लग्न..?"

"माझं ट्रेनिंग पिरियड संपलं की लगेच."

"खरंच..?"

"होय.. खरंच."

"आणि तोपर्यंत..?"

"तोपर्यंत.." तो तिच्या ओठांवरून बोट फिरवतो आणि म्हणतो,

"तुझे ओठ कशासाठी आहेत..?" तसं तो तिचं एक दिर्घ चुंबन घेतो.

अदिती त्याच्या कुशीत शिरते. त्याच्याशी हळू आवाजात बोलायला लागते. दोघंही खूप खूप आनंदी असतात. मिहिरचा थकवा त्या प्रसंगाने नाहीसा होतो.

बराच वेळ त्यांच्या गप्पा सुरू असतात. बघता बघता रात्र पहाटेचं रूप घेऊन येते. अदिती मिहिरला किस करून खुशीचा पापा घेऊन आतल्या खोलीत जाऊन झोपते.

मिहिर खुशीला जवळ घेतो. तिच्या डोक्यावरून मायेचा हात फिरवतो आणि झोपतो. कशाचीही पर्वा त्याला आता नसते. तो समाधानी चित्ताने निजतो.

ती रात्र त्या तिघांसाठी ही समाधानाची रात्र होती. रोहिणीच्या मनाला माहित होतं आता कशाचीही पर्वा करायची गरज नाही. अदितीचं प्रेम व्यक्त झालेलं. ती सुद्धा समाधानी होती.

आणि मिहिर.. मिहिरला तर त्याने जे जे गमावलेलं ते ते सर्व मिळत चाललेलं. त्याची मैत्रीण, त्याचं कुटुंब, आणि अदिती.. मैत्री, घर, प्रेयसी, आणि युपीएससीचं स्वप्नं...

मिहिरनं त्या रात्री समाधानाची झोप घेतली. अशी झोप त्याला कित्येक वर्षांतनं आज मिळाली होती. उद्या उगवणारा सूर्य त्याच्यासाठी नवीन आयुष्य घेऊन येणार होता.

*****

# विरह

त्या दिवशीची पहाट उजाडली ती मिहिरच्या यशानं. त्याला मिळालेलं यश न्यूजमध्ये दिसत होतं. वृत्तपत्रांत छापलं होतं. लोकालोकांत बोललं जात होतं. सर्वत्र युपीएससी यशस्वीतांचं अभिनंदन होत असताना दिसत होतं.

मिहिरने मात्र त्याची काही दखल घेतली नव्हती. तो निवांत झोपला होता. ती झोप त्याला सुख देणारी होती. इतक्या वर्षांची मेहनत कामी आलेली. तो उठल्यानंतर त्याचं जग बदलणार होतं. त्याच्याकडे बघण्याची दुनियेची नजर बदलणार होती. आता प्रत्येक जण त्याच्याकडे आदरानं बघणार होता. त्याचा बाप अभिमानानं मिरवणार होता.

अदितीनं रोहिणीला सगळं सांगितलं. तिचा सल्ला तिनं कालच घेतला आणि तो आमलात ही आणला असं जेव्हा रोहिणीला म्हणाली तेव्हा रोहिणीने तिला स्पष्टच विचारलं,

"हो म्हणाला का..?"

अदितीने लाजून सर्व काही स्पष्ट केलं. तिनं रोहिणीला कडकडून मिठी मारली. तिच्या डोळ्यात पाणी आलं. ती रोहिणीचे आभार मानू लागली.

"रोहिणी तू नसतीस ना तर.. रोहिणी खूप काही शिकवलंस मला तू.. तू मला कधीच सोडून जाऊ नकोस. अशीच माझी मोठी बहिण म्हणून रहा.." अदितीला रडू कोसळलं.. रोहिणीच्या डोळ्यात पाणी आलं. तिने अदितीला मिठित घेतलं. अदितीचे डोळे पुसले. दोघींही एकमेकांच्या मिठित पडल्या.

रोहिणीचा आनंद गगनात मावत नव्हता. मिहिरच्या यशानं तिचे डोळे दिपून गेलेले. अदितीच्या मायेनं तिचं काळीज भिजलेलं. अदितीच्या डोक्यावरून तिनं हात फिरवला आणि "खूष रहा दोघंपण" असं मायेनं म्हणाली.

अदितीने न्यूज चॅनेल लावून ठेवलं. रोहिणी आरतीचं ताट घेऊन तयार होती. न्यूजवर सर्वत्र कौतुक होताना दिसत होतं. मिहिरचं ही नाव त्यात होतं. मिहिरचा मोबाईल वाजून वाजून बंद होत होता.

मिहिर उठला तो कौतुकाच्या वर्षावांनीच. किती तरी फोन मिहिरला येत होते. मिहिरने सरळ सरळ फोन बंद केला आणि आज आपण सगळा दिवस एन्जॉय करायचं असं त्यानं जाहिर केलं.

मिहिर तयार झाला. रोहिणीनं त्याला ओवाळलं. त्याला ओवाळताना तिचे डोळे भरून आलेले. त्याच्याकडे अभिमानाने ती बघत होती. मिहिरच्या ही डोळ्यात पाणी होतं.

"तू आयुष्य लढायला शिकवलंस रोहिणी." तो इतकंच म्हणू शकला.

खुशी मिहिरचा फोटो टिव्हीत पाहून अदितीला घेऊन नाचत होती. अदिती आणि खुशीमधलं नेमकं लहान कोण आहे हे सांगण अत्यंत कठिण होतं त्या वेळी.

ते चौघेही आनंदात होते. त्यांनी तो दिवस खूप एन्जॉय केला.

मिहिरला कौतुकासाठी सर्वत्र आमंत्रण येत होती. ऑफिसमधून त्याचा सत्कार झालेलाच. त्याचे सर त्याचं तोंड भरून कौतुक करत होते. त्यांनी त्याला घरी जेवणासाठी आमंत्रण दिलं होतं.

अदिती कामावर रूजू झालेली. मिहिरचे महाराष्ट्रभर दौरे सुरू होते. रोहिणी मध्यंतरी तिच्या मैत्रीणीच्या लग्नाला गेलेली. अदितीने बऱ्याचदा तिला

कॉन्टॅक्ट करण्याचा प्रयत्न केला पण तिचा फोन बंद दाखवत होता. अदितीने मिहिरला याची कल्पना दिली. मिहिरने भेटून बोलू असं सांगितलं.

त्या दिवशी तो मुंबईत आलेला. सरांचं जेवणाचं आमंत्रण होतं म्हणून दोघंही तिकडे जात होते.

"मिहिर आता दहा दिवस होत आले... एक फोन नाही रोहिणीचा." अदिती चिंताजनक चेहऱ्याने म्हणाली.

"ह्ममममम... मी पण त्याचाच विचार करतोय.. काही तरी झालं असेल फोनला.. करेल ती कॉन्टॅक्ट.."

"पण अजून का केला नाही..?" ती अशी वागत नाही कधी.

"होय.. ते तर आहे.. तिला तरी कुठे करमणार आहे..? करेल ती फोन.. सांगेल ती काय झालेलं ते.. नको टेंशन घेऊस.."

अदिती चांगल्याच चिंतेत होती. रोहिणीचं असं वागणं तिला आवडलं नव्हतं. तिने फक्त मेसेज करून तिला लग्नाला जात असल्याचं कळवलेलं ते ही अचानकच.. पूर्व कल्पना न देता.. अदितीला तिला एकटं सोडायचं नव्हतं. ती ही तिच्यासोबत जाणार होती.. पण तेव्हापासून त्यांचं बोलणंच नव्हतं झालं. रोहिणीचा फोन बंदच होता.

तिचं असं कधी कधी रहस्यमयी वागणं मनाला चटका लावण्यासारखं होतं.

मिहिर आणि अदिती सरांच्या घरी आले. त्यांचा दरवाजा उघडताच त्या स्त्रीला पाहून मिहिर अवाक झाला.

"स्नेहा..?"

"तू..?"

"तुम्ही इथे..?"

"ए..अरे तुम्ही काय? स्नेहाच म्हण. परकी आहे का मी?"

"या ना.. या.. आत या..."

मिहिरचे सर सोफ्यावरच होते त्यांना दोघांना पाहून आनंद झाला. ते दोघंही सोफ्यावर बसले. मिहिर आश्चर्यचकीत झालेला. अदितीला मिहिरच्या चेहऱ्यावरचा उडलेला रंग दिसला. ती त्याला हळूच विचारत होती कोण आहे म्हणून.

स्नेहाने तिच्या नवऱ्याला आम्ही एकाच गावचे असल्याचं सांगितलं. तिथे असणाऱ्या सर्वांना सुखद धक्का बसला.

स्नेहाने इतका चांगला नवरा केल्याचं मिहिरला माहित नव्हतं. आणि तो त्याचा बॉसच आहे हे तर त्याला बिलकूल माहित नव्हतं. तो माणूस खरचं चांगला होता. त्याचं वयही जास्त वाटत नव्हतं. तीस बत्तीस वय असेल. त्यात

तो चांगलाच श्रीमंत होता. त्याच्या चेहऱ्यावर श्रीमंतीचा माज अजिबात दिसत नव्हता.

मिहिरचं यश पाहून स्नेहाला मनापासून आनंद झाला. तिने त्याचा भाऊ म्हणूनच पाहुणचार केला. स्नेहाचा मनमिळाऊ स्वभाव अदितीला आवडला.

निघता निघता स्नेहाने रोहिणीची आठवण काढली. रोहिणीचं नावं ऐकून अदिती चकित झाली. रोहिणी आणि स्नेहा एकाच बॅचच्या असं तिला कळालं.

"कधी भेटते का रे रोहिणी.?" स्नेहाने विचारलं.

"होय.. मुंबईतच आहे ना ती."

"काय? खरचं..? मला नाही माहित.. बोलली नाही ती.. कधीपासून..?"

"पाच सहा महिने झाले." अदितीने सांगितलं.

"पाच सहा महिन्यांपासून आहे आणि मला माहित नाही."

"विसरून गेली असेल." मिहिर म्हणाला.

"असेल कदाचित.. कशी आहे ती..? अणि तिची मुलगी खुशी."

"आहे.. ठिक आहेत.. दोघीही ठिक आहेत."

"तुमची होते वाटतं भेट..?"

"भेट म्हणजे.. आम्ही ही हल्लीच भेटलो तिला.. पंधरा वीस दिवसांपूर्वी.. बऱ्याच वर्षांनी भेटली ती.."

"अच्छा"

"खुशीचा वाढदिवस होता ना.. तेव्हा आम्ही आठ दहा दिवस एकत्रच होतो." अदिती म्हणाली.

"अच्छा.. अच्छा.. गोड आहे मुलगी." स्नेहा म्हणाली आणि एकदमच काही तरी आठवल्यासारखं ती एकदम गंभीर झाली.

"वाढदिवस..? कोणाचा..?"

"खुशीचा"

"असं कसं होईल..? कधी होता..?"

"अत्ता पंधरा दिवसापूर्वी."

"असं कसं.. आत्ता दोन तीन महिन्यापूर्वी तिची आणि माझी भेट झाली. मी स्वत: होते खुशीच्या बर्थडेला."

"काय..?" मिहिर आणि अदिती दोघेही चकीत होऊन एकदमच बोलले. दोघंही आश्चर्याने एकमेकांकडे पाहत राहिले.

"हो तर."

"असं कसं..? आम्ही आत्ता पंधरा दिवसांपूर्वी तिचा वाढदिवस साजरा केला." अदिती म्हणाली.

"काय बोलतेस..?"

"होय खरंच.." मिहिर म्हणाला.

"असं कसं होऊ शकतं.. मी तिला भेटले.. तिने आमंत्रण दिलं.. वाढदिवस झाला.. फार लांबची गोष्ट नाही ही.. तीनच महिने झाले.. होय.. बरोबर.. तीनच... एक मिनीट.. एक मिनीट.. फोटो असेल ना माझ्याकडे.. थांब हा थांब..

स्नेहा विचारात पडून एकटीच बोलत होती. अदितीला आणि मिहिरला ही चांगलाच शॉक बसलेला.

"हां.. हां.. हे बघ.. मिळाला."

तिने दोघांनाही तो फोटो दाखवला. फोटो वाढदिवसाचाच होता. तारीखही तीन महिन्यांपूर्वीची होती. रोहिणी आणि खुशी असल्याचं सिद्ध होत होतं.

स्नेहाला ही अदितीकडचा फोटो बघून चांगलाच शॉक बसला.

कोणालाच काही कळेनासं झालं. असं का वागली असेल रोहिणी..? दोनदोन वाढदिवस करण्यामागे काय हेतू असेल तिचा..? अदिती चांगलीच गोंधळली होती.

"अजून काय म्हणाली रोहिणी..?" अदितीने विचारलं.

"काही विशेष असं काही नाही.. बऱ्याच वर्षांनी मला कोल्हापूरात भेटली. आमचं नवीन घर घ्यायचं ठरत होतं गावी. आमची भेट एजेंटच्या ऑफिसमध्येच झाली. बराच वेळ आम्ही बोलत होतो. गावी आता घर

घेतल्याचं तिने सांगितलं. मुंबईला राहतेय असं काही म्हणाली नाही.. आता आहे कुठं ती..?"

"तेच तर माहित नाही ना.." अदिती म्हणाली. "वाढदिवसानंतर तिचा पत्ताच नाही. मैत्रीणीच्या लग्नाला जाते असं म्हणून जी गेली ते अजून आलीच नाही."

मिहिर सर्व फोटो काळजीपूर्वक पाहत होता. एक फोटो त्याला खटकत होता.

"ही मुलगी कोन स्नेहा..?"

"कोण बघू..?"

स्नेहाने फोटो झूम केला.

"ही.. कोणी तरी तिची मैत्रीणच असावी कदाचित.. तेव्हा फार तिच्या मैत्रीणी होत्या.. आमच्या बॅचचं असं कोणी नव्हतं.. मी एकटीच होते.. जवळपास सगळ्या कामावरल्याच होत्या. का रे..?"

"काही नाही.."

अदितीने तो फोटो पाहिला. आणि आपल्याकडचा फोटो तिला दाखवला.

"होय हीच.. हीच होती.." स्नेहाने ओळखलं.

"कोण ही..?"

"खुशीला सांभाळते मुंबईत. आम्हांला ही जास्त माहिती नाही तिच्याबद्दल."

"रोहिणीची जवळचीच कोणी तरी असावी मग."

"असंच वाटतंय आता... पण मला कळत नाही रोहिणी असं का वागतेय..? नेमकं काय लपवतेय ती आपल्यापासून..?

"ते आता ही मुलगीच सांगेल." मिहिर म्हणाला.

"चला निघतो आम्ही.. स्नेहा खूप खूप थँक्स.. वाटलं नव्हतं इथे येऊन एवढं काही होईल ते."

"खरचं.. मला ही चांगलाच धक्का बसलाय.."

"थँक् यू स्नेहा.. थँक् यू सर.." अदिती म्हणाली..

"थँक् यू सर.." मिहिरने ही आभार मानले.

"या.. आणि मिहिर मला ही कळव.. अदिती कॉन्टॅक्ट मध्ये राहा."

"हो नक्कीच.."

ते दोघं तिथून सरळ रोहिणीच्या घराच्या दिशेने गेले. अदितीला रोहिणीबद्दल वाटणारं रहस्य वाढत चाललं होतं. मिहिरलाही अदितीचं म्हणणं आता पूर्णपणे पटत होतं. आपल्या मैत्रीणीसोबत नेमकं हे काय होतयं त्याला कळत नव्हतं.

ते दोघंही रोहिणीच्या घरी आले. दारावरचं कुलूप त्यांनी डूप्लिकेट चावीने उघडलं. त्यांनी तिच्या घराची झडती घ्यायला सुरवात केली. अदितीला खात्री होती की तिला नक्की काय तरी सापडेल म्हणून.

रोहिणीच्या कपाटात अदितीला तिची डॉक्यूमेंट फाईल मिळाली. त्यात खुशीचं बर्थ सर्टिफिकेट तिला दिसलं. तिने मिहिरला जाऊन ते दाखवलं.

बर्थ सर्टिफिकेट पाहून दोघंही एकमेकांच्याकडे आश्चर्याने पाहू लागले. स्नेहा म्हणत होती ते खरच होतं. तीन महिन्यापूर्वीची तारिख होती.

अदिती चांगलीच गोंधळली.. रोहिणीचं हे असं वागण्याचा काय अर्थ असू शकतो याचा ती विचार करायला लागली.

मिहिर एकदमच खाली बसला. त्याची नजर त्या बर्थ सर्टिफिकेटवरच्या नावावर होती. अदिती त्याच्या बाजूला बसली.

"मिहिर काय झालं..?"

मिहिर काही बोलला नाही.

"मिहिर.."

"हां..."

"काय झालं..?"

"नाव.."

"नाव काय?"

"खुशीचं नाव"

अदितीने सर्टिफिकेट हातात घेतलं आणि नावं वाचलं.

"सखी मोहित सरंजामे.. खुशीचं नाव सखी आहे."

मिहिरच्या डोळ्यात पाणी होतं.

"काय झालं मग.. मिहिर..?"

"अदिती..."

"हां.."

"मी रोहिणीला सखी म्हणायचो."

"काय..?"

"होय."

"तुला तिने हे कधी सांगितलं नाही.. खुशीचं नाव सखी आहे म्हणून."

"कधीच नाही."

अदितीला ही शॉक बसला.. रोहिणीचा हा गुंता वाढतच होता..

पहिल्या दिवसापासून रोहिणीचं वागणं अदितीला पेचात टाकणारं होतं. तिच्या बोलण्यातून वागण्यातून बऱ्याच गोष्टींचा अर्थ कळत नव्हता.

रोहिणीचं एकदम हरवून जाणं.. त्या दिवशी अचानकच रडणं.. खुशीला जवळ घेणं.. वाढदिवस नसताना पुन्हा साजरा करणं.. मिहिरला आणि मला

एकत्र आणणं.. खुशीचं मला मम्मा म्हणणं.. सर्व सर्व अदितीच्या डोळ्यासमोर आलं.

अदितीला नक्कीच रोहिणी कुठल्या तरी मोठ्या संकटात असल्याचं जाणवू लागलं.

अदितीच्या डोळ्यात पाणी आलं. तिनं तिची मान मिहिरच्या खांद्यावर टाकली.

"मिहिर.. मला खूप भीती वाटतेय." अदिती रडत रडतच बोलली.

मिहिर शांत होता. शून्यात पाहत होता. त्याच्या नजरेसमोरून रोहिणी हटत नव्हती.

अदितीने रोहिणीचा चांगलाच धसका घेतला. ती रडू लागली. आपली जिवाभावाची मैत्रीण आपली साताजन्माची बहिण नक्कीच कुठल्यातरी संकटात आहे असं तिला जाणवू लागलं.

रोहिणीचा तो हसरा चेहरा तिच्या डोळ्यासमोरून हटत नव्हता. मावची मावची म्हणून खुशीने दिलेली हाक तिच्या कानात गुंजत होती.

मिहिर उठला.. अदिती ही त्याच्यापाठोपाठ उठली.

"चल आपण शोधू त्या मुलीला.. इथे जवळच कुठे तरी असणार ती चल..." मिहिर डोळे पुसत म्हणाला.

अदितीने डोळे पुसले. दोघंही घर लॉक करून बाहेर पडले.

बराच वेळ शोध घेऊनही त्यांच्या हाती काहीच आलं नाही. जवळपास कुठे बेबी सीटिंग नसल्याचं त्यांना कळालं. आणि या मुलीला ही कुठे पाहिलं नसल्याचं त्यांना कळालं.

दोघंही घरी परत आले. अदितीला रडू कोसळलं. मिहिरने तिला आधार दिला. अदिती ओक्साबोक्शी रडू लागली. मिहिरची ती रात्र अदितीला सावरण्यातचं गेली.

दुसऱ्या दिवशीची सकाळ त्यांची आणखी एका धक्क्यानेच झाली. मिहिर आणि अदिती टाटा हॉस्पिटलमध्ये निघालेले. तिथून एका मुलाने कॉल केलेला. कॉल रोहिणी संदर्भात होता. तुम्ही हॉस्पिटलमध्ये या असं तो म्हणत होता. मिहिर आणि अदिती तात्काळ निघाले.

ते दोघंही त्यांना सांगितलेल्या फ्लोअरवर आले. तिथे येताच त्यांना बाकड्यावर ती मुलगी दिसली. तिच्या शेजारी एक मुलगा बसलेला. मिहिरने तिला ओळखलं. ती तीच मुलगी होती जिला ते रात्री शोधत होते.

मिहिर तिच्याजवळ गेला. तो मुलगा उठून उभा राहिला.

"मीच बोलवलं तुम्हांला.." तो म्हणाला.

त्या मुलीने डोकं वर घेतलं. रडून रडून तिचे डोळे सुजलेले दिसत होते. मिहिरला पाहताच तिचा हुंदका फुटला.

"दादा... तू आला.." म्हणत ती जोरजोरात रडू लागली.

मिहिर तिच्या जवळ गेला. तिच्या डोक्यावर हात ठेवला. तिने बसल्याबसल्याच मिहिरला विळखा घातला.. अदिती तिच्या शेजारीच बसली. अदितीने तिला जवळ घेतलं. तिला शांत केलं. तिने अदितीला ताई म्हणत मिठी मारली आणि पुन्हा रडू लागली.

खूप वेळाने ती शांत झाली. तिने डोळे पुसले. मिहिर तिच्या समोरच गुडघ्यावर बसला. अदिती तिच्या बाजूला बसली.

मिहिरकडे बघून ती बोलू लागली.

दादा, मी सारीका... रोहिणीच्या मामाची मुलगी. मी आणि ताई एकत्रच राहायचो. खुशी माझ्याकडेच असायची. ताईने तुम्हांला खोटं सांगितलं की मी बेबी सीटिंगची दिदि आहे म्हणून.

दादा मला तुमच्याबद्दल सर्व माहित आहे. ताई मला सगळं सांगायची. ताईचं जेव्हा लग्न ठरलं होतं ना तेव्हा मीच तिला मदत केली होती. पण दुर्दैवानं ती फसली. नशिबानं तिची साथ नाही दिली. पण ताईने माझं नाव घेतलं नाही.

मी लहान होते तेव्हा. पण ताईचं दु:ख मी समजू शकत होते. तिला रडताना मला बघू वाटत नव्हतं. ती फक्त तुझच नाव घेत होती. पण आम्ही काही नाही करू शकलो.

तिचं लग्न झालं. मनाविरूद्ध झालं. दुर्दैवानं तिचा संसारही टिकला नाही. नवऱ्याच्या मृत्यूनंतर ती कोल्हापूरला आली. ती गावीही गेली नाही. घरातल्यांशी तिने संबंध तोडून टाकले.

माझ्या शिक्षणासाठी मी ताईकडेच आले. ताईनेच मला बोलवून घेतलं. ताईने मला आणलं नसतं तर मी सुद्धा आज कुठं तरी भांडी घासत राहिले असते. माझा बाबा पण माझं लग्न लावून देण्याच्या तयारीत होता. मी पळून आले.

ताईने मला सांभाळलं. मला शिकवलं. मी आणि ताई एकत्रच राहत होतो. ताईने बँकिंगची परिक्षा दिली. पहिल्याच प्रयत्नात तिला नोकरी मिळाली. ताईला सुखाचे दिवस आले. मुलीसोबत ती रमू लागली. खुशीच तिचं जग होतं. जवळजवळ तिचं घराचं स्वप्नंही होत आलेलं. फार आनंदात ती जगत होती.

पण दुर्दैव्य तिच्या उरावरचं बसलेलं. तिचा वाईट काळ तिचा पिछा सोडत नव्हता. तिची तब्येत फारच खराब होत होती. सारखी सारखी आजारी पडायची. एक दिवस चक्कर येऊन पडल्याचं निमित्त झालं. आम्ही तिला दवाखान्यात घेऊन आलो.

तिथंच काळाने घात केला दादा. तशी ती जोरजोरात हुंदके देत रडू लागली.

"ताईला कॅन्सर असल्याचं डॉक्टरांनी सांगितलं दादा."

मिहिरच्या पायाखालची जमीन निसटली. अदितीच्या डोळ्यात पाणी आलं. ती रडू लागली. ती खालीच कोसळली. तिला भोवळ आली. मिहिरने तिला धरलं. तिला शुद्धीवर आणलं. मिहिरला पाहून अदिती अजूनच रडू लागली. मिहिरने तिला उठवून बाकड्यावर बसवलं. तिचा हात हातात धरला. तिला शांत केलं.

सारीका पुढे सांगू लागली.

दादा डॉक्टरांनी स्पष्ट सांगितलं तुमची केस फार रेअर आहे. तुम्ही याआधीच दाखवायला हवं होतं. आता उशीर झालाय. जवळजवळ आता ही थर्ड स्टेज आहे. तुम्ही एकदा मुंबईला टाटामध्ये दाखवा.

आम्ही मुंबईत आलो. इथे ही ताईला तेच सांगितलं गेलं. "थर्ड स्टेज नंतर फार शक्यता कमी असते. तुम्ही जरा आधीच दाखवायला हवं होतं. आता तुमच्याकडे फार कमी वेळ आहे."

ताई त्या दिवशी खूप रडली. आता कुठे तिला सुखाचे दिवस आलेले. माझ्यानंतर खुशीचं काय होईल या चिंतेनं ती पार खंगून गेली. मी ताईला धीर देत होते. पण ताई.. दादा ताई.. तशी ती रडूच लागली.

दादा ताईकडे बघवत नव्हतं रे... ती रडत रडतच सांगू लागली. तिच्या नंतर खुशीचं काय होईल हा एकच विचार तिला सतवत होता.

तिला तुझी आठवण झाली. तिने तुझा शोध घेतला. पण तू गावी नसून मुंबईतच असल्याचं तिला समजंल. ती एकदा मुंबईत तिच्या मैत्रीणीला भेटायला म्हणून तिच्या पत्त्यावर गेली. तर वॉचमनने तिला सांगितलं की मॅडम आता इथे राहत नाहीत. इथे आता नवीन ऑफिस सुरू केलंय. त्या आता दुसरीकडे राहतात. वॉचमन तो पत्ता लिहून देत होता.

आणि..

तिने तुला बघितलं. तू आणि अदिती एकत्र येत होता. तुला बघून ताईला फार आनंद झाला. तुम्ही दिसल्याची बातमी ताईने मला सांगितली. ती फार आनंदी झाली.

इतक्या वर्षांनी तू दिसलास पण तुला भेटता नाही आलं. ताईला वाईट वाटलं. तिला खुशीची चिंता सतावतच होती.

तुम्हांला जेव्हा ताईने पाहिलं तेव्हा तिला शंका आली. तिला तुम्हांला जाणून घ्यायचं होतं. तिने तुमची माहिती काढायला सुरवात केली. तुम्ही इथे काम करत असल्याचं तिला वॉचमनकडून कळालं. फेसबुक वरून अदितीची माहिती काढली. तिचा फोटा घेतला. ती रोज खुशीला अदितीची ओळख करून देऊ लागली. तुझा कोणता तरी जुना फोटो होता तो खुशीला दाखवू लागली.

अदितीला मावशी बोलायचं.. मिहिरला काका बोलायचं.. असं ती तिला शिकवू लागली. खुशीला ही तुमची ओळख होऊ लागली. गेली दोन तीन

महिने ती तुमच्या मागावर होती. तुमची खबर ठेवत होती. तुमच्यातलं रिलेशन तिला समजलं. फक्त तुम्ही एक होण्याची ती वाट बघत होती.

खुशीला तुमची इतकी सवय होऊ लागली की ती रोज तुमच्या बद्दल विचारत होती. मावशी कधी येणार..? काका कधी येणार..? रोज विचारत होती.

ताईने मग तुला कॉल केलाच. तुम्ही जेव्हा तिला प्रत्यक्षात भेटला तेव्हा बऱ्याच गोष्टी तिच्या लक्षात आल्या. तुमचं प्रेम आहे हे तिला कळालं. तुझ्याशी बोलून तर तिची खात्रीच पटली.

तिला खरं तर अदितीशी मैत्री कशी करायची हा प्रश्न होता. पण तू स्वत: तिला घेऊन आलास. सगळं ताईच्या मनासारखंच होत गेलं.

दादा ताई त्या दिवशी तुझ्याशी जसं वागली ती मुद्दामच. तिला बघायचं होतं तुझं खरचं अदितीवर प्रेम आहे का म्हणून.. तू जसा होतास अगदी तसाच आहेस.. तिची खात्री पटली. तू मर्यादा ओलांडली नाहीस. दादा तुला पटणार नाही पण ताई खूप रडली. सागर त्याच्या मर्यादा कधी ओलांडत नाही हे तू सिद्ध केलंस त्या दिवशी. ताईला अदिती ही फार आवडली. अदितीचा मायाळू स्वभाव तिच्या मनात बसला. तिने ठरवलं तुम्हांला लवकरात लवकर एकत्र आणायचं. तू अचानक गावी गेलास. काही तरी बहाणा करून तुला आणि अदितीला एकत्र आणायचं असं ताईने ठरवलं. म्हणून आम्ही खुशीचा वाढदिवस प्लॅन केला.

सर्व ताईच्या मनानुसार झालं. ताईची आणि अदितीची मैत्री झाली. अदितीची आणि खुशीची मैत्री झाली. ताईने खुशीला सांगितलं की, "मी नसताना मावशीला मम्माच म्हणायचं. मावशी खूप चांगली आहे ना..? मावशी खूप प्रेम करते ना..? मम्मा आणि मावशी एकच असतात.. मी नसेल ना तेव्हा आदु मावशीला मम्माच म्हणायचं.." खुशीने तिला फार प्रश्न विचारले. ताईने तिला जवळ घेऊन एक एक गोष्ट समजवून सांगितली.

खुशी विचारत असे,

"मम्मा तू कुठं जाणार..?" तर ताई तिची समजूत घालून सांगी,

"तुला टेडी खूप आवडतो ना.. तर मी तुझ्यासाठी टेडी आणायला जाणार.. देवबाप्पाकडे.. देवबाप्पाला बोलणार, देवबाप्पा तू माझ्या खुशीसाठी खूप चांगले चांगले टेडी बिअर दे.. माझी खुशी वाट बघतेय.. मला जाऊ दे लवकर.. मग मी तुझ्यासाठी खूप खूप टेडी घेऊन येणार.. तू रडायचं नाहीस हां मी नसताना.. मी चांगले चांगले मोठे मोठे टेडी आणेपर्यंत अदु माऊ बरोबर खेळायचं.. अदु माऊला त्रास नाही द्यायचा.. ऐकणार ना माझं तू..?"

ती सारखं सारखं बोलून ती गोष्ट खुशीच्या मनावर बिंबवत असे.

तुम्ही दोघं एकत्र आलात.. ताईला फार आनंद झाला. तुमच्या सोबत ती सुखाचे चार दिवस जगू शकली. या दिवसात ती फार आनंदी होती. आता माझं समाधान झालं. आता मी मेले तरी मला त्याची फिकीर नाही असं सारखं ताई बोलत होती.

दादा तू युपीएससी क्लियर झालां. ताईचं स्वप्नं पूर्ण झालं. तिला आता कशाची चिंता राहिली नव्हती.

तुम्ही दोघंही त्या दिवशी कामावर गेलात. ताईला जास्त झालं. तिला आम्ही दवाखान्यात आणलं. ताईने परिस्थिती ओळखली. तिने मला सांगितलं कुणाला काही सांगायचं नाही. खुशीला दवाखान्यात आणायचं नाही. आज सकाळी तिला जास्त झालं. तिची शुद्ध हरपली. डॉक्टरांनी स्पष्ट सांगितलं आता चान्सेस फार कमी आहेत. तुम्ही तुमच्या पाहुण्यांना बोलावून घ्या. तिने ही चिठ्ठी तुझ्यासाठी दिली होती.

सारीकाचे डोळे पाण्यानं भरले. "दादा.. ताई आता नाही राहणार आपल्यात." तिचा हुंदका दाटून आला. ती रडूच लागली. अदितीला हे दु:ख सहन नाही झालं. तिने मिहिरच्या खांद्यावर मान टाकली. सारीकाने चिठ्ठी मिहिरच्या हातात दिली. मिहिरने थरथरत्या हातांनी ती चिठ्ठी हातात घेतली. आणि वाचू लागला.

प्रिय मिहिर

मला माहित आहे माझं पत्र तुला त्रासच देतं. याआधीही आणि आताही. पहिल्या पत्रात मी तुझ्या आयुष्यातून गेले. आणि आता या जगातूनच जात आहे. माझं तुला पत्र मिळेल तेव्हा मी असेन की नाही माहित नाही.

मला माफ कर. मी तुझ्यासाठी काहीच करू शकले नाही. तू खूप प्रेम केलंस माझ्यावर. माझीच वेळ खराब होती. असो.

जे झालं ते सर्व तुला माहित आहे. मी तुझ्यापासून माझा आजार सोडून काही लपवलं नाही. एवढ्यापुरतं मला माफ कर. तू तुझं स्वप्नं पूर्ण केलंस मला खूप आनंद झाला. वाईट इतकंच वाटतं की मी तुझी होऊ शकले नाही.

पण अदिती.. मी तुझ्यासाठी खूप खूष आहे.

अदिती तुला आणि मिहिरला मी जेव्हा पाहिलं तेव्हा मला, माझी आणि मिहिरची आठवण झाली. अदिती तूच मिहिरसाठी उत्तम जोडिदार असल्याची मला खात्री पटली.

अदिती तू मला समजूतदार म्हणतेस. पण अगं तू तर खूप मायाळू आहेस. तू जितका जीव मला लावलास तितका कोणीच

लावला नसेल. मला माफ कर अदिती मी तुला काही शिकवू नाही शकले. मला तुमची साथ हवी होती. पण नशिबापुढे आता आपलं काय चालणार. माझ्या शेवटच्या समयात मी तुमच्यात आनंदात राहिले तिथेच माझं समाधान झालं.

मिहिर तुझी सखी तुला सोडून गेली आहे असं कधीच समजू नकोस. एक सखी मी मागे ठेऊन जात आहे. ती आणि मी काय वेगळ्या नाही आहोत. आम्ही एकच आहोत.

आता निघते मी काळजी घ्या.

तुझीच सखी

मिहिरच्या डोळ्यातून आसवांच्या धारा निघत होत्या.

"कुठे आहे रोहिणी..?" त्याने विचारलं.

सारीकाने समोरच्या खोलीवर ईशारा केला आणि चालू लागली.

मिहिर आणि अदिती तिच्या मागोमाग गेले. रोहिणी बेडवर निपचित पडून होती. तिचे डोळे बंद होते. ती काहीच रिस्पॉन्स देत नव्हती. रोहिणीला पाहून अदितीने हंबरडा फोडला. ती खूप खूप रडू लागली. रडत रडतच ती तिच्या पायाशी बसली.

मिहिरला रोहिणीकडे पाहवत नव्हतं. तो एकटक तिच्या शांत मुद्रेकडे पाहत होता. अश्रूंचा एक एक थेंब त्याच्या गालावरून ओघळत होता.

रोहिणीला पाहून त्याच्यासमोर सगळं बालपण उभं राहिलं. बालपणातली सोनी.. शाळेतली रोहिणी.. खेळातली सोबती.. दु:खातली साथी.. संकटातली मैत्रीण.. प्रेमातली साजणी.. त्याची सखी.. निपचित पडून होती.

रोहिणीचा काहीच प्रतिसाद नव्हता.

मिहिर तिच्याजवळ गेला. त्याने तिच्या डोक्यावरून हात फिरवला. मिहिरने त्याचं तोंड तिच्या डोक्याजवळ नेलं. तिच्या डोक्याला त्याचे ओठ लागले. त्याचे अश्रू तिच्या डोक्यातल्या भांगात पडले. आणि त्याच भरलेल्या डोळ्यांनी तो म्हणाला,

खूप सोसलंस तू रोहिणी.. आता निश्चिंत रहा.. तुझी सखी आता माझी सखी आहे..

पलीकडचं मशीन टीं टीं टीं टीं असा आवाज करू लागलं. त्या मशिनमधून सरळ सरळ लांबलचक रेष येऊ लागली.

त्या देहानं प्राण सोडला. रोहिणीची ज्योत मालवली.

या क्षणासाठीच आतापर्यंत तिच्यात प्राण होते. मिहिरचे शब्द तिच्या हृदयापर्यंत पोचले. तिची खात्री पटली. तिच्या सख्याशी तिची शेवटची भेट झाली. मिहिरची सखी.. अदितीची जिवाभावाची मैत्रीण.. सर्वांना सोडून गेली.. तिने सर्वांचा निरोप घेतला.. ती अनंतात विलीन झाली.

रोहिणी नावाचं समजूतदार मन.. सहनशील काळीज कायमस्वरूपी बंद पडलं..

*****

**कथा कादंबरी म्हणजे असं असतं तरी काय?**

कथा कादंबरी म्हणजे असं असतं तरी काय?

खरं थोडं खाली, वर खऱ्यावरची साय!

थोडं मीठ, थोडी मिर्ची, खरं लपवत नाही.

ज्याचं जळतं त्याला कळतं, पाणी थांबत नाही.

एकीकडे कथा म्हणजे पडद्याआडची आग

दुसरीकडे कथा म्हणजे लपवलेला राग

थोडं प्रेम, थोडा द्वेष, थोडी धाय धाय

कथा म्हणजे तुम्ही-आम्ही दुसरं-तिसरं काय?

ई साहित्यवर हजारहून अधिक दर्जेदार कथा-कादंबऱ्या.

आनंद घ्या. आनंद द्या.

**Free Whatsapp book service: 9987737237**

www.esahity.com

esahity@gmail.com